सोलापूर
# तरुण भारत
SOLAPUR TARUN BHARAT
न मे कर्मफले स्पृहा
सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहिल्यानगर व सातारा येथून वितरित

सोलापूर | मंगळवार, २३ जून २०२६ | युगाब्द ५१२८ | वर्ष ४२ वे अंक २०५ | पाने १२ | किंमत रु. ८/-
| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |
ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com


## विचारपुष्प



संस्कृती मानव जातीचा वारसा आहे. तिची प्रक्रिया केव्हा, कुठे आरंभ होईल हे सांगणे कठीण आहे. तिचा प्रवाह मानवाच्या प्रकृतीपासून प्रगतीच्या दिशेने जातो. तिचा तसा प्रवाह नैसर्गिक प्रेरणेतून होतो. प्रवाहाचे केंद्र एक विशिष्ट व्यक्ती अथवा वर्ष होऊ शकत नाही. संस्कृतीच्या प्रवाहाचा उगम व विकास अक्षय नदीप्रमाणे असतो.

**- स्व. रंगा हरी**
रा. स्व. संघाचे पूर्व अ. भा. बौद्धिक प्रमुख

## विनम्र अभिवादन



**'एक देश में दो विधान, दो प्रधान, दो निशान नहीं चलेंगे'चा नारा देणारे डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी यांचा आज बलिदान दिवस**




# भाजपाचे यश

## राज्यात महायुतीचा झंझावात

## महाविकास आघाडी झीरो

## सोलापुरात राजेंद्र राऊत विजयी

**मुंबई, २२ जून**

२०२४ मधील विधानसभा निवडणुकीपासून महायुतीच्या विजयाचा वारू चौखूर उधळत आहे. ग्रामपंचायत, नगर परिषद, नगरपालिका आणि महानगरपालिका निवडणुकांमध्ये काँग्रेस, शरद पवार गट आणि उबाठा या पक्षांना पराभूत करीत महायुतीने विधान परिषद निवडणुकाही सहज जिंकल्या आहेत. १७ पैकी १६ जागा महायुतीने पटकावल्या. भारतीय जनता पार्टीने सर्वाधिक ११, शिवसेना ०३ तर राष्ट्रवादी काँग्रेसने ०२ जागा जिंकल्या आहेत. महाविकास आघाडीची स्थिती एवढी दारूण झाली की तिला एकही जागा जिंकता आली नाही. नाशिकमध्ये अपक्षाने बाजी मारली.

१८ जून रोजी पार पडलेल्या या अत्यंत चुरशीच्या निवडणुकीचा निकाल सोमवारी जाहीर झाला. एकूण १७ जागांपैकी ६ जागांवर महायुतीचे उमेदवार आधीच बिनविरोध निवडून आले होते, तर उर्वरित ११ जागांसाठी सोमवारी मतमोजणी पार पडली. या ऐतिहासिक विजयात भारतीय जनता पक्षाने सर्वाधिक ११ जागा जिंकून राज्यात आपले अव्वल स्थान सिद्ध केले आहे, तर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेला ३ आणि राष्ट्रवादी काँग्रेसला २ जागांवर यश मिळाले आहे.



सोलापूर मतदारसंघातून विजयी झालेले विधानपरिषद सदस्य राजेंद्र राऊत यांचे अभिनंदन करताना महापौर विनायक कोंड्याल, नगरसेवक सिध्देश्वर कमटम, बिज्जू प्रधाने आदी **(सविस्तर वृत्त पान ९ वर)**

## विदर्भात तीनही जागांवर भाजपाचा गुलाल

**नागपूर, २२ जून**

नागपूर स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघाच्या पोटनिवडणुकीत भाजपाचे उमेदवार डॉ. राजीव पोतदार यांचा दणदणीत विजय झाला. डॉ. राजीव पोतदार यांना ६८२ मते मिळाली. महायुतीकडे ८३६ पैकी ५८२ मतदार आणि एकट्या भाजपाकडे ५०४ मतदार होते. डॉ. पोतदार यांनी १०० मते महायुतीच्या बाहेरून खेचून आणलीत. काँग्रेसचे अतुल लोंढे यांना १३० मतांवर समाधान मानावे लागले. या मतदारसंघात काँग्रेसचे एकूण १६९ मतदार होते. मात्र, अतुल लोंढे यांना केवळ १३० मते मिळालीत. म्हणजे किमान ३९ मते फुटली. दुसरीकडे डॉ. राजीव पोतदार यांनी निवडणुकीपूर्वी ८३४ पैकी ५८२ पेक्षा जास्त मतदारांचे समर्थन असल्याचा दावा केला होता. प्रत्यक्षात त्यांना ६८२ मते पडली. म्हणजेच अपेक्षेपेक्षा तब्बल १०० मते जास्त मिळालीत.





**अमरावतीत प्रवीण पोटे, भंडारा-गोंदियात ब्राह्मणकर**

**अमरावती/भंडारा** : अमरावती स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीत भाजपाचे उमेदवार प्रवीण पोटे यांचा विक्रमी ३९० मते घेऊन विजय झाला. त्यांनी वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार निलेश विश्वकर्मा यांचा ३५९ मतांनी पराभव केला. काँग्रेस उमेदवार हर्षजित देशमुख यांना एकही मत मिळाले नाही. तिथेच, भंडारा-गोंदिया विधान परिषद निवडणुकीत भाजपाचे अविनाश ब्राह्मणकर विजयी झाले. (तभा वृत्तसेवा)

# शेतकरी कर्जमाफीसाठी २० हजार कोटींची तरतूद

## पुरवणी मागण्यांमध्ये कृषी क्षेत्राला प्राधान्य



**पावसाळी अधिवेशन**

**मुंबई, २२ जून**

राज्यातील शेतकऱ्यांना मोठा दिलासा देणारा निर्णय घेत, मुख्यमंत्री व वित्तमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सोमवारी विधानसभेत सादर केलेल्या ९७,७०६.४० कोटी रुपयांच्या पुरवणी मागण्यांमध्ये शेतकरी कर्जमाफीसाठी भरीव तरतूद केली आहे. यात शेतकरी कर्जमाफीसाठी २०,५५२ कोटींची तरतूद करून कृषी क्षेत्राला प्राधान्य दिले.

सोमवारपासून पावसाळी अधिवेशनाची मुंबईस्थित विधानभवन सुरुवात झाली. पहिल्याच दिवशी राज्य सरकारकडून पुरवणी मागण्या सादर केल्या. राज्य सरकारने या महिन्याच्या सुरुवातीला घोषित केलेल्या 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना, २०२६' साठी पुरवणी मागण्यांमध्ये २०,५५२ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. मुख्यमंत्री फडणवीस यांनी रविवारीच स्पष्ट केले होते की, या कर्जमाफी योजनेवर एकूण ३६,५८५ कोटी रुपये खर्च करण्यात येणार आहेत. यासोबतच, ग्रामीण भागातील पतपुरवठा यंत्रणा अधिक सक्षम करण्यासाठी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांना भागभांडवल म्हणून ७७७ कोटी रुपयांचा अतिरिक्त निधी देण्याचा निर्णयही सरकारने घेतला आहे.

शेतकरी हिताच्या इतर तरतुदींमध्ये किमान आधारभूत किंमत योजनेतील तूट भरून काढण्यासाठी १,७५०.६२ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे, ज्यामुळे शेतमालाला हमीभाव मिळवून देण्याच्या प्रक्रियेला बळकटी मिळणार आहे. तसेच, ग्रामीण भागातील रोजगार व उपजीविकेच्या संधी वाढवण्यासाठी विकसित भारत-रोजगार आणि आजीविका मिशन (ग्रामीण) अंतर्गत ७,३६७.३२ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. यामध्ये केंद्रीय हिस्सा ४,४२०.३२ कोटी रुपये आणि राज्याचा हिस्सा २,९४७ कोटी रुपये इतका आहे. (तभा वृत्तसेवा)

### राज्यावरील कर्ज १,१०,२६,५४ कोटी

राज्याचे २०२६-२७ या आर्थिक वर्षाचे एकूण कर्ज १,१०,२६,५४ कोटी रुपयांवर (अर्थसंकल्पीय अंदाज) पोहोचले आहे, जे मागील वर्षी ९,७३,९८९ कोटी रुपये (सुधारित अंदाज) होते. असे असतानाही, शेतकरी कर्जमुक्तीसाठीची तरतूद ही सरकारच्या प्राथमिकतेचे घोतक मानले जात आहे. ■

## 'महायुतीचे आश्वासन फसवे ठरले'

**मुंबई, २२ जून**

विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी शेतकरी कर्जमाफीच्या मुद्यावरून विरोधकांनी सरकारला घेरले. विधानभवनाच्या पायऱ्यांवर विरोधी पक्षांच्या आमदारांनी जोरदार निदर्शने करत, महायुती सरकारने दिलेले कर्जमाफीचे आश्वासन हे शेतकऱ्यांच्या डोळ्यात धूळफेक करणारे ठरल्याचा आरोप केला.

काँग्रेसचे आमदार सतेज पाटील आणि विजय वडेट्टीवार, उबाठाचे आमदार भास्कर जाधव आणि अंबादास दानवे, तसेच सचिन अहिर, कैलास पाटील यांच्यासह अनेक विरोधी आमदार यावेळी आंदोलनात सहभागी झाले होते. ■



CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्वाचे...



## यशवंतनगर येथे योग दिनानिमित्त योग साधना शिबिर

**अकलूज दि.२२ जून -**
ग्रीन फिंगर्स आयुर्वेदिक कॉलेज व हॉस्पिटल शंकरनगर-अकलूज तसेच निमा अकलूज शाखा यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक योग दिनानिमित्त योग साधना शिबिर पार पडले. योगतज्ज्ञ धनंजय देशमुख यांनी मार्गदर्शन केले.उपस्थितांना विविध योगासने, प्राणायाम, कपालभाती आदींचे प्रात्यक्षिकांसह प्रशिक्षण दिले. योग शिक्षिका वैशाली साळुंखे यांनी त्यांना सहकार्य केले. ग्रीन फिंगर्स स्कूलच्या ओपन ऑडिटोरियममध्ये आयोजित शिबिरास मोठा प्रतिसाद लाभला. कार्यक्रमास डॉ.उत्तम खरात, डॉ.सुधीर पोफळे (सेंट्रल निमा सदस्य), डॉ.अमोल माने (अध्यक्ष,निमा अकलूज), डॉ.प्रशांत निंबाळकर (अधिष्ठाता,ग्रीन फिंगर्स आयुर्वेदिक कॉलेज व हॉस्पिटल), डॉ.हरिश्चंद्र सावंत-पाटील, डॉ.संदेश गुळुमकर, डॉ.वल्लभ कुलकर्णी, डॉ. निलंबरी मगर, डॉ.तहमीम देशमुख तसेच महाविद्यालयातील विद्यार्थी, हॉस्पिटल कर्मचारी व योगप्रेमी नागरिक उपस्थित होते. स्वागत व प्रास्ताविक सत्यजित खताळ यांनी केले.



## कमलाबेन पटेल नर्सिंग कॉलेजचे बीएसस्सी परीक्षेत यश

**सोलापूर, दि. २२ जून-**
महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक अंतर्गत बी एससी (नर्सिंग) अभ्यासक्रमाच्या निकालात कुंभारी येथील श्रीमती कमलाबेन पटेल नर्सिंग कॉलेजने घवघवीत यश मिळवले. प्रथम सत्रात प्रेम जावीर (७५.६० टक्के), तृतीय सत्रात साक्षी अंदेवाडी (७२.६६ टक्के), पाचव्या सत्रात अपुर्वा वाघमारे (७८.८५ टक्के), सहाव्या सत्रामध्ये समृध्दी बनसोडे (७१ टक्के) यांनी महाविद्यालयामध्ये प्रथम क्रमांक पटकाविला. त्यांचा सत्कार संस्थेचे विश्वस्त सी. दिप्तीबेन पटेल यांच्या हस्ते झाला. यावेळी अमोल भंडारे, महेश मदने व शिक्षकवृंद उपस्थित होते. विद्यार्थ्यांचे संस्थेचे कार्यकारी विश्वस्त बिपीन पटेल, भारती पटेल, मेहुल पटेल, डॉ. सचिन मुंबरे, अधिष्ठाता डॉ. सुहास कुलकर्णी, वैद्यकीय अधिक्षक डॉ. जयराम, आरोग्य अधिक्षक डॉ. सिध्देश्वर करजखेडे यांनी अभिनंदन केले.



## एकता महिला मंच निसर्गाची सेवा करुन साजरी करणार वटपौर्णिमा

**वैराग,दि. २२ जून -**
वटपौर्णिमा हा सण २९ जून रोजी साजरा होत आहे. वटपौर्णिमेचे औचित्य साधून केवळ पूजा अर्चा न करता, प्रत्यक्ष निसर्गाची सेवा करण्याचा एक स्तुत्य निर्णय एकता महिला मंचच्या वतीने घेतला आहे. सोलापूर जिल्ह्यातील ज्या गावांमध्ये मंचचे गट आहेत, त्या सर्व गावांमध्ये 'एक गाव, एक वड' या अभियानांतर्गत मोफत वडाचे झाड देण्यात येणार आहे. झाड नूसते न लावता त्याचे पूर्ण जबाबदारीने संगोपन करण्यात येणार आहे. अभियानासाठी गावातील एकता महिला मंचच्या ग्रुपला किंवा सदस्यांना नोंदणी करावी लागेल. गावाचे नाव, संपर्क करणाऱ्या प्रमुख सदस्याचे नाव आदींसह २४ जूनपर्यंत ७२१८३३८००९ या मोबाईलवर नोंदणी करावी, असे एकता महिला मंच, प्रमुख प्रभाकर क्षीरसागर यांनी सांगितले आहे.

## वृध्दास काठीने मारहाण; नाकच छाटले गेले

**सोलापूर, दि. २२ जून-**
मंदिरात समोर झोपलेल्या एका साठ वर्षीय वृद्ध इसमाला दोघा अज्ञातानी काठीने मारहाण केल्याने सदर वृद्ध इसमाचे नाकच छाटले गेल्याची घटना जुना विडी घरकुल येथील कोटा नगरात आज सोमवारी दुपारी बारा वाजता घडली. अंजय्या नागप्पा पोबत्ती (वय ६० वर्ष, राहणार कोटा नगर, सोलापूर ) असे त्या जखमी वृद्ध इसमाचे नाव असून ते आज सोमवारी दुपारी कोटा नगर येथील मंदिरा जवळ झोपलेले असताना अज्ञात कारणावरून दोघा अज्ञात व्यक्तींनी त्यांच्यासोबत भांडण काढून त्यांना काठीने मारहाण केली . या मारहाणीत त्यांचे नाकच छाटले गेले . नाक लोंबकळू लागले असता कोणीतरी एकाने ते लोंबकळणारे नाक रुमालाने चेहऱ्याला बांधले. त्यानंतर तो जखमी वृद्ध घरकुल पासून चालत एकटाच येथील शासकीय रुग्णालयात उपचारासाठी स्वतःच दाखल झाला .याबाबत सिव्हिल पोलीस चौकीत नोंद करण्यात आली आहे .



# घेरडीत सापडली गांजाची झाडे

### एकावर गुन्हा; ४ लाख १७ हजार १०० रुपये बाजारमुल्य

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला,दि.२२ जून-**
सांगोला तालुक्यातील घेरडी येथे एका शेतात गांजाची झाडे सापडली आहेत. त्यानंतर सांगोला पोलिस ठाण्यात सदर शेतकऱ्यावर गुन्हा दाखल केला आहे. तसेच ८ किलो ३८२ ग्रॅम वजनाची व ४ लाख १७ हजार १०० रुपयांचा गांजाही जप्त केला आहे.

बाजीराव संपत यमगर (वय-५०), रा.दिवाण वस्ती, घेरडी, ता.सांगोला, जि.सोलापूर असे गुन्हा दाखल केलेल्या शेतकऱ्याचे नाव आहे. त्याने आपल्या शेतातील गट क्र.१०८९ मधील ज्वारीच्या पिकालगत बेकायदा बिगर परवाना गांजाची झाडे लावली होती. सांगोला पोलिसांना याबाबत माहिती मिळाली. त्यांनी बाजीराव यमगरच्या शेतात रविवार दि.२१ जून रोजी सायंकाळी साडेसहा वाजण्याच्या सुमारास छापा टाकला. तेव्हा त्यांना ज्वारीच्या पिकालगत गांजाची ३ झाडे लावल्याचे दिसून आले.

यातील एक झाड ६ फूट उंचीचे होते. ते हिरवे असल्याने त्याला उग्र वास येत होता. तसेच बिगर पानाचे व फांदीचे ४ फूट उंचीचे व ५ फूट उंचीचे अशी अन्य दोन झाडही आढळली. बिगर पान व फांदीची ४ फूट उंच व ५ फूट उंचीची अशी दोन झाडे मुळासह उपटून काढली. तिन्ही झाडे एकत्रित पांढऱ्या प्लास्टिक पोत्यात भरण्यात आली. त्यांचे एकूण वजन ६ किलो ३५७ ग्रॅम इतके भरले. तसेच ९९ हजार २५० रुपयांचे गांजाच्या झाडाखाली ठेवलेले गांजाच्या हिरव्या रंगाचे पान एका पांढऱ्या प्लास्टिक पोत्यात भरून (वजन १ किलो ९८५ ग्रॅम) ठेवले.

सदर घटनेबाबत नारायण रामचंद्र गोलेकर, सहायक पोलिस उपनिरीक्षक, स्थानिक गुन्हे शाखा, सोलापूर ग्रामीण यांनी गुंगीकारक औषधी द्रव्ये आणि मनोव्यापारावर परिणाम करणारे पदार्थ अधिनियम प्रमाणे फिर्याद सांगोला पोलिस ठाणे येथे दिली आहे.

**आठ किलो ३८२ ग्रॅम वजन**

सदर गांजाची बाजारमुल्याने किंमत काढली असता, ६ फुट उंचीच्या हिरव्या झाडाची किंमत सुमारे ३ लाख १७ हजार ८५० रुपये इतकी आहे. अशी एकुण ८ किलो ३८२ ग्रॅम वजन व ४ लाख १७ हजार १०० रूपयांची ३ गांजाची झाडे जप्त केली आहेत.

# खुनाच्या प्रयत्नातील आरोपीस जामीन मंजूर

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.२२ जून-**
मंगळवेढा तालुक्यातील मुढवी येथे घडलेल्या प्रकरणातील आरोपीस पंढरपूर येथील जिल्हा व सत्र न्यायालयाने नियमित जामीन मंजूर केला आहे.

जमिनीच्या वादातून हा प्रकार घडला. फिर्यादी सुनिता शिवपुजे या शेतात काम करीत असताना आरोपी रविंद्र शिवपुजे शेतात येऊन फिर्यादी व तिचे पती- धोंडीराम यांना शिवीगाळ करीत शेतातील मोटारची तोडफोड केली. कोयता घेवून फिर्यादी व तिचे पती यांना तुम्ही या शेतात यायचे नाही व शेती करायची नाही. मी तुम्हाला येथे राहू देत नाही असे म्हणून आरोपीस फिर्यादीने जाब विचारल्यावर त्याने कोयता डोक्यात घालून जीवे ठार मारण्याच्या उद्देशाने फिर्यादीस जखमी केले. गुन्हा दाखल झाल्यानंतर आरोपीस पोलीसांनी दि. ७ मे रोजी अटक केल्याने त्यास न्यायालयाने न्यायालयीन कोठडीचा आदेश केला. त्यानंतर आरोपीने ॲड. तुषार रोकडे यांच्यामार्फत पंढरपूर जिल्हा व सत्र न्यायालयाकडे जामिनासाठी अर्ज दाखल केला. सदर अर्जावर सरकार पक्षातर्फे आरोपीतर्फे युक्तीवाद करून न्यायालयास आरोपी हा निष्पाप असलेचे सकृतदर्शनी दाखवून दिले. सदर युक्तीवाद ग्राह्य धरून पंढरपूर जिल्हा व सत्र न्यायाधीश सलगर यांनी आरोपीस नियमित जामीन मंजूर केला. आरोपीच्या वतीने ॲड. तुषार रोकडे यांनी काम पाहिले.



## 'सोलार वारी' कंपनीकडे मनसेची मागणी

**स्थानिक शेतकरी व मजुरांना प्राधान्य द्या : मल्लिनाथ पाटील**

**तभा वृत्तसेवा**
**वळसंग २२ जून-**
महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांच्या आदेशाने, तसेच मनसे नेते दिलीप धोत्रे, जिल्हा संपर्क अध्यक्ष ॲड. किशोर शिंदे, ॲड. सुधीर पाटसकर, जिल्हाध्यक्ष विनायक महिंद्रकर आणि लोकसभा अध्यक्ष प्रशांत इंगळे यांच्या मार्गदर्शनाखाली अक्कलकोट मनसेच्या वतीने 'सोलार वारी' कंपनीच्या सलगर येथील अधिकाऱ्यांची व व्यवस्थापनाची भेट घेऊन त्यांना विविध मागण्यांचे निवेदन देण्यात आले.

या निवेदनात प्रामुख्याने, प्रकल्पासाठी जमिनी दिलेल्या स्थानिक शेतकऱ्यांना आणि गावातील तसेच परिसरातील स्थानिक मजुरांना कामात प्रथम प्राधान्य द्यावे, इतर राज्यांतून मजूर आणून स्थानिक तरुणांवर अन्याय करू नये. कामासाठी आवश्यक असणारे ट्रॅक्टर, पाण्याचे टँकर, कार, जीप आणि पिकअप यांसारखी वाहने स्थानिक लोकांचीच भाड्याने घेण्यात यावीत. कर्नाटक, आंध्रप्रदेश किंवा हैदराबाद यांसारख्या परराज्यांतून वाहने आणू नयेत. कामगारांचे पगार आणि वाहनांचे भाडे वेळेवर व नियमितपणे देण्यात यावे. या भागातील सुशिक्षित व गरजू मुलांना तात्काळ रोजगार उप-लब्ध करून द्यावा. अशी आग्रही मागणी करण्यात आली आहे.

निवेदन देताना मनसेचे अक्कलकोट तालुकाध्यक्ष मल्लिनाथ पाटील, तालुका उपाध्यक्ष मल्लिनाथ घंटे, किणी गटाध्यक्ष काशिनाथ मरतुरे, शहर संपर्क अध्यक्ष आदर्श मळगी-पाटील, शहर उपाध्यक्ष शामराव पाटील, सलगर शाखाध्यक्ष महेश चिकमळ, मनसैनिक काशिनाथ बंदीछोडे, राजू घंटे आदी उपस्थित होते.

## ज्येष्ठ महिलेच्या गळ्यातील गंठण लंपास

**बार्शी, दि. २२ जून-**
संकेश्वर बाग परिसरात फिरण्यासाठी गेलेल्या एका ज्येष्ठ महिलेच्या गळ्यातील १७ ग्रॅम, ४०० मिलीग्रॅम वजनाचे सोन्याचे मिनी गंठण दुचाकीवरून आलेल्या दोन अज्ञात चोरट्यांनी हिसकावून नेले आहे. नंदा महादेव दिवटे (वय ६३, रा. देशमुख प्लॉट, कुलकर्णी हॉस्पिटल शेजारी,उपळाई रोड, बार्शी) या आपल्या पतीसह शनिवार २१ जून रोजी सायंकाळी नेहमीप्रमाणे फिरण्यासाठी बाहेर पडल्या होत्या. सायंकाळी ७.१५ वाजण्याच्या सुमारास त्या संकेश्वर बाग परिसरात पोहोचल्या असता, त्यांच्या पाठीमागून दुचाकीवरून आलेल्या दोन अज्ञात इसमांनी त्यांच्या गळ्यातील सोन्याचे मिनी गंठण जोराने हिसकावून घेतले आणि घटनास्थळावरून वेगाने पळ काढला. अचानक घडलेल्या या प्रकारामुळे दिवटे यांनी आरडाओरडा केला. मात्र, तोपर्यंत चोरटे पसार झाले होते. झटापटीत त्यांच्या गळ्याला किरकोळ दुखापतही झाली. घटनेनंतर परिसरात शोधाशोध करूनही सोन्याचे गंठण मिळून आले नाही. या प्रकरणी नंदा दिवटे यांनी बार्शी शहर पोलिस ठाण्यात दोन चोरट्यांविरोधात गुन्हा दाखल केला आहे. परिसरातील सीसीटीव्ही फुटेजची तपासणी करून आरोपींचा शोध घेण्याचे आव्हान पोलिसांसमोर उभे राहिले आहे.



## अखिल ब्राह्मण मध्यवर्ती संस्थेमार्फत विद्यार्थ्यांना वह्यांचे वाटप

**तभा वृत्तसेवा,**
**जेऊर दि. २२ जून-**
अखिल ब्राह्मण मध्यवर्ती संस्था, नाशिक शाखा करमाळा यांच्यावतीने विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक साहित्य वाटप करण्यात आले. तालुकाध्यक्ष संतोष कुलकर्णी यांच्या नेतृत्वाखाली हा उपक्रम राबवण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी यशकल्याणी सेवाभावी सामाजिक संस्थेचे अध्यक्ष डॉ. गणेश भाऊ करे-पाटील होते. यावेळी अखिल भारतीय डिजिटल मीडिया पत्रकार संपादक संघटना करमाळा तालुका अध्यक्ष पत्रकार दिनेश मडके, सचिव नरेंद्रसिंह ठाकुर, राहुल रामदासी प्रमुख उपस्थिती होती.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला दिपप्रज्वलन व श्री कमलाभवानी प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यावेळी अखिल ब्राह्मण मध्यवर्ती संस्था, नाशिक शाखा करमाळाचे तालुकाध्यक्ष संतोष कुलकर्णी यांचा समाजबांधवांच्या वतीने विशेष सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे विशेष आकर्षण ठरले ते कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) क्षेत्रात संशोधन करून अमेरिकेत तब्बल ८० लाख रुपयांची शिष्यवृत्ती मिळवणारे गुणवंत विद्यार्थी यश आडकर यांचा सन्मान. डॉ. गणेश भाऊ करे-पाटील यांच्या हस्ते त्यांचा गौरव करण्यात आला.

या उपक्रमाचे विद्यार्थी, पालक आणि उपस्थित नागरिकांनी स्वागत करून संस्थेच्या सामाजिक कार्याचे कौतुक केले. कार्यक्रमासाठी संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमास योगेश पुंडे, राजेश पुंडे, देणगीदार संचालक प्रसाद कुलकर्णी यांचे सहकार्य लाभले. कार्यक्रमास तालुकाध्यक्ष संतोष कुलकर्णी, सचिव भारत घुगिकर, कार्याध्यक्ष रविंद्र विद्वत, उपाध्यक्ष राजेंद्र सुर्यपुजारी कार्यवाह निलेश गंधे, कार्यकारिणी सदस्य नागेश विद्वत, हेमा विद्वत, हरि विद्वत, निलेश गंधे, शुभम कुलकर्णी, मकरंद दिवाण, श्रीपाद आडकर, संजयकुमार कुलकर्णी, प्रसाद पाठक, प्रमोद पाठक, मंगेश देशपांडे, शैलेश खळदकर, सुधीर ढोके, चैतन्य पाटील, अशोक कुलकर्णी, हरि कुलकर्णी, मनोज कुलकर्णी, राहुल जोशी, ओंकार कुलकर्णी, नितेश कुलकर्णी, अश्विन कुलकर्णी, अतुल देशपांडे, शामल कुलकर्णी, कोमल कुलकर्णी आणि नेहा शास्त्री आदी मान्यवर उपस्थित होते. प्रास्ताविक सूत्रसंचालन संतोष कुलकर्णी यांनी तर आभार निलेश गंधे यांनी मानले.

## शेतकऱ्याच्या मुलाचे यश; मिळविली सीएची पदवी

**तभा वृत्तसेवा**
**श्रीपूर, दि. २२ जून-**
जिद्द आणि अथक परिश्रम यांच्या जोरावर शेतकरी कुटुंबातील रोहन शिंदे यांनी चार्टर्ड अकाउंटंट बनण्याचे स्वप्न साकारले. अकलूजजवळील आनंदनगर-पाटीलवस्ती येथील रोहन यांनी मे २०२६ मध्ये झालेल्या सीए फायनल परीक्षेत यश मिळविले.



शेतकरी कुटुंबातील रोहन यांनी आर्थिक आणि शैक्षणिक आव्हानांवर मात करत आपले शिक्षण पूर्ण केले. त्यांनी अकलूज येथील शंकरराव मोहिते पाटील स्कूलमध्ये प्राथमिक व माध्यमिक शिक्षण घेतले. दहावीत ९४ टक्के तर बारावीत ८९ टक्के गुण मिळवून शैक्षणिक गुणवत्ता सिद्ध केली. त्यानंतर पुण्यातील मराठवाडा मित्र मंडळ कॉलेज ऑफ कॉमर्स, येथे उच्च शिक्षण घेत असताना त्यांनी सीए अभ्यासक्रमाची वाट निवडली. मार्च २०२१ मध्ये सीए फाउंडेशन, मे २०२३ मध्ये सीए इंटरमिजिएट आणि अखेर मे २०२६ मध्ये सीए फायनल परीक्षा उत्तीर्ण होऊन त्यांनी चार्टर्ड अकाउंटंट होण्याचे ध्येय पूर्ण केले. सीए फायनल परीक्षेत त्यांनी ६०० पैकी ३२१ गुण मिळविले.

देशातील कठीण परीक्षा उत्तीर्ण करून यशाचे शिखर गाठल्याने, शेतकऱ्याच्या मुलाचा सी.ए.पर्यंतचा प्रवास हा ग्रामीण भागातील युवकांसाठी प्रेरणादायी ठरावा, अशी भावना क्षितिज फायनान्शिअल सर्व्हिसचे मालक अजित वीर व्यक्त केली.

# एकल महिलांचे प्रश्न : आर्थिक सक्षमीकरणापलीकडील वास्तव आणि पुढील पिढीची चिंता

**एकटी असली तरी ती हरलेली नाही,**
**संघर्षाच्या वाटेवर तिची पावले थांबलेली नाहीत;**
**स्वत:च्या वेदना विसरून लेकरांसाठी जगणारी, प्रत्येक एकल महिला उद्याच्या समाजाची शक्ती आहे.**

२३ जून हा एकल महिला दिन केवळ एक दिवस साजरा करण्यापुरता मर्यादित नसून समाजातील लाखो एकल महिलांच्या संघर्षाची, त्यांच्या प्रश्नांची आणि त्यांच्या मुलांच्या भविष्याची जाणीव करून देणारा दिवस आहे. एकल महिला हा विषय केवळ विधवा, घटस्फोटित किंवा परित्यक्ता महिलांपुरता मर्यादित नाही. त्यांच्या जीवनाशी संबंधित सामाजिक, आर्थिक, मानसिक, आरोग्यविषयक आणि पुढील पिढीवर परिणाम करणारे अनेक गंभीर प्रश्न या विषयामध्ये अंतर्भूत आहेत.

युगंधर फाऊंडेशन, सोलापूर मागील एक वर्षापासून 'साऊ एकल महिला समिती'चे हेरंब कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली एकल महिलांचे सर्वेक्षण आणि त्यांच्या प्रश्नांचा अभ्यास करीत आहे. दक्षिण सोलापूर, उत्तर सोलापूर आणि मोहोळ तालुक्यातील कारंबा, वडाळा, सावळेश्वर, तेलगाव, डोणगाव, शिरापूर, लांबोटी, नंदूर, पाथरी, हत्तूर, सुरेगाव, वडापूर, तिऱ्हे, पाकणी आणि कोंडी या पंधरा गावांमध्ये केलेल्या अभ्यासात दीड हजारांपेक्षा जास्त एकल महिला आढळून आल्या. या महिलांमध्ये अकाली वैधव्य, परित्याग, घटस्फोट, पतीपासून विभक्त राहणे, चाळिशीनंतर विवाह न होणे किंवा शारीरिक व्यंगामुळे विवाह न होणे अशी अनेक कारणे दिसून आली. त्यामुळे प्रत्येक महिलेचे प्रश्न आणि गरजा वेगवेगळ्या स्वरूपाच्या असल्याचे स्पष्ट झाले.



ग्रामीण भागातील महिलांमध्ये विशेषतः शेती, शेतमजुरी, कंपनीमधील कामे किंवा इतर श्रमप्रधान व्यवसायांच्या माध्यमातून आर्थिक जबाबदारी स्वतः सांभाळण्याची क्षमता दिसून येते. मात्र आर्थिक सक्षमीकरणाच्या या प्रक्रियेत मुलांच्या शिक्षणाकडे, त्यांच्या मानसिक आरोग्याकडे आणि भावनिक विकासाकडे पुरेसे लक्ष देता येत नसल्याचे वास्तव या अभ्यासामध्ये प्रकर्षाने दिसून आले. रोजगाराच्या शोधात महिलांना अनेकदा गावाबाहेर जावे लागते. अधिक उत्पन्नाच्या अपेक्षेने ठरलेल्या वेळेपेक्षा अधिक काम केल्याने त्यांच्या आरोग्यावर परिणाम होतो आणि त्याचबरोबर मुलांच्या संगोपनाकडे दुर्लक्ष होते.

वडिलांचे छत्र नसणे आणि आई दिवसभर कामाच्या निमित्ताने घराबाहेर असणे यामुळे अनेक मुलांमध्ये मानसिक अस्थिरता, असुरक्षितता आणि चुकीच्या संगतीमुळे व्यसनाधीनतेचा धोका वाढताना दिसतो. मुलींच्या बाबतीत तर परिस्थिती अधिक गंभीर आहे. आई ऊसतोडीसाठी किंवा रोजगारासाठी अनेक महिने घराबाहेर असताना घरातील जबाबदारी मोठ्या मुलींवर येते. त्यामुळे त्यांच्या शिक्षणावर, आरोग्यावर आणि व्यक्तिमत्त्व विकासावर दुष्परिणाम होतात. अनेक वेळा त्यांच्या विवाहासंदर्भातील प्रश्न देखील अधिक गुंतागुंतीचे बनतात.

राष्ट्रीय महामार्गालगतच्या गावांमध्ये वाढलेली वाहतूक, ढाब्यांची वाढती संख्या आणि बदलणारे सामाजिक वातावरण यामुळे काही भागांमध्ये महिलांच्या शोषणाचे आणि देहविक्रीसारख्या धोकादायक प्रवाहात ओढल्या जाण्याचे प्रमाण वाढण्याचा धोका जाणवतो. यामुळे भविष्यात एचआयव्ही-एड्स आणि इतर लैंगिक आजारांच्या समस्या अधिक गंभीर होऊ शकतात. त्यामुळे एकल महिलांच्या प्रश्नांकडे केवळ आर्थिक दृष्टिकोनातून पाहणे पुरेसे नाही.

महाराष्ट्रात आज अंदाजे ५४ ते ८० लाख एकल महिला असून त्यांच्यावर अवलंबून असणारी लोकसंख्या जवळपास दोन कोटींच्या आसपास आहे. ग्रामीण भागातील सर्वेक्षणामध्ये ५४ लाखांहून अधिक महिलांची नोंद झाली असून राज्यातील दोन लाख तेवीस हजारांहून अधिक मुले एकल महिलांच्या कुटुंबातील आहेत. सोलापूर जिल्ह्यातही साधारणतः एक लाखांहून अधिक एकल महिला असल्याचा अंदाज व्यक्त केला जातो. त्यामुळे हा विषय केवळ महिलांच्या सक्षमीकरणाचा नसून संपूर्ण समाजाच्या भविष्यासाठी महत्त्वाचा ठरतो.

या पार्श्वभूमीवर एकल महिलांसाठी स्वतंत्र धोरण तयार करताना केवळ बचत गट, स्वयंरोजगार किंवा आर्थिक मदतीपुरते मर्यादित न राहता सामाजिक, मानसिक आणि शैक्षणिक सुरक्षेचा विचार करणे अत्यावश्यक आहे. महाराष्ट्रात स्वतंत्र एकल महिला आयोग स्थापन करून राज्यातील सर्व एकल महिलांची अचूक नोंदणी आणि डिजिटल डेटाबेस तयार करणे गरजेचे आहे. प्रत्येक ग्रामपंचायत स्तरावर त्यांची माहिती अद्ययावत ठेवली गेली पाहिजे. एकल महिलांच्या मुलांसाठी स्वतंत्र शिष्यवृत्ती, निवासी वसतिगृह आणि शैक्षणिक सहाय्य योजना उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. किशोरवयीन मुलांसाठी मानसिक आरोग्य आणि व्यसनमुक्ती कार्यक्रम राबविणे, मुलींच्या सुरक्षिततेसाठी गावपातळीवर विशेष समित्या स्थापन करणे, ऊसतोडीसाठी स्थलांतरित होणाऱ्या महिलांच्या मुलांसाठी हंगामी शिक्षण केंद्रे आणि पोषण योजना सुरू करणे, प्रत्येक तालुक्यात समुपदेशन व कायदेशीर मदत केंद्र स्थापन करणे, महिलांसाठी नियमित आरोग्य तपासणी आणि एचआयव्ही प्रतिबंध जनजागृती कार्यक्रम राबविणे ही काळाची गरज आहे. तसेच वडिलांशिवाय वाढणाऱ्या मुलांसाठी मार्गदर्शक उपक्रम, कौशल्य विकास कार्यक्रम आणि व्यक्तिमत्त्व विकासाच्या संधी उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. २३ जून एकल महिला दिनाच्या निमित्ताने एकल महिलांकडे केवळ सहानुभूतीने नव्हे तर संवेदनशीलता, समानता आणि सन्मानाच्या दृष्टीने पाहण्याची गरज आहे. कारण एकल महिलेचा प्रश्न हा केवळ तिच्या उदरनिर्वाहाचा प्रश्न नसून तिच्या मुलांच्या मानसिक आरोग्याचा, शिक्षणाचा, सुरक्षिततेचा आणि पुढील पिढीच्या घडणीचा प्रश्न आहे. आर्थिक सक्षमीकरणाबरोबरच सामाजिक आधार, मानसिक आरोग्य, पोषण, शिक्षण आणि सुरक्षितता यांचा समन्वय साधणारे सर्वसमावेशक धोरणच एकल महिलांच्या आणि त्यांच्या मुलांच्या आयुष्यात खऱ्या अर्थाने परिवर्तन घडवू शकते.

**- प्रा. रेश्मा माने**
युगंधर फाऊंडेशन, सोलापूर
साऊ एकल महिला समिती सदस्य

# श्रीविठ्ठल-रुक्मिणी मुर्तीच्या रासायनिक लेपनास न्यायालयाची स्थगिती

## मंदिर महासंघ आणि वारकरी संघटनांच्या याचिकेला मोठे यश

### मुर्तीचे पावित्र्य जपण्यासाठी धर्मशास्त्रीय भूमिकेचा विजय

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.२२ जून-**
कोट्यवधी हिंदूंचे आराध्यदैवत असलेल्या पंढरपूरच्या 'स्वयंभू' श्रीविठ्ठल-रुक्मिणी मूर्तीवर श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरे समिती आणि पुरातत्त्व विभागाकडून दि.२३ आणि २४ जून २०२६ रोजी प्रस्तावित असलेल्या रासायनिक वज्रलेपनास पंढरपूर येथील दिवाणी न्यायालयाने (कनिष्ठ स्तर) स्थगिती दिली आहे. वारकरी संप्रदाय आणि महाराष्ट्र मंदिर महासंघाने दाखल केलेल्या याचिकेवर सुनावणी करत, न्यायालयाने पुढील आदेश येईपर्यंत कोणत्याही प्रकारचे लेपन करण्यास मनाई केली असल्याची माहिती वारकरी संघटनांची बाजू मांडणारे वकील ॲड. धनंजय रानडे यांनी दिली.

वारकरी संप्रदाय, बाळकृष्ण डिंगरे आणि महाराष्ट्र मंदिर महासंघाचे पुरुषोत्तम लंके यांनी पंढरपूर येथील दिवाणी न्यायाधीश (कनिष्ठ स्तर) सोनाली राऊळ यांच्या न्यायालयात हा दावा दाखल केला होता. याप्रकरणी याचिकाकर्त्यांच्या वतीने अधिवक्ता सुधीर रानडे यांनी भक्कम युक्तिवाद केला. दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर न्यायालयाने मंदिर समितीला वज्रलेप न करण्याविषयी सक्त ताकीद दिली आहे.

न्यायालयात मांडण्यात आलेले महत्त्वाच्या मुद्द्यांमध्ये हिंदु धर्मशास्त्रानुसार मूर्ती ही केवळ दगडी किंवा पाषाण शिल्प नसून त्यात साक्षात देवत्व (प्राण) असते. काकड आरतीपासून ते नैवेद्यापर्यंत सर्व कृती याच भावनेतून केल्या जातात. मंदिर समिती केवळ दगडाची मूर्ती समजून कृत्रिम आणि अपवित्र रासायनिक पदार्थांचा (उदा. इपॉक्सी) वापर करत आहे, ज्यामुळे मूर्तींचे देवत्व नष्ट होऊ शकते.

आतापर्यंत ४ वेळा रासायनिक लेपन करूनही त्याचा फोलपणा सिध्द झाला आहे. कृत्रिम रसायनांमुळे पाषाणाचे नैसर्गिक श्वसन रोखले जाऊन मूर्ती आतून अधिक ठिसूळ होण्याचा मोठा धोका आहे. महाकालेश्वर मंदिर प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशांचा न्यायालयात संदर्भ देण्यात आला. त्यानुसार भक्तांच्या धार्मिक भावना दुखावणारे कोणतेही निर्णय प्रशासनाला घेता येणार नाहीत. करवीर पीठाच्या जगद्गुरु शंकराचार्यांनी या रासायनिक लेपनास स्पष्ट विरोध करणारे पत्र दिले असून, न्यायालयाने त्याचीही न्यायालयाने नोंद घेतली आहे.



#### बैठकीत केवळ मते नोंदवली गेली

जिल्हाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत झालेल्या बैठकीत केवळ मते नोंदवली गेली. मात्र कोणती रसायने वापरणार आणि संवर्धन कसे करणार? याची कोणतीही स्पष्ट माहिती प्रशासनाने दिली नाही. अचानक पत्रक काढून मंदिर बंद ठेवत वज्रलेपाचा निर्णय जाहीर केल्याने भाविकांमध्ये मोठा संभ्रम निर्माण झाला असल्याचे सांगण्यात आले.

#### आयुर्वेदिक वज्रलेप सुरक्षित

मूर्ती संवर्धनासाठी आयुर्वेदिक वज्रलेप हा अधिक सुरक्षित आणि परंपरेस अनुरुप असल्याचे आम्ही न्यायालयात सप्रमाण मांडले आहे. यापुढील काळात तरी मंदिर समिती वारकरी, धर्माचार्य, संत-महंत आणि हिंदुत्वनिष्ठ संघटनांच्या भावनांचा आदर करेल, असा विश्वासही सुनील घनवट यांनी व्यक्त केला.

#### आदेशाची प्रत, कायदेशीर सल्ला, बैठकीत चर्चा

येथील दिवाणी न्यायालयाच्या याबाबतच्या आदेशाची प्रत मिळाल्यावर योग्य कायदेशीर सल्ला घेऊन तसेच विठ्ठल रुक्मिणी मंदिर समितीच्या बैठकीत याबाबत चर्चा केल्यानंतर पुढील निर्णय घेऊ, असे श्रीविठ्ठल-रुक्मिणी मंदिरे समितीचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी सांगितले.

#### मुर्तीच्या पायाला खड्डा

महाराष्ट्र मंदिर महासंघाचे राष्ट्रीय संघटक सुनील घनवट यांनी प्रशासनाच्या कार्यपध्दतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित करताना म्हणाले, तब्बल २८ युगे विटेवर सुखरुप उभा असणाऱ्या पांडुरंगाच्या मुर्तीच्या पायाला कोरोना टाळेबंदीच्या काळात खड्डा कसा पडला? श्रीरुक्मिणीमातेचे पाय का खराब झाले? याचे कोणतेही शास्त्रीय उत्तर अद्याप मंदिर समिती किंवा पुरातत्त्व विभागाला देता आलेले नाही.



## वरिष्ठ न्यायालयात अपील दाखल; मंदिर दर्शनासाठी नियमित खुले राहणार

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.२२ जून-**
श्रीविठ्ठल-रुक्मिणीमाता यांच्या मूर्तींचे दीर्घकालीन जतन, संरक्षण व संवर्धन करण्याच्या उद्देशाने भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण विभाग, राज्य पुरातत्त्व विभाग तसेच मूर्ती संवर्धन क्षेत्रातील तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखाली मूर्ती संवर्धनाचे काम हाती घेण्याचे नियोजन करण्यात आले होते. पंढरपूर न्यायालयाने दिलेल्या निर्णयाच्या विरोधात वरिष्ठ न्यालयात अपील दाखल करण्यात येणार आहे. दरम्यान, मंदिर दर्शनासाठी नियमित खुले राहणार आहे, असे मंदिरे समितीकडून सांगण्यात आले.

जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत पुरातत्त्व तज्ज्ञ, संबंधित अधिकारी, स्थानिक महाराज मंडळी, सल्लागार परिषद सदस्य व श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरे समितीच्या पदाधिकाऱ्यांशी सविस्तर चर्चा करण्यात आली होती. तज्ज्ञांनी दिलेल्या तांत्रिक मार्गदर्शनानुसार दि.२२ ते २४ जून या कालावधीत मूर्ती संवर्धनाचे काम प्रस्तावित करण्यात आले होते. पंढरपूर न्यायालयाने स्थगिती दिल्याने दि.२३ व २४ जून रोजी श्रीविठ्ठल-रुक्मिणी मंदिर भाविकांच्या दर्शनासाठी नियमितपणे खुले राहणार असून दर्शन व्यवस्था पूर्ववत सुरु राहील, असेही सांगण्यात आले.

## लखनौमध्ये कोचिंग सेंटरला आग १५ मुलांचा होरपळून मृत्यू

**लखनौ, २२ जून**
उत्तरप्रदेशची राजधानी लखनौमधील अलीगंज भागातील पुरनिया चौकाक्तीत एका कोचिंग सेंटरला सोमवारी भीषण आग लागली. या भीषण दुर्घटनेत १५ मुलांचा होरपळून मृत्यू झाला आहे. मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी या प्रकरणाच्या उच्चस्तरीय चौकशीचे आदेश दिला असून, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मृतांच्या कुटुंबीयांसाठी आर्थिक मदत जाहीर केली आहे.

उत्तरप्रदेशचे उपमुख्यमंत्री ब्रिजेश पाठक यांनी या घटनेत किमान १५ मृत्यू झाल्याच्या माहितीला दुजोरा दिला. मृत्युमुखी पडलेल्यांमध्ये बहुतांश तरुण मुलामुलींचा समावेश असल्याचे समाको मोठ्या प्रमाणात पूर दाटल्याने इमारतीत नेमके किती लोक अडकले आहेत, याबाबत बराच वेळ संभ्रम होता.

आग लागताच संपूर्ण इमारतीत वेगाने धूर पसरला. हे पाहून स्थानिक लोकांनी तातडीने अग्निशमन दलाशी संपर्क साधला. प्रत्यक्षदर्शींनी दिलेल्या माहितीनुसार, आगीने बघता बघता विक्राळ रूप धारण केले होते. दुर्घटना घडली तेव्हा कोचिंग सेंटरमध्ये मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते. आगीच्या ज्वाळा आणि धूर पसरताना पाहून विद्यार्थ्यांमध्ये पळापळ झाली. सर्वत्र किंचाळ्या आणि गोधळाचे वातावरण झाले होते. पंतप्रधान कार्यालवाने 'पंतप्रधान राष्ट्रीय मदत निधी मधून मदत जाहीर केली आहे. त्यानुसार, प्रत्येक मृत व्याक्तीच्या नातेवाईकाला दोन लाख रुपये, तर जखमींना ५० हजार रुपयांची आर्थिक मदत दिली जाणार आहे.

## सायबर गुन्हेगारीला वेसण अन् महिला सुरक्षेला बळ

### राज्य सरकारकडून विशेष निधीची तरतूद

**मुंबई, २२ जून**
तंत्रज्ञानाच्या प्रगतीसोबतच गुन्हेगारीचे बदलते स्वरूप लक्षात घेता, राज्य सरकारने सायबर गुन्हेगारीला आळा घालण्यासाठी आणि महिला सुरक्षेला सर्वोच्च प्राधान्य देण्यासाठी महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे. विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनात मांडण्यात आलेल्या पुरवणी मागण्यांमध्ये गृह विभागासाठी विशेष तरतुदी करण्यात आल्या असून, 'सुरक्षित आणि सशक्त महाराष्ट्र' घडवण्याच्या दृष्टीने राज्य सरकारने आपल्या तिजोरीतून मोठा निधी उपलब्ध करून दिला आहे.सध्या वाढती ऑनलाइन व्यापक फसवणूक, आर्थिक लूट आणि सोशल मीडियावरील गुन्हेगारी चिंतेचा विषय बनली आहे. यावर मात करण्यासाठी आणि सायबर गुन्ह्यांपासून नागरिकांचे संरक्षण करण्यासाठी राज्यात जनजागृती मोहीम राबवण्याचा अत्यंत महत्त्वाचा निर्णय गृह विभागाने घेतला आहे. नागरिकांना डिजिटल साक्षर करून सायबर गुन्हेगारांचे मनसुबे उधळून लावण्यासाठी या मोहिमेकरिता २० कोटी रुपयांची भरघोस तरतूद करण्यात आली आहे. तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर आणि महिला व नागरिकांच्या सुरक्षेची हमी या सूत्रावर आधारलेला हा निर्णय राज्य सरकारचा 'सुरक्षित महाराष्ट्राचा संकल्प' अधिक दृढ करणारा ठरला आहे.



## महत्त्वाचे

### शेअर बाजारात सुखाचा 'सोमवार'

**मुंबई** : शुक्रवारच्या घसरणीनंतर, भारतीय शेअर बाजाराने सोमवार, २२ जून रोजी जोरदार पुनरागमन केले. अमेरिकेत सुरू असलेल्या अमेरिका-इराण शांतता चर्चेतील सकारात्मक घडामोडींमुळे कच्च्या तेलाच्या किमतीत मोठी घसरण झाली. याचा फायदा भारतीय बाजाराला झाला आणि निफ्टीने पुन्हा एकदा वेग घेत २४ हजार १०० चा टप्पा ओलांडला. रिलायन्स इंडस्ट्रीज या दिग्गज कंपनीच्या शेअर्समधील वाढीमुळे बाजारातील गुंतवणूकदारांचा उत्साह अधिकच वाढला. रिलायन्सची दूरसंचार कंपनी जिओ प्लॅटफॉर्म्सने आयपीओसाठी 'सेबी'कडे मसुदा दाखल केला आहे, ज्याचा सकारात्मक परिणाम बाजारावर दिसून आला.

## उद्धव ठाकरेंना धक्का देत सहा खासदार शिवसेनेत

### 'ऑपरेशन टायगर' फत्ते!

**मुंबई, २२ जून**
शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या सहा खासदारांनी सोमवारी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत शिवसेनेत जाहीर पक्षप्रवेश केला आहे. ठाकरे गटाची साथ सोडून आलेल्या या खासदारांमध्ये संजय जाधव, नागेश पाटील आष्टीकर, संजय देशमुख, ओमराजे निंबाळकर, भाऊसाहेब वाकचौरे आणि संजय दिना पाटील यांचा समावेश आहे. या सर्व नेत्यांनी एकनाथ शिंदेंच्या उपस्थितीत हातात शिवसेनेचा भगवा झेंडा घेतला आहे.

या पक्षप्रवेशावेळी बोलताना एकनाथ शिंदे यांनी आपल्या नेहमीच्या शैलीत विरोधकांचा खरपूस समाचार घेतला. प्रसारमाध्यमांमध्ये काय चालतं यापेक्षा आम्ही थेट कृती करून दाखवतो, असे सांगत त्यांनी उपस्थित सर्व खासदारांचे नावे घेऊन स्वागत केले. पक्षात आधीच संजय राठोड असताना आता आणखी तीन संजय आल्यामुळे पक्षात 'ट्रिपल संजय'ची ताकद निर्माण झाली आहे, अशी फटकेबाजी त्यांनी केली. त्यामुळे आता समोरच्या बाजूला कुणाची गिनतीच उरलेली नाही, असा टोलाही त्यांनी लगावला. हे सर्व खासदार मतदारसंघात जमिनीवर काम करणारे आणि जनतेशी जोडलेले 'टायगर' असून, ते कुणाला तुडवायला किंवा आडवायला आलेले नाहीत, तर शिवसेना वाढवायला आले आहेत, असा टोलाही त्यांनी लगावला.

पक्षप्रवेशाचा हा सोहळा म्हणजे शिवसेना वाचवण्याच्या लढ्याचा दुसरा टप्पा असल्याचे एकनाथ शिंदे यांनी स्पष्ट केले. शिवसेना हे एक कुटुंब असून, बाळासाहेबांच्या आणि हिंदुत्वाच्या खऱ्या विचारधारेवर विश्वास ठेवून हे कट्टर शिवसैनिक खासदार आज आपल्या परिवारात सामील झाले आहेत. काही लोक मीडियामध्ये उलट-सुलट बातम्या पसरवत आहेत, पण आम्ही सर्व कायदेशीर बाबी पूर्ण करूनच हा निर्णय घेतला असून आमचे 'ऑपरेशन टायगर' आता १०० टक्के यशस्वी झाले आहे, असे शिंदे म्हणाले. (तभा वृत्तसेवा)

## 'उबाठा'कडून उद्योगपतींची दलाली

### भाजपाचे मुख्य प्रवक्ते नवनाथ बन यांची टीका

**मुंबई, २२ जून**
एकीकडे अंबानी-अदानींवर टीका करायची आणि दुसरीकडे रेड कार्पेट टाकून त्यांचे स्वागत करत त्यांच्या लग्नात नाचायचे, असा दुटप्पीपणा उबाठा गटाचा आहे. त्यामुळे उद्योगपतींची दलाली कोण करते, हे संपूर्ण महाराष्ट्राने पाहिले असून दलाली आणि गद्दारी करणे हाच तुमचा धर्म आहे, असा हल्लाबोल भाजपाचे प्रदेश मुख्य प्रवक्ते नवनाथ बन यांनी सोमवारी केला.

'मुंबई महाराष्ट्रापासून तोडणार, मुंबई व्यापाऱ्यांच्या खिशात घालणार' हे मुद्दे आता जुने झाले आहेत. भाजपाला डिवचण्यापेक्षा तुम्ही मुंबईतील मराठी माणसाचे रक्त कसे प्यायलात आणि त्यांची कशी लूट केली, यावर बोला. विधानसभेसह महापालिका निवडणुकांमध्येही महाराष्ट्रातील आणि मुंबईतील जनतेने तुमची मस्ती जिरवून तुम्हाला तुमची जागा दाखवून दिली आहे. येत्या काळातही मुंबईकर तुम्हाला मतरूपी लाथा घालून घरी बसवल्याशिवाय राहणार नाहीत, असा इशाराही बन यांनी दिला. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी शिवसेना तोडली नसल्याचे स्पष्ट करत नवनाथ बन म्हणाले की, संजय राऊत आणि उबाठा गटाने स्वतःचा पक्ष काँग्रेसच्या चरणी अर्पण केला आहे. हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आणि हिंदुत्वाच्या विचारांशी गद्दारी करण्याचे काम त्यांनी केले. याउलट, बाळासाहेबांचे विचार पुढे नेण्याचे काम एकनाथ शिंदे करत असून त्यांचीच मूळ शिवसेना आहे. ओमराजे निंबाळकर यांच्यासह अनेक खासदार त्यांना पाठिंबा देऊन हा वारसा पुढे नेत आहेत.

#### नाशिकमधील बंडखोरीची समिती नेमून चौकशी

नाशिक विधान परिषद निवडणुकीत महायुतीला बसलेल्या फटक्याबाबत बोलताना ते म्हणाले की, या मतदारसंघात महायुतीला निश्चितच फटका बसला आहे. ही बंडखोरी का झाली आणि कोणी समर्थन दिले, याची चौकशी करण्यासाठी एक समिती स्थापन केली जाईल. यासंदर्भात देवेंद्र फडणवीस, एकनाथ शिंदे आणि सुनेत्रा पवार हे महायुतीचे नेते एकत्र बसून योग्य तो निर्णय घेतील. मात्र, विरोधकांनी स्वतःच्या स्थितीकडे पाहावे. या निवडणुकीत महाविकास आघाडीचा पूर्ण खेळखंडोबा झाला असून त्यांना १७ पैकी एकही जागा जिंकता आली नाही, याकडे त्यांनी लक्ष वेधले.

#### राऊतांनी घेतली उबाठा संपवण्याची सुपारी

संजय राऊतांनी काँग्रेसकडून उबाठा गट संपवण्याची सुपारी घेतली असल्याचा गंभीर आरोप नवनाथ बन यांनी केला. देवेंद्र फडणवीस आणि एकनाथ शिंदे हे एकदिलाने काम करत आहेत. मात्र, उबाठा गटामध्ये मिलिंद नार्वेकर आणि भास्कर जाधव यांच्यात उघड युद्ध सुरू असून ते रोज एकमेकांना शिव्याशाप देत आहेत. त्यामुळे राऊतांनी आधी आपल्या पक्षात आणि उरल्यासुरल्या गटांमध्ये किती गटबाजी उफाळून आली आहे, याकडे लक्ष द्यावे, असा टोलाही त्यांनी लगावला. (तभा वृत्तसेवा)



## विधान भवनात ई-प्रवेश बंधनकारक

**मुंबई २२ जून**
महाराष्ट्र विधिमंडळाचे पावसाळी अधिवेशन सोमवारपासून मुंबई येथे सुरू झाली आहे. या अधिवेशन कालावधीत आमदार, अधिकारी, कर्मचारी आणि पत्रकार यांना ई-प्रवेश प्रणाली बंधनकारक केली आहे. त्यामुळे अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी अधिकारी आणि पत्रकार यांची चांगलीच तारांबळ उडाली असल्याने विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी सदर ए प्रवेशाची प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी एक दिवसाचा अवधी वाढवून देत असल्याचे घोषित केले. मंत्रालय प्रमाणे विधान भवनातही पावसाळी अधिवेशन पासून ई प्रणाली च्या माध्यमातून प्रवेश देण्याबाबत प्रक्रिया लागू करण्याचा नर्णिय घेतला. दोन दिवसापूर्वी नर्णिय घेतल्याने अधिवेशनाशी संबंधित सर्व अधिकारी कर्मचारी आणि पत्रकार यांची सोमवारी चांगलीच धावपळ झाली.

## आध्यात्मिक वैभवाला सरकारचे पाठबळ

### मोझरी, वलगाव, कौंडण्यपूरसह कोराडीसाठी कोट्यवधींचा निधी





**मुंबई, २२ जून**
विदर्भाला लाभलेला थोर संतांचा आणि प्राचीन मंदिरांचा आध्यात्मिक वारसा अधिक वृद्धिंगत करण्यासाठी राज्य सरकारने तिजोरीचे दरवाजे उघडले आहेत. राज्य विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनात मांडण्यात आलेल्या २०२६-२०२७ च्या पुरवणी मागण्यांमध्ये विदर्भातील महत्त्वाच्या तीर्थक्षेत्रांच्या आणि सांस्कृतिक स्थळांच्या विकासासाठी कोट्यवधी रुपयांची भरघोस तरतूद करण्यात आली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या नेतृत्वाखालील सरकारने या माध्यमातून विदर्भाच्या विकासाला एक नवी दिशा दिली आहे.

अमरावती जिल्ह्यातील राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या गुरुकुंज आश्रम (मोझरी) परिसराच्या सर्वांगीण विकासासाठी ५० कोटी रुपयांची मोठी तरतूद करण्यात आली आहे. तर वंदनीय संत गाडगेबाबा यांच्या निर्वाण भूमीच्या (वलगाव) विकासासाठी ११ कोटी रुपये मंजूर करण्यात आले आहेत. श्री क्षेत्र कौंडण्यपूर येथील पायाभूत नागरी सुविधांसाठी १२ कोटी रुपये, तर तिवसा येथेच उभारण्यात येणाऱ्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या स्मारकासाठी २ कोटी रुपये देण्यात आले आहेत.

नागपूर शहर आणि परिसरातील लाखो भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या मंदिरांच्या सुशोभीकरणासाठी आणि सोयी-सुविधांसाठीही सरकारने खजिना खुला केला आहे. विदर्भातील भाविकांचे मोठे शक्तिपीठ असलेल्या कोराडी येथील श्री महालक्ष्मी जगदंबा संस्थानच्या तीर्थस्थळ विकास आराखड्या'च्या अंमलबजावणीसाठी २० कोटी रुपये देण्यात आले आहेत. नागपूर शहरातील श्री लक्ष्मी नारायण मंदिर, कुतेवाला बाबा मंदिर आणि मुरलीधर मंदिर या प्राचीन आणि ऐतिहासिक तीर्थक्षेत्रांच्या विकासासाठी १६.८१ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. (तभा वृत्तसेवा)

#### कुंभमेळा आणि पंढरीसाठीही ऐतिहासिक रसद

विदर्भासोबतच संपूर्ण राज्याचा प्रखर हिंदुत्ववादी आणि सांस्कृतिक वारसा जोपासण्यासाठी सरकारने राज्यभरातील इतर मोठ्या प्रकल्पांनाही निधी दिला आहे. आगामी सिंहस्थ कुंभमेळ्याच्या सूक्ष्म नियोजनासाठी आणि भाविकांच्या सुविधांसाठी तब्बल ३००० कोटी रुपयांची महाकाय तरतूद करण्यात आली आहे. तसेच, आराध्य दैवत असलेल्या पंढरपूरच्या श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिर परिसर विकास आणि वाणिज्य संकुल आराखड्यासाठी ६०० कोटी रुपये मंजूर करण्यात आले आहेत. आंबेगाव (पुणे) येथील महत्त्वाकांक्षी 'शिवसृष्टी' प्रकल्पासाठीही ५० कोटी रुपयांची विशेष आर्थिक रसद पुरवण्यात आली आहे.

## मुंबईत 'स्कूल जिहाद'चा प्रकार उघडकीस

### गोवंडी-मानखुर्दमध्ये बोगस शाळांचा सुळसुळाट

**मुंबई, २२ जून**
देशाच्या आर्थिक राजधानीत 'स्कूल जिहाद'चा अत्यंत गंभीर प्रकार सुरू असल्याचा आरोप भाजपा नेते किरीट सोमय्या यांनी केला आहे. मुंबई महानगरपालिकेने २०२१ ते २०२६ या कालावधीत तब्बल ८४९ शाळा अनधिकृत म्हणून घोषित केल्या आहेत. विशेष म्हणजे, यापैकी सर्वाधिक ३३ टक्के म्हणजेच तब्बल २८९ शाळा या केवळ गोवंडी आणि मानखुर्द या एकाच भागात असल्याचे सोमय्या यांनी उघडकीस आणले आहे.

किरीट सोमय्या यांनी त्यांच्या अधिकृत 'एक्स' खात्यावरून यासंदर्भात सविस्तर माहिती दिली.

या अनधिकृत शाळांच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणावर सरकारी जमिनी हडप केल्या जात आहेत. तसेच, या ठिकाणी नियम धाब्यावर बसवून तीन-तीन मजल्यांच्या बेकायदेशीर इमारती उभारल्या जात असल्याचे त्यांनी निदर्शनास आणून दिले आहे. या शाळा केवळ अनधिकृत बांधकामांपुरत्या मर्यादित राहिलेल्या नाहीत, तर त्यातून देशाच्या आणि शहराच्या सुरक्षेला थेट धोका पोहोचवणारे प्रकार घडत आहेत. या बोगस शाळांमधून बेकायदेशीर 'शाळा सोडल्याचे दाखले' वितरित केले जात आहेत. याच खोट्या दाखल्यांच्या आधारे आधार कार्ड, जन्मदाखले आणि बनावट मतदान ओळखपत्रे मिळवली जात असल्याचा अत्यंत गंभीर दावा सोमय्या यांनी केला आहे. (तभा वृत्तसेवा)

#### 'स्कूल जिहाद' मोडून काढणार!

एका विशिष्ट भागात बेकायदेशीर शाळांचे पेव फुटणे आणि त्यातून बोगस नागरिकत्वाची कागदपत्रे तयार होणे हा अत्यंत चिंतेचा विषय आहे. हा उघडपणे 'स्कूल जिहाद' सुरू असून, तो आम्ही कोणत्याही परिस्थितीत थांबवू,, असा सज्जड इशारा भाजपा नेते किरीट सोमय्या यांनी दिला आहे. सध्या राज्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या नेतृत्वाखालील सरकार कार्यरत आहे. त्यामुळे राज्य सरकारने या 'स्कूल जिहाद'च्या प्रकरणाची तत्काळ गंभीर दखल घेत या संपूर्ण रॅकेटच्या मुळाशी जाऊन या बेकायदेशीर शाळांवर धडक कारवाई करावी, अशी अपेक्षा आता व्यक्त केली जात आहे.

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा,
छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली,
जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर
(कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## अग्रलेख

# कर्जबुडव्यांची कारस्थाने

सर्वोच्च न्यायालयाने अलिकडेच केलेल्या एका निरीक्षणामुळे भारताच्या बँकिंग व्यवस्थेबाबत नव्याने चर्चा सुरू झाली आहे. सार्वजनिक क्षेत्रातील बँकांनी वितरित केलेले हजारो कोटी रुपयांचे कर्ज अत्यल्प रकमेत 'सेटल' केले जात असल्याच्या आरोपांवर सुनावणी करताना न्यायालयाने बँका, मालमत्ता पुनर्रचना कंपन्या (असेट रिकन्स्ट्रक्शन कंपनीज-एआरसी) आणि कर्जदार यांच्यातील संगनमताबद्दल गंभीर चिंता व्यक्त केली. बँकांमार्फत दिले जाणारे कर्ज म्हणजे कोणत्याही खाजगी व्यक्तीचे पैसे नसून, ते जनतेच्या ठेवी, करदात्यांच्या पैशांवर उभ्या असलेल्या व्यवस्थेचे प्रतिनिधित्व करतात, याकडे लक्ष वेधताना कर्ज वसुलीसाठी प्रयत्न न करणे स्वीकारार्ह नाही, असे न्यायालयाचे म्हणणे आहे. खरे तर कर्जबुडव्यांच्या कारस्थानाची ही कहाणी नवी नाही. गेली अनेक दशके, अनेक प्रकारचे कर्जबुडवे सतत बँकांना टोपी घालत आहेत आणि त्यायोगे सामान्यांना लुबाडत आहेत. गेल्या दोन दशकांत भारताच्या बँकिंग क्षेत्रात गंभीर स्वरूप धारण केलेली ही समस्या आहे. मोठ्या उद्योगसमूहांनी घेतलेली कर्जे, त्यांचे थकबाकीत रूपांतर, एआरसीमार्फत झालेले व्यवहार आणि शेवटी अत्यल्प रकमेत झालेली 'सेटलमेंट' या संपूर्ण साखळीकडे संशयाने पाहावे अशीच परिस्थिती आहे.

यापूर्वी सार्वजनिक बँकांनी केलेल्या अशा व्यवहारांचा इतिहास पाहिला तर सर्वोच्च न्यायालयासमोर आलेला विषय तसा किरकोळ म्हटला पाहिजे. सार्वजनिक क्षेत्रातील बँकांचे सुमारे १,५३७ कोटी रुपयांचे थकित कर्ज दोन एआरसींच्या माध्यमातून केवळ ७३.५ कोटी रुपयांत सेटल करण्यात आले, हा तो विषय. हा दावा खरा असेल तर बँकांना आपल्या देय रकमेपैकी पाच टक्क्यांपेक्षाही कमी रक्कम स्वीकारून सेटलमेंट केले असा अर्थ काढता येतो. हा फरक सामान्य नागरिकाच्या दृष्टीने समजून घेण्यासाठी एक साधे उदाहरण देता येईल. एखाद्या व्यक्तीने १० लाखांचे कर्ज घेतले आणि नंतर ते केवळ ५० हजार रुपये देऊन संपवले, तर बँकेचे किती नुकसान होईल? आणि बँकेचे नुकसान म्हणजे कुणाचे नुकसान असते? हजारो कोटी रुपयांच्या व्यवहारांमध्ये असे घडत असेल, तर त्याचे परिणाम किती गंभीर असतील याचा अंदाज बांधणे अवघड नाही. पाच हजाराची इन्स्टॉलमेंट चुकली तर बँकांकडून फोनावर फोन, मेलवर मेल येतात आणि शेकडो-हजारो कोटी रुपयांच्या थकबाकीवर अशा प्रकारे मार्ग काढले जात असतील तर सामान्यांना संताप येणारच. १९९० नंतरच्या आर्थिक सुधारणांच्या काळात बँकांच्या बुडीत कर्जांची समस्या वाढू लागली. अनेक उद्योग, पायाभूत सुविधा प्रकल्प आणि व्यावसायिक उपक्रम आर्थिक अडचणीत आले. परिणामी, बँकांच्या ताळेबंदात मोठ्या प्रमाणात एनपीए (नॉन परफॉर्मिंग असेट्स) दिसू लागले. अर्थात वसुलीत अडचण असलेल्या त्या रकमा होत्या. या समस्येवर उपाय म्हणून एआरसीची संकल्पना पुढे आली होती. एआरसीचे काम म्हणजे बँकांकडून बुडीत कर्जे विकत घेणे आणि नंतर त्यांची वसुली करणे. वरकरणी ही व्यवस्था योग्य वाटते. कारण बँकेला तत्काळ काही रक्कम मिळते आणि वसुलीची जबाबदारी एआरसीकडे जाते. त्यामुळे बँकेच्या ताळेबंदावरील ताण कमी होतो. मात्र, प्रत्यक्ष व्यवहारात ही व्यवस्था किती पारदर्शक आहे, हा प्रश्नच आहे. सर्वोच्च न्यायालयाने व्यक्त केलेली चिंता याच मुद्याभोवती फिरणारी आहे. एखादे कर्ज त्याच्या वास्तविक मूल्यापेक्षा अत्यल्प किमतीत निकाली काढले जात असेल तर त्या व्यवहाराचा फायदा नेमका कोणाला होतो, हा यातील कळीचा प्रश्न. संबंधित उद्योग खरोखरच पूर्णपणे आर्थिकदृष्ट्या कोलमडला असेल आणि वसुलीची कोणतीही शक्यता नसेल तर कमी रक्कम स्वीकारणे एकवेळ व्यवहार्य म्हणता येईल. तसे नसेल तर मात्र काही तरी कारस्थान असणार, अशी शंका घेता येते. कर्जदार, एआरसी आणि काही बँक अधिकारी यांच्यातील संगनमतामुळे कर्जाचे मूल्य मुद्दाम कमी दाखवले गेले तर सार्वजनिक पैशाचे प्रचंड नुकसान होऊ शकते. न्यायालयाने याच संभाव्य धोक्याकडे लक्ष वेधले आहे. अनेकांना असे वाटते की बँकेचे नुकसान म्हणजे बँकेच्या व्यवस्थापनाचे नुकसान असते. परंतु सार्वजनिक क्षेत्रातील बँकांच्या बाबतीत ही समजूत चुकीची आहे. सार्वजनिक बँकांमध्ये ठेवलेला पैसा हा लाखो ठेवीदारांचा असतो. याशिवाय बँकांना सरकारकडून भांडवली मदत दिली जाते. एखाद्या बँकेला मोठ्या प्रमाणावर नुकसान होते, तेव्हा सरकारला त्या बँकेचे पुनर्भांडवलीकरण करावे लागते. यासाठी वापरला जाणारा पैसा शेवटी करदात्यांचाच असतो.

भारताच्या बँकिंग व्यवस्थेवर नेहमीच एक आरोप केला जातो. तो म्हणजे छोट्या कर्जदारांवर कठोर कारवाई होते आणि मोठ्या कर्जदारांबाबत तुलनेने मवाळ भूमिका घेतली जाते. हा आरोप तथ्यहीन नाही. शेतीच्या कर्जाचा हप्ता थकवणाऱ्या शेतकऱ्याला लगेच नोटीस मिळते. घरकर्जाचा हप्ता थकल्यास मालमत्ता जप्त करण्याची प्रक्रिया सुरू होते. वाहन कर्ज थकल्यास वाहन उचलले जाते. मात्र, हजारो कोटी रुपयांची कर्जे थकवणाऱ्या उद्योगसमूहांच्या बाबतीत अनेकदा दीर्घकालीन पुनर्रचना, पुनर्वित्तपुरवठा, सवलती आणि सेटलमेंटचे पर्याय उपलब्ध करून दिले जातात. बँकेच्या ग्राहकांबाबतचा हा भेदाभेद संतापजनक आहेच. गेल्या दीडेक दशकात बँकिंग क्षेत्राला मोठ्या एनपीएच्या संकटाचा सामना करावा लागला हे खरे. पायाभूत सुविधा, ऊर्जा, पोलाद, दूरसंचार आणि रिअल इस्टेट क्षेत्रातील अनेक प्रकल्प अडचणीत आले. परिणामी, सार्वजनिक क्षेत्रातील बँकांची लाखो कोटी रुपयांची कर्जे अडकली. अनेक बँकांना मोठ्या प्रमाणावर तोटा सहन करावा लागला. सरकारला त्यांचे हजारो कोटी रुपयांचे पुनर्भांडवलीकरण करावे लागले. त्यावरच्या उपायांचा भाग म्हणून एआरसीसारख्या यंत्रणांनी काम करावे, अशी अपेक्षा आहे. बहुतांशी होतेय ते उलटेच. एआरसी हा वित्तीय व्यवस्थेतील महत्त्वाचा घटक आहे. परंतु, अशा महत्त्वाच्या संस्थांकडे अधिक पारदर्शकता आणि उत्तरदायित्व असणे आवश्यक असते. थकित कर्जाचे मूल्यांकन कसे होते? ते कोणत्या किमतीत विकले जाते? खरेदीदार कोण आहे? नंतरची सेटलमेंट कोणत्या अटींवर केली जाते? आणि संबंधित कर्जदाराशी कुणाचे अप्रत्यक्ष संबंध आहेत का? या सर्व बाबींची तपासणी आवश्यक ठरते. ती होत असेल तरी त्यात पारदर्शिता नाही. सर्वोच्च न्यायालयाच्या ताज्या निरीक्षणाचे महत्त्व असे की, भारतातील बँकिंग व्यवस्थेतील सर्वांत मोठ्या नैतिक आणि आर्थिक प्रश्नांपैकी एकावर त्याने बोट ठेवले आहे. कर्जबुडवे, बँका आणि मालमत्ता पुनर्रचना कंपन्या यांच्यातील संबंध पारदर्शक, निष्पक्ष आणि सार्वजनिक हिताला पूरक असणे आवश्यक आहे. अन्यथा जनतेचा पैसा काही मोजक्या लोकांच्या फायद्यासाठी वापरला जात असल्याची भावना अधिक बळावेल, असा या निरीक्षणाचा अर्थ आहे. लोकशाही व्यवस्थेत करदात्यांचा पैसा हे सार्वजनिक वित्त व्यवस्थेवरील विश्वासाचे प्रतीक मानले जाते. ही व्यवस्था आपल्या कल्याणासाठी काम करते या विश्वासापोटी ठेवी दिल्या जातात. त्या विश्वासाचे संरक्षण करणे ही केवळ बँकांची किंवा सरकारचीच नव्हे, तर न्यायव्यवस्थेचीही जबाबदारी आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या ताज्या हस्तक्षेपामुळे या दिशेने महत्त्वाचे पाऊल पडल्याचे दिसते. पण, हा विषय सतत पुढे जात राहिला पाहिजे. इतिहासातही जी मोठी कर्जे 'सेटल' झालेली आहेत, त्यांची तपासणी झाली पाहिजे. जे लोक बँकांना आणि पर्यायाने सामान्यांना लुबाडत आहेत, त्यांना देशाचे शत्रू म्हणून वागवायचे की त्यांचा पाहुणचार करायचा, यावर धोरणात्मक निर्णय बँकिंग क्षेत्राला घ्यावा लागेल. त्यासाठी सर्वोच्च न्यायालयाने एक दिशा दिली आहे. आता कर्जबुडव्यांच्या कारस्थानांच्या कहाण्या उघडकीस आणण्याची जबाबदारी सरकारची आहे. ■

## आंतरराष्ट्रीय

# भारताच्या युरोप धोरणाला नवी ताकद

**प्रा. जयसिंग यादव**

भारताचे परराष्ट्र धोरण गेल्या दशकात केवळ सीमांचे संरक्षण किंवा पारंपरिक मैत्री जपण्यापुरते मर्यादित राहिलेले नाही. आज भारत जगभरात आर्थिक, तांत्रिक, सामरिक आणि राजनैतिक हितसंबंधांचे विस्तृत जाळे उभारत आहे. 'बहुआयामी परराष्ट्र धोरण' ही भारताची नवी ओळख बनली आहे. अमेरिका, रशिया, फ्रान्स, जपान, ऑस्ट्रेलिया, आखाती देश आणि आफ्रिकी राष्ट्रांबरोबरच आता युरोपमधील लहान पण धोरणात्मकदृष्ट्या महत्त्वाच्या देशांशीही भारत संबंध दृढ करत आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या स्लोव्हाकिया दौऱ्याने याच नव्या धोरणाला अधिक स्पष्ट दिशा दिली आहे. स्वातंत्र्यानंतर प्रथमच एखाद्या भारतीय पंतप्रधानाने स्लोव्हाकियाला भेट दिली आणि दोन्ही देशांनी आपल्या संबंधांना 'व्यापक भागीदारी' (कॉंप्रिहेन्सिव्ह पार्टनरशिप) या स्तरावर नेण्याचा निर्णय घेतला. या दौऱ्यात संरक्षण, ऊर्जा, डिजिटल तंत्रज्ञान, उच्च शिक्षण, क्वांटम कम्युनिकेशन, स्थलांतर, उद्योग आणि व्यापार अशा विविध क्षेत्रांमध्ये तब्बल अकरा करार झाले. वरकरणी हा द्विपक्षीय दौरा वाटत असला, तरी त्यामागे भारताच्या बदलत्या जागतिक रणनीतीचा व्यापक संदेश दडलेला आहे. आजचे जागतिक राजकारण शीतयुद्धाच्या काळापेक्षा पूर्णपणे वेगळे आहे. अमेरिका-चीन संघर्ष, रशिया-युक्रेन युद्ध, पश्चिम आशियातील अस्थिरता, पुरवठा साखळीतील बदल, ऊर्जासंकट आणि तांत्रिक स्पर्धा यामुळे जगात नवी शक्तिसमीकरणे तयार होत आहेत. अशा परिस्थितीत प्रत्येक देश विश्वासार्ह भागीदारांचा शोध घेत आहे. भारतासाठीही ही एक मोठी संधी आहे.

जगातील सर्वाधिक वेगाने वाढणारी अर्थव्यवस्था, प्रचंड बाजारपेठ, कुशल मनुष्यबळ आणि स्थिर लोकशाही यामुळे भारताचे महत्त्व झपाट्याने वाढत आहे. स्लोव्हाकिया हा आकाराने लहान देश असला, तरी युरोपीय महासंघ आणि 'नाटो'चा महत्त्वाचा सदस्य आहे. ऑटोमोबाईल उद्योग, संरक्षण उत्पादन, यांत्रिक अभियांत्रिकी, इलेक्ट्रॉनिक्स आणि अत्याधुनिक उत्पादन तंत्रज्ञानात त्याने मोठी प्रगती केली आहे. युरोपमधील अनेक नामांकित वाहन उत्पादकांचे उत्पादन केंद्र स्लोव्हाकियात आहे. त्यामुळे भारतासाठी हा देश केवळ व्यापार भागीदार नसून आधुनिक तंत्रज्ञानाचा स्रोत ठरू शकतो. भारताने गेल्या काही वर्षांमध्ये 'मेक इन इंडिया' आणि 'आत्मनिर्भर भारत' या संकल्पनांना मोठ्या प्रमाणावर चालना दिली आहे. संरक्षण, इलेक्ट्रॉनिक्स, रेल्वे, हरित ऊर्जा आणि सेमीकंडक्टर उत्पादनात स्वदेशी क्षमता वाढवण्यावर भर दिला जात आहे; मात्र स्वावलंबन म्हणजे जगापासून दूर जाणे नव्हे, तर जागतिक भागीदारीच्या



माध्यमातून आधुनिक तंत्रज्ञान आत्मसात करणे होय. स्लोव्हाकियाबरोबरचे करार याच उद्दिष्टाला पूरक ठरणारे आहेत. विशेषतः संरक्षण सहकार्याचा विचार केला, तर त्याचे दूरगामी परिणाम दिसू शकतात. भारत आज जगातील सर्वांत मोठ्या संरक्षण आयातदारांपैकी एक असला, तरी त्याचबरोबर स्वदेशी संरक्षण उत्पादन वाढवण्याचा प्रयत्नही करत आहे. स्लोव्हाकियाकडे संरक्षणक्षेत्रातील प्रगत अभियांत्रिकी, लष्करी वाहने, तोफखाना आणि विशेष उपकरणांच्या निर्मितीचा अनुभव आहे.

स्लोव्हाकियाबरोबरील ऊर्जासुरक्षेच्या क्षेत्रातील सहकार्यही तेवढेच महत्त्वाचे आहे. वाढत्या अर्थव्यवस्थेमुळे भारताची ऊर्जेची गरज सातत्याने वाढत आहे. कोळसा आणि तेलावरचे अवलंबित्व कमी करून अणुऊर्जा, हरित ऊर्जा आणि स्वच्छ तंत्रज्ञानाकडे वळण्याची गरज निर्माण झाली आहे. स्लोव्हाकियाला अणुऊर्जेचा मोठा अनुभव आहे. त्यामुळे या क्षेत्रातील सहकार्य भारतासाठी उपयुक्त ठरू शकते. ऊर्जा सुरक्षेबरोबरच ऊर्जा संक्रमणाचा मार्गही यामुळे अधिक सुलभ होईल. या दौऱ्यात भारत-युरोपीय महासंघ मुक्त व्यापार कराराला (एफटीए) गती देण्याबाबत दोन्ही देशांनी सकारात्मक भूमिका घेतली. हा करार निश्चित झाल्यास भारतीय उद्योगांसाठी युरोपमधील सुमारे ४५ कोटी ग्राहकांची बाजारपेठ अधिक खुली होईल. माहिती तंत्रज्ञान, औषधनिर्मिती, वस्त्रोद्योग, कृषी प्रक्रिया, अभियांत्रिकी आणि स्टार्टअप क्षेत्रांना त्याचा मोठा फायदा होऊ शकतो. दुसरीकडे, युरोपियन गुंतवणूक भारतात वाढण्याची शक्यताही निर्माण होईल. भारताच्या निर्यातीसाठी युरोपीय बाजारपेठ अत्यंत महत्त्वाची आहे. चीनवरील अवलंबित्व कमी करण्यासाठी युरोपीय उद्योग भारताकडे पर्यायी उत्पादन केंद्र म्हणून पाहत आहेत. भारताने ही संधी ओळखून पायाभूत सुविधा, उत्पादनक्षमता आणि धोरणात्मक स्थिरतेवर भर दिला पाहिजे. भारतीय उद्योग जागतिक स्पर्धेला समर्थपणे सामोरे जातील तेव्हाच मुक्त व्यापार कराराचा लाभ मिळेल. या दौऱ्याचा आणखी एक महत्त्वाचा पैलू म्हणजे कुशल मनुष्यबळाची देवाणघेवाण.

आज युरोपमधील अनेक देश वृद्धत्वाकडे झुकणाऱ्या लोकसंख्येमुळे कुशल कामगारांच्या कमतरतेचा सामना करत आहेत. भारताकडे मात्र मोठ्या प्रमाणावर प्रशिक्षित तरुण मनुष्यबळ उपलब्ध आहे. दोन्ही देशांमधील श्रम स्थलांतर करारामुळे भारतीय अभियंते, डॉक्टर, संशोधक, आयटी व्यावसायिक आणि तंत्रज्ञांना नवीन संधी उपलब्ध होऊ शकतात. त्याचबरोबर सामाजिक सुरक्षा करारामुळे परदेशात काम करणाऱ्या भारतीयांच्या हितांचेही संरक्षण होईल. भविष्यात चलतीत राहू शकणाऱ्या डिजिटल तंत्रज्ञान आणि 'क्वांटम कम्युनिकेशन' या क्षेत्रांमधील सहकार्याचे महत्त्वही कमी नाही. दोन देशांमध्ये अनेकदा मोठमोठे करार होतात; पण त्यांची अंमलबजावणी होत नाही. त्यामुळे भारत आणि स्लोव्हाकिया यांनी केलेल्या करारांचे प्रत्यक्ष परिणाम दिसणे अधिक महत्त्वाचे ठरणार आहे. संयुक्त उद्योग, वाढता व्यापार, संशोधन प्रकल्प, तंत्रज्ञान हस्तांतरण आणि विद्यार्थी देवाणघेवाण या क्षेत्रांमध्ये ठोस प्रगती झाली, तरच या भागीदारीचे खरे मूल्य सिद्ध होईल. भारतीय उद्योगांनीही या नव्या संधींचा लाभ घेण्यासाठी सज्ज राहणे आवश्यक आहे. ऑटोमोबाईल, संरक्षण, रेल्वे, माहिती तंत्रज्ञान, हरित ऊर्जा, औषधनिर्मिती आणि यंत्रनिर्मिती क्षेत्रातील कंपन्यांनी स्लोव्हाकियासोबत संयुक्त गुंतवणुकीचा विचार केला पाहिजे. सरकारनेही उद्योगांना आवश्यक धोरणात्मक पाठबळ देणे गरजेचे आहे. आजच्या बहुध्रुवीय जगात भारताचे यश केवळ महासत्तांशी असलेल्या संबंधांवर अवलंबून नाही. लहान; पण तांत्रिकदृष्ट्या सक्षम आणि आर्थिकदृष्ट्या प्रभावी देशांशी मजबूत भागीदारी उभारणे ही काळाची गरज आहे. स्लोव्हाकियासोबतचा करार हा त्याच दूरदृष्टीचा भाग आहे. या दौऱ्याचे महत्त्व केवळ अकरा करारांमध्ये किंवा संयुक्त निवेदनांमध्ये नाही, तर भारताच्या बदलत्या परराष्ट्र धोरणात, युरोपशी वाढत्या आर्थिक संबंधांमध्ये आणि भविष्यातील तांत्रिक सहकार्यात आहे. बदलत्या जागतिक व्यवस्थेत भारताला विश्वासार्ह आणि प्रभावी शक्ती म्हणून स्थापित करण्याच्या दिशेने हा दौरा निश्चितच एक महत्त्वपूर्ण टप्पा मानावा लागेल. ■

(लेखक राज्यशास्त्राचे अभ्यासक आहेत.)

## वेध

**चंद्रकांत लोहाणा**

# दुःखातून आनंद शोधण्याचा प्रयत्न

मनुष्याच्या जगण्यासाठी आधुनिकता ही काळाची गरज असली तरी मनाला भरकटवणारी ही आधुनिकता जगण्याला असह्य करीत आहे. त्यामुळे जन्म आणि मृत्यू या दोघांमधील अंतर पार करताना प्रत्येक जण तारेवरची कसरत करीत असतो. माणसाचे आयुष्य हे सुख-दुःख, यश-अपयश, आशा-निराशा, येणारी अनेक संकटे आणि अनेक समस्यांनी वेढलेले असते. आपल्या जीवनामधील प्रतिकूलतेवर, संकटावर आणि समोर आ वासून उभ्या असलेल्या बिकट परिस्थितीवर मात करून रोजच्या जगण्यामध्ये आनंद फुलविणे हाच जीवन जगण्याचा खरा आनंद आहे. माणूस जोपर्यंत ही कला आत्मसात करीत नाही, तोपर्यंत त्याची फरफट निश्चित असते. जीवनामध्ये प्रत्येकाच्या वाट्याला केवळ सुख येईल असेही नाही. त्यामुळे सहजासहजी सुखावह आणि आनंदी जीवन जगणे कोणालाच शक्य नसले, तरी दुःखामधून आनंद शोधण्याचा प्रयत्न व त्या दुःखाची कारणे शोधण्याचा प्रयत्न केल्यास ती वाट सहज सुलभ करता येऊ शकते. आधुनिकता कितपत आत्मसात करावी हा ज्याचा त्याचा प्रश्न असला तरी ती आपल्या जीवनामध्ये अडसर ठरणार नाही, याचे भान ठेवणेही तेवढेच गरजेचे आहे. आजकाल प्रत्येक जण आपल्यावर असलेल्या जबाबदारीच्या ओझ्याखाली दबून पायाला चाके लागल्यागत धावपळ करीत असतो. कोणालाच कोणासाठी वेळ नाही. नात्यानात्यांमधील हरविलेली माणुसकी आणि आपुलकी सर्वाधिक दुःखाचे कारण आहे. एकटेपणा हा माणसाचा क्रमांक एकचा शत्रू असून, त्यामुळे माणूस नैराश्याच्या खाईमध्ये लोटला जात आहे. जीवनामध्ये आम्ही आमच्या संस्कृतीशी फारकत घेऊन आधुनिकतेचा मार्ग स्वीकारल्यास आमच्या पदरामध्ये काय पडेल याचा विचार आम्ही ना कधी केला आहे, ना करीत आहोत. जो वारसा घेऊन आम्ही पुढे जात आहोत, त्यामुळे येणाऱ्या भावी पिढीवर त्याचा काय परिणाम होऊ शकतो याचे चिंतनही आम्ही कधी केले नाही. देशामध्ये एकत्रित कुटुंब पद्धतीचा दिवसेंदिवस ऱ्हास होत असल्याने त्यापासून मिळणाऱ्या आनंदाला आम्हीच येणाऱ्या भावी पिढीला वंचित ठेवले आहे.

चंचल मनाला भौतिक सुखाच्या नादी लावून मनुष्य स्वतः दुःखाला आमंत्रित करीत असतो. क्षणिक सुख हे भविष्यामध्ये अफाट दुःखाचे कारण ठरू शकते, हे माहीत असूनही आमचा मोह आवरता आवरत नाही. क्षणिक सुख हे मृगजळासारखे असते, हे माहीत असूनही त्यामागे धावून अखेर आयुष्याची राखरांगोळी होतेच. आनंदी जीवन जगण्याचा अर्थ असाही नाही की, जीवनामधील सर्व समस्या आणि संकटे आपोआप नाहीसे होतील. येणाऱ्या प्रत्येक काटेरी मार्गावर, प्रत्येक आव्हानांना न भिता सामोरे गेल्यास जीवनामध्ये येणारे प्रत्येक चढउतार स्वतःच्या मनाला स्वीकारणे सहज शक्य होऊ शकते. सदैव आनंदी राहण्यासाठी नेहमी सकारात्मक विचारांना थारा दिल्यास तेवढीच नकारात्मकता कमी होण्यास मदत होऊ शकते. नकारात्मकतेचा मनावर आणि शरीरावर गंभीर परिणाम होतो. जगामधील कोणतीच व्यक्ती परिपूर्ण नाही आणि असे होणे कदापिही शक्य नाही. त्यामुळे जे काही आहे, ते सांभाळून पुढे वाटचाल सुरू ठेवली तर जीवन जगणे सुकर होऊ शकते. त्यासाठी स्वतःमधील उणिवा ओळखून होत असलेल्या चुकांना सुधारण्याचा प्रयत्न करायला हवा. प्रत्येक व्यक्तीमध्ये काहीतरी गुण-दोष असतातच. त्या दोषांची उजळणी करून ते आपल्या आयुष्यामधून हद्दपार केल्यास तीच व्यक्ती स्वतःला सांभाळून यशाचे शिखर गाठू शकते आणि जीवनात खऱ्या आनंदाची अनुभूती होते. 'आनंद' हा बाजारामध्ये सहज कधीच मिळणार नाही. तो मनाला प्रसन्न करणारी एक आल्हाददायक अनुभूती आहे. ही अनुभूती जीवनामध्ये आत्मसात करणे गरजेचे आहे. त्यासाठी सदैव सकारात्मक बाबींना जवळ करून दुसऱ्यालाही आनंद देण्यास शिकले पाहिजे. लोकांना त्यांचे जीवन आनंदाच्या रंगांनी भरण्यास मदत केली पाहिजे. त्यामुळे आपणास परमोच्च आनंदाची अनुभूती होऊ शकते. आपण जे काही दुसऱ्यास देतो, त्याच्या कितीतरी पट परतावा मिळतो, हा ईश्वराचा अलिखित नियम आहे. त्यासाठी पदरचे पैसे खर्च करण्याचीही गरज नाही. आपल्या आयुष्यात दुःख आणि संकटे कधीच येऊ नये, अशी प्रत्येकाची अपेक्षा असते. हा मुळात मानवी स्वभाव आहे. त्यासाठी तो आयुष्यभर धडपड करीत असतो. मात्र, ही धडपड चुकली की, आयुष्यामध्ये सर्वकाही चुकते. ■

९८८१७१७८५६

## इतस्ततः

# 'आयटी' कंपन्यांमधील अशीही सुलतानी!..

**दत्तात्रेय आंबुलकर**

पुण्यातील हिंजवडी हा भाग संगणक तंत्रज्ञान म्हणजेच, 'आयटी' क्षेत्रातील उद्योगविश्वासाठी प्रसिद्ध असाच. अनेक प्रतिष्ठित व प्रस्थापित उद्योग-व्यवसाय येथे आहेत. 'आयटी' क्षेत्रासाठी प्रसिद्ध असणाऱ्या या भागातील 'थिंक टँक इंडिया प्रा. लिमिटेड' या कंपनीने, अचानकपणे व कुणालाही कसलीही पूर्वसूचना न देता आपले व्यावसायिक कामकाज बंद केले. असे केल्याने कंपनीच्या सुमारे ५०० अभियंता आणि इतर कर्मचाऱ्यांवर बेकारीची कुऱ्हाड कोसळली. याआधी, असे प्रकार, उत्पादन क्षेत्रातील कंपन्यांमध्ये घडल्याचे ऐकू येत असे. यात अनेक लहान वा मध्यम आकाराच्या उद्योगांमधील, १००-२०० कामगारांना बेरोजगारीला सामोरे जाण्याचे प्रसंग बरेचदा घडले आहेत. यावर परिस्थितीनुसार व आपापल्या परीने आंदोलन किंवा संघर्षापासून अगदी बदली-स्थलांतर अथवा कायमस्वरूपी कारखाना बंद करण्यासारखे तोडगे स्वीकारले गेल्याचा इतिहास आहे.मात्र, पुण्यातील अशा प्रकारचा प्रकार म्हणजे 'आयटी'तील आक्रीतच ठरले आहे. मुख्य म्हणजे 'थिंक टँक इंडिया' या कंपनीने, कुणाचाही विचार न करता, कायद्याचाही मुलाहिजा न बाळगता हा निर्णय घेतला. कंपनीच्या या आक्रस्ताळेपणाला वाचा फुटली ती 'थिंक टँक इंडिया'मध्ये काम करणाऱ्या, एका शिकाऊ उमेदवाराने केलेल्या तक्रारीमुळे! कंपनीच्या या निर्णयामुळे इतर कर्मचाऱ्यांप्रमाणेच त्यांची नोकरी जाऊन अचानकपणे बेकारीचा सामना करावा लागणे, हा स्पष्टपणे कर्मचाऱ्यांच्या फसवणुकीचा प्रकार असल्याचा गंभीर आरोपही तक्रारीत करण्यात आला आहे. कर्मचारी आणि कंपनी वा व्यवस्थापनाबाबतच्या तक्रारी, सामान्यपणे कामगार कार्यालय अथवा कामगार वा औद्योगिक न्यायालयात दाखल केल्या जातात. मात्र, 'थिंक टँक' विरोधातील तक्रार हिंजवडी पोलिस ठाण्यात दाखल करण्यात आली, हे विशेष. शिकाऊ उमेदवाराच्या तक्रार व तपशिलाच्या आधारे, पोलिसांनी कंपनीच्या विरोधात गुन्हा दाखल केला. यामध्ये कंपनीने कर्मचाऱ्यांचे वेतन न देणे, अचानक व्यवसाय बंद करून कर्मचाऱ्यांची फसवणूक केल्याप्रकरणी, कायद्याच्या 'कलम ३१६' नुसार विश्वासघात करणे व 'कलम ३१८' म्हणजेच फसवणूक करणे या कलमांतर्गत फौजदारी तक्रार दाखल केली, हेदेखील यासंदर्भात महत्त्वाचे आहे.

या प्रकरणी हिंजवडी पोलिसांनी 'थिंक टँक कंपनी'चे मुख्याधिकारी, प्रशिक्षण व्यवस्थापक व 'एचआर' व्यवस्थापकांच्या विरोधात तक्रार दाखल करून, गुन्हाही नोंदवला आहे. त्यानंतर पोलिसांनी याबाबत प्राथमिक चौकशी करून, कंपनीचे मुख्य कार्यकारी अधिकारी हर्षल ठाकरे यांना नाशिक येथे अटकही केली. पुढे त्यांना पुढील चौकशी व कारवाईसाठी पुण्याला आणण्यात आले.

'थिंक टँक'च्या कर्मचाऱ्यांनुसार, कंपनी प्रामुख्याने संगणक क्षेत्रांतर्गत इतर मोठ्या व्यावसायिक कंपन्यांसाठी 'ॲप'ची निर्मिती करण्याचे काम प्रामुख्याने करीत असे. यासाठी आवश्यक अशा संगणकतज्ज्ञ व इंजिनीअर्सची निवड, प्रामुख्याने छोट्या शहरातून होई. अशा प्रकारे निवड झालेल्या उमेदवारांना ॲपवर आधारित कामकाज व वेब सर्व्हिसचे प्रशिक्षण देऊन, त्यांच्यामार्फतच कंपनीचे कामकाज चालवले जात असे. कंपनीच्या धोरणानुसार, 'थिंक टँक'मध्ये नेमणूक करताना कंपनीच्या निर्णयानुसार प्रत्येक कर्मचाऱ्याकडून लॅपटॉपसाठी १५ हजार रु. घेण्यात आले होते. शिवाय कर्मचाऱ्यांच्या तक्रारीनुसार, त्यांना गेले दोन महिने पगारही देण्यात आला नव्हता. अशा प्रकारे कंपनीने कर्मचाऱ्यांची दिशाभूल व आर्थिक फसवणूक केल्याचा व त्याद्वारे लाखो रुपयांचे नुकसान केल्याचा आरोप, कंपनीच्या कर्मचाऱ्यांतर्फे करण्यात येत आहे.

या प्रकरणातील उपलब्ध तपशिलानुसार, कंपनीने गेल्यावर्षी इंजिनीअर्स आणि विविध विभागातील कर्मचाऱ्यांची मोठी भरती केली होती. त्यासाठी प्रामुख्याने लहान शहरातील उमेदवारांची निवड करण्याला प्राधान्य देण्यात आले होते. या नव्याने उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांना दरमहा १५ हजार रु. वेतन देण्याचेही कंपनीने मान्य केले होते. कंपनीच्या या योजनेला निमशहरी भागातील विद्यार्थी-उमेदवारांकडून चांगलाच प्रतिसाद मिळाला. कंपनीच्या नियमानुसार, नव्याने रुजू होणाऱ्या प्रत्येक उमेदवाराकडून १५ हजार रु. लॅपटॉपसाठी घेऊन, त्यांना कामावर रुजू करून घेण्यात आले.

सुरुवातीला कंपनीमध्ये सर्वकाही सुरळीत सुरू होते. मात्र, फेब्रुवारी २०२६ पासून कर्मचाऱ्यांना विविध अडचणी येऊ लागल्या. त्यांचे पगारही पूर्वीप्रमाणे म्हणजे, महिन्याच्या ७ अथवा ८ तारखेला झाले नाहीत. यावेळी कंपनीच्या व्यवस्थापनाने जुजबी आश्वासने तर दिली. मात्र, कर्मचाऱ्यांचे पगार काही दिले नाहीत. तशातच कंपनीने आता तिचा व्यवसाय बंद केल्याने, या कर्मचाऱ्यांना पगार न मिळणे व कामबंदमुळे होणारी बेकारी अशा दुहेरी संकटांना सामोरे जावे लागत आहे. काही कर्मचाऱ्यांकडून लॅपटॉपसाठी १५ हजार रु. घेऊनही, त्यांना लॅपटॉप न मिळाल्याने तीही फसवणूक झाल्याचे कर्मचाऱ्यांचे गाऱ्हाणे रास्त आहे.

कंपनीतील कर्मचाऱ्यांची फसवणूक होण्याचे 'थिंक टँक' हे एकमेव उदाहरण नाही. 'आयटी' क्षेत्रातील कर्मचाऱ्यांमध्ये काम करणाऱ्या संघटनेच्या अहवालानुसार, सध्या संगणक क्षेत्रात नव्याने दाखल झालेल्या सुमारे चार हजार नव्या तंत्रज्ञांना नोकरीवरून कमी करण्यात आले आहे. अथवा काहींवर टांगती तलवार आहे. याशिवाय, काही 'आयटी' कंपन्यांनी नव्याने उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थी-उमेदवारांना दिलेली, शिकाऊ-प्रशिक्षणार्थींची नेमणूकपत्रे राजरोसपणे रद्द केली आहेत.

आज मुळातच आधीच्या तुलनेत संगणकशास्त्र, 'आयटी' क्षेत्रातील नवागतांना रोजगार मिळण्याच्या संधी कमी झाल्या आहेत. 'ट्रेनिंग ॲण्ड प्लेसमेंट आफिसर्स फेडरेशन'चे अध्यक्ष सतीश बोंडे यांच्यानुसार, २०२५-२६ या शैक्षणिक वर्षात संगणक क्षेत्रात नव्याने उत्तीर्ण झालेल्या केवळ ४० टक्के विद्यार्थ्यांनाच रोजगार मिळाले. त्यातही आता त्यांना नोकरी रोजगार जाण्याची भीतीही भेडसावत आहे. आज असे प्रकार बरेच ठिकाणी होत आहेत. 'थिंक टँक' प्रकरण पुण्याजवळ व हिंजवडीत घडल्याने गाजत आहे, इतरांचे काय? ■

(लेखक 'एचआर' - व्यवस्थापन सल्लागार आहेत.)
९८२२८४७८८६

## वाचक पत्रे

### बांगलादेशात कट्टरवाद्यांचा धुडगूस

सोमवार २२ जूनच्या अंकात, उपरोक्त मथळ्याखालील बातमी वाचण्यात आली. बांगलादेशाची राजधानी ढाका येथे कट्टरवादी जमाते-ए- इस्लामी संघटनेच्या नेतृत्वात आंदोलनकर्त्यांनी; पश्चिम बंगालमध्ये बांगलादेशातून आलेल्या घुसखोरांना सीमापार परत पाठविण्याची जी कडक कारवाई भारत सरकारकडून राबविली जात आहे, त्या विरुद्ध या कट्टरवाद्यांचे आंदोलन सुरू असून त्यांनी ढाका येथील भारतीय उच्चायुक्तालयावर हल्ला करण्याचा देखील प्रयत्न केला आहे. त्यांच्या मते भारत-बांगलादेश सीमेवरील कथित घुसखोरी आणि गोळीबाराच्या घटनांच्या निषेधार्थ हे आंदोलन त्यांनी सुरू केले आहे. जमाते इस्लामीने ही नवीन मोहीम सुरू केली असून त्यांनी भारताविरोधात नागरिकांना भडकविण्याचे काम सुरू केले आहे. अशावेळी भारत सरकारने, भारतातील बांगलादेश आयुक्तालयात कट्टर पंथीयांनी भारताविरुद्ध सुरू केलेल्या या धुडगूसाविरुद्ध कडक शब्दात निषेध नोंदवून बांगलादेश सरकारने असल्या भारत सरकारविरुद्ध नागरिकांना भडकविण्याच्या प्रकाराला वेळीच पायबंद घालावा; अन्यथा नुकत्याच भारत व बांगलादेश दरम्यान सुरू झालेल्या सलोख्याच्या संबंधावर अनिष्ट परिणाम होऊ शकतो, याची जाणीव करून द्यावी. कारण असल्या आंदोलकांना वेळीच आवर न घातला गेल्यास त्याचे लोण भारतात व पश्चिम बंगालमध्ये देखील पोहोचण्यास वेळ लागणार नाही. जमात-ए- इस्लामी समान शेकड्यात मोजाव्या लागतील अशा कट्टर धार्मिक संघटना साऱ्या जगात दहशतवादाने धुडगूस घालत आहेत. अशा संघटनांना वेळीच ठेचणे आवश्यक आहे.

**ॲड. प्रकाश देशपांडे**/पुणे, ७०५८९७५३७६

■■■

### डेटा सेंटर्सचे जाळे : विकास की पर्यावरणाचा ऱ्हास?

आजच्या डिजिटल युगात 'डेटा सेंटर्स' हे तंत्रज्ञानाचे केंद्रस्थान बनले आहेत. इंटरनेट, क्लाऊड स्टोरेज आणि एआयच्या वापरामुळे या केंद्रांची मागणी प्रचंड वाढली आहे. मुंबई, विशाखापट्टणमसारख्या शहरांत ही केंद्रे उभी राहत आहेत. मात्र, विकासाच्या या शर्यतीत आपण निसर्ग आणि सर्वसामान्यांच्या मूलभूत गरजांकडे दुर्लक्ष तर करत नाही ना, हा प्रश्न आता गंभीर झाला आहे. डेटा सेंटर्सना २४ तास थंडावा देण्यासाठी लाखो लिटर पाण्याची गरज असते. भारत हा कृषिप्रधान देश आहे आणि पाणी हे शेतीसाठी जीवनावश्यक आहे. जेव्हा एखादे मोठे डेटा सेंटर एखाद्या शेतीप्रधान पट्ट्यात उभे राहते, तेव्हा तिथे असलेल्या भूगर्भातील पाण्याचे साठे मोठ्या प्रमाणात उपसले जातात. ज्या पाण्यावर शेतकऱ्याचे पीक डोलले पाहिजे, ते पाणी सर्व्हर थंड करण्यासाठी वापरले जाणे हे सामाजिक आणि नैतिकदृष्ट्या किती योग्य आहे? सरकार अनेकदा या मोठ्या टेक कंपन्यांना आकर्षित करण्यासाठी विजेचे दर कमी करणे किंवा कर सवलती देणे असे निर्णय घेते. हे जरी देशाच्या डिजिटल प्रगतीसाठी आवश्यक वाटत असले, तरी त्यामागे लागणारा खर्च आणि संसाधने ही सर्वसामान्यांच्या करातूनच उभी राहिलेली असतात. मोठ्या कंपन्यांना मिळणाऱ्या अखंडित वीजपुरवठ्यामुळे स्थानिक वीज वितरण व्यवस्थेवर ताण येतो, ज्याचा फटका शेवटी ग्रामीण भागाला आणि सामान्य नागरिकांनाच बसतो. या डेटा सेंटरसाठी पाश्चात्त्य देशांमध्ये लोक रस्त्यावर उतरून त्याचा विरोध करत आहे. आधीच अल निनोच्या प्रभावामुळे पाऊस कमी पडणार. त्यामुळे सध्याच पाण्याचे दुर्भिक्ष आहे. ग्रामीण भागात तर कितीतरी पायपीट करून पिण्याचे पाणी आणावे लागते. अशा परिस्थितीत हे डेटा सेंटर इथे उभारले तर लाखो लिटर पाणी त्यांना लागणार. म्हणजे त्यानंतर किती भयानक परिस्थिती निर्माण होईल याची कल्पना न केलेली बरी.

**वर्षा आवदे**/नागपूर

■■■

### जीवनात समाधान असेल तरच पैशाचे सुख

सुख, दुःख व्यक्ती जीवनाचे अविभाज्य घटक आहेत. व्यक्ती सुख पटकन ग्रहण करतो, पण दुःख चघळत बसतो. आज व्यक्ती पैशाच्या मागे धावत आहे. व्यक्ती पैशातच सुख, समाधान व शांती शोधत आहे. मात्र पैशाची शांती, पैशाचे समाधान हे काही काळासाठी असते. ते कायमस्वरूपी कधीच नसते, हे आज पैशामागे धावणारे विसरत आहेत. पैसा म्हणजे सर्वस्व नाही. मनाची स्थिरता, समाधान, शांती जर नसेल तर कितीही पैसा असला तरी तो समाधान देऊ शकत नाही. मनाचे समाधान व शांतीसाठी पैसा गरजेचा नाही तर आहे त्यात समाधान मानून जीवन जगणे तसेच, सामाजिक, नैतिक, मानवी, धार्मिक, कौटुंबिक कर्तव्ये मनापासून मनांनपर्यंत जपली जाणे, सामाजिक बांधिलकी जपली जाणे, जीवनात नैतिकता पाळणे व सामाजिक कर्तव्ये निःस्वार्थीपणे पार पाडणे यात खरे समाधान आहे. असे समाधान असेल तर पैसा सुख देतो, नाहीतर कितीही पैसा कमविला तरी कमीच पडतो. म्हणून म्हटले आहे की, 'ठेविले अनंते, तैसेची रहावे, चित्ती असू द्यावे समाधानी.' सुख, शांती, समाधान तेव्हाच मिळते जेव्हा चित्त शांत व निरोगी, निर्विकारी असते. अशा जीवनात सुख आपोआपच येते. पैशाने असे सुख येत नाही. पैशाने येणारे सुख हे क्षणिक असते, हे विसरून चालणार नाही. ■

**धोंडीरामसिंह राजपूत**/९४२१३१२२४४



## योग दिनानिमित्त साईश्वर व श्रद्धा गुटुंक यांचे ४२ किमी रनिंग व १००१ सूर्य नमस्कार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २२ जून -**

जागतिक योग दिनानिमित्त राष्ट्रीय धावपटू साईश्वर व श्रद्धा केशव गुंटूक या बहिण व भावांनी योग दिनाचे औचित्य साधून रविवारी पहाटे २१ किमी अंतर रनिंग पूर्ण करून त्यानंतर प्रत्येकी ५०१ सूर्य नमस्कार घालून योग दिन साजरा केले.

त्यांनी २१ किमी अंतर सोनी कॉलेज ते सोरेगाव पुन्हा सोरेगाव ते सोनी कॉलेज या पद्धतीने ३ लुप् मध्ये २१ किमी अंतर पूर्ण करत एस.आर.पी.एफ. येथे सांगता केली. साईश्वरने २१ किमी १ तास २६ मिनिटे ०९ सेकंदात तर श्रद्धा हिने तेव्हढेच अंतर १ तास ४२ मिनिटे १८ सेकंदात पूर्ण केले तसेच एस आर पी एफ कॅम्प येथील मैदानावर प्रत्येकी ५०१ सूर्य नमस्कार पूर्ण केले. या दोघांना सिनियर ऑलिंपियन केशवराज सिंह तसेच प्राचार्य अंबादास पांढरे, प्राचार्य चिदानंद माळी व क्रीडा प्रशिक्षक कृष्णा कोळी यांचे मार्गदर्शन तसेच एस आर पी एफ (राज्य बल गट क्रमांक १०) चे समादेशक व वरीष्ठ अधिकारी यांचे सहकार्य लाभले.

# मानांकित खेळाडूंचे आकर्षक विजय

## 'आय. एम. एस. चषक' जिल्हास्तरीय निवड बुद्धिबळ स्पर्धा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २२ जून -**

खुली व मुलींच्या १७ वर्षाखालील गटाच्या जिल्हास्तरीय निवड बुद्धिबळ स्पर्धेत मानांकित खेळाडूंनी आकर्षक खेळाचे प्रदर्शन करत विजयी सुरुवात केली.

सोलापूर डिस्ट्रीक्ट चेस असोसिएशनच्या मान्यतेने तसेच सोलापुर चेस अकॅडमी व चॅम्प चेस स्कूल यांच्या संयुक्त विद्यमाने इंडियन मॉडेल स्कूल येथे सुरू असलेल्या या स्पर्धेत सोलापूर शहरासह अक्कलकोट, पंढरपूर, मंगळवेढा, बार्शी व माढा आदी तालुक्यांतील १८ आंतरराष्ट्रीय गुणांकन प्राप्त खेळाडूंसह ७८ खेळाडूंनी उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदविला आहे.

मुलांच्या गटात अग्रमानांकित आंतरराष्ट्रीय गुणांकन प्राप्त खेळाडू मानस गायकवाड, श्रेयस कुदळे, आदिराज म्हेत्रे, श्रेयांश इंगळे, नियान कंदीकटला, मयुर स्वामी, देवदत्त पटवर्धन, नैतिक होटकर, युवराज गायकवाड, नागेश राजमाने, सानिध्य जमादार, कृष्णराज पटले तसेच मुलींच्या गटात बार्शीची राष्ट्रीय खेळाडू




सानवी गोरे, पृथा ठोंबरे तसेच आंतरराष्ट्रीय गुणांकन प्राप्त अनन्या उलभगत यांनी आपल्या प्रतिस्पर्ध्यांवर मात करत शानदार विजय मिळविला.

तत्पूर्वी स्पर्धेचे उद्घाटन मॉडेल पब्लिक स्कूलच्या मुख्याध्यापिका आदिती कुलकर्णी यांनी राजासमोरील प्यादे दोन घर पुढे सरसावत केले. यावेळी आय.एम. एस. स्कूलचे समन्वयक सचिन ढवण, राष्ट्रीय पंच संतोष पाटील स्पर्धेत प्रमुख पंच वरिष्ठ राष्ट्रीय बुद्धिबळ पंच उदय वगरे यांची प्रमुख उपस्थिती होती. स्पर्धेत सहाय्यक पंच म्हणून प्रज्वल कोरे व पद्मजा घोडके आदी काम पाहत आहेत.

आपल्या अध्यक्षीय मनोगतात आदिती कुलकर्णी यांनी खेळाडू व पालकांना खेळाचे महत्त्व विशद करत बुद्धिबळामुळे विद्यार्थ्यांच्या बौद्धिक विकासास चालना मिळते असे सांगितले. तसेच सर्व खेळाडूंना राज्य व राष्ट्रीय स्पर्धांसाठी शुभेच्छा दिल्या.

स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावणाऱ्या दोन मुले व मुलींची निवड मुंबई येथे होणाऱ्या राज्यस्तरीय निवड बुद्धिबळ स्पर्धेसाठी करण्यात येणार आहे. स्पर्धा अत्यंत चुरशीच्या वातावरणात पार पडत असून उपस्थितांना अनेक प्रेक्षणीय लढती पाहण्याची संधी मिळत आहे. विशेष म्हणजे ग्रामीण भागातील उदयोन्मुख खेळाडूंनीही उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करत उपस्थितांचे लक्ष वेधून घेत आहेत.

## जागतिक मॅरेथॉन स्पर्धेत वेळापूरच्या नवनाथ माने यांना ब्राँझ पदक

### ९० किमी स्पर्धा १० तास १० मिनिटात पूर्ण

**तभा वृत्तसेवा,**
**श्रीपूर, दि. २२ जून-**

वेळापूर (ता. माळशिरस) येथील जिल्हा परिषद शाळेतील शिक्षक नवनाथ माने (वय ४३वर्ष) यांनी जगातील सर्वात प्रतिष्ठित आणि सर्वात जुन्या अल्ट्रा मॅरेथॉन स्पर्धांपैकी एक मानल्या जाणाऱ्या दक्षिण आफ्रिकेतील कॉमरेड्स मॅरेथॉन स्पर्धेमध्ये ९० किलोमीटरची खडतर स्पर्धा यशस्वीरीत्या पूर्ण केली. डर्बन ते पीटरमॅरिट्सबर्ग या दोन शहरादरम्यान आयोजित केलेली ही स्पर्धा रविवारी १४ जून रोजी झाली.

स्पर्धेचा मार्ग डर्बन ते पीटरमॅरिट्सबर्ग असा चढाचा (अप-रन) होता. तब्बल ९० किलोमीटर अंतर आणि सुमारे १,७५० मीटर उंच चढाव असलेल्या या स्पर्धेत जगभरातील सुमारे २२ हजार धावपटूंनी सहभाग घेतला होता.

भारतातून २७० स्पर्धक



सहभागी झाले होते, त्यामध्ये २२ महिला धावपटूंचा समावेश होता. श्री. माने यांनी ही आव्हानात्मक स्पर्धा १० तास १० मिनिटांत पूर्ण करत ब्राँझ पदक पटकावले. त्यांना रनहोलिक्स ग्रुपचे मार्गदर्शक डॉ.योगेश सातव व माळशिरस फिटनेस ग्रुपचे मार्गदर्शन लाभले.

# सोलापूर जिल्हा वरिष्ठ गट क्रिकेट निवड चाचणी २८ जूनला

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २२ जून -**

सोलापूर डिस्ट्रिक्ट क्रिकेट असोसिएशनतर्फे वरिष्ठ गट क्रिकेट खेळाडूंची निवड चाचणी रविवार २८ जून रोजी इंदिरा गांधी पार्क स्टेडियमवर सकाळी ११:०० वाजता सुरू होईल. निवड चाचणीत सहभागी होणाऱ्या खेळाडूंनी खेळाडू नोंदणी फी भरून त्याच्या पावतीची एक झेरॉक्स प्रत निवड चाचणीच्या दिवशी सोबत आणणे आवश्यक आहे.

या निवड चाचणीचे परीक्षण करण्यासाठी निवड समितीचे चेअरमन रोहित जाधव यांच्यासह दत्ता बडगु, अमोल अंगडी, अंबादास तोरा, राजेश बंब, जावेद जमादार आणि चंद्रकांत रेंबर्सू हे काम पाहणार आहेत.



सर्व खेळाडूंसाठी रिपोर्टिंग टाईम सकाळी ११:०० वाजण्यापूर्वीचा असून, वेळेत हजर राहणाऱ्या खेळाडूंचीच निवड चाचणी घेतली जाईल, असे जिल्हा क्रिकेट असोसिएशनचे संयुक्त सचिव चंद्रकांत रेंबर्सू यांनी कळविले आहे.



## नावात बदल

माझे जुने नाव **श्रद्धा रवि हत्ते** असे होते ते आता बदलून **श्रद्धा रविंद्र हत्ते** असे ओळखले जाईल. अक्कलकोट येथील मे. कार्यकारी दंडाधिकारी यांचे समोर प्रतिज्ञा पत्र क्र. ४६३३/२०२६ दिनांक - २२/०६/२०२६

## NOTICE

NOTICE IS HEREBY GIVEN THAT THE CERTIFICATE(S) FOR **LARSON & TOUBRO LTD** BEARING EQUITY FOLIO NO, 04771591 & **CERTIFICATE NOS. AS 34064, 209221, 334746, 436048, 1360037** AND DISTINCTIVE NOS. 1560964 TO 1560988, 141066192 TO 141066216, 575555385 TO 575555434, 617812580 TO 617812629, 1396381685 TO 1396381759 UNDER THE FOLIO NO 04771591 OF **LARSON & TOUBRO LTD.** STANDING IN THE NAME OF 1ST **HOLDER SURYAKANT JIVRAJ GANDHI & 2ND HOLDER LATE Mr. SHASHIKANT JIVRAJ GANDHI** HAS/HAVE BEEN LOST OR MISLAID AND THE UNDERSIGNED HAS / HAVE APPLIED TO THE COMPANY TO ISSUE DUPLICATE CERTIFICATE(S) FOR THE SAID SHARES..

| CERTIFICATE NO | QTY | DIST. NOS FROM | TO |
|---|---|---|---|
| 34064 | 25 | 1560964 | 1560988 |
| 209221 | 25 | 141066192 | 141066216 |
| 334746 | 50 | 575555385 | 575555434 |
| 436048 | 50 | 617812580 | 617812629 |
| 1360037 | 75 | 1396381685 | 1396381759 |

ANY PERSON WHO HAS ANY CLAIM IN RESPECT OF THE SAID SHARES SHOULD WRITE TO OUR REGISTRAR, **KFIN TECHNOLOGIES LIMITED**, SELENIUM TOWER 'B' , PLOT 31-32, GACHIBOWLI, FINANCIAL DISTRICT, HYDRABAD-500032 WITHIN ONE MONTH FROM THIS DATE ELSE THE COMPANY WILL PROCEED TO ISSUE DUPLICATE CERTIFICATE(S).

**NAME(S) OF SHAREHOLDER(S)**
**1) Mr. SURYAKANT JIVRAJ GANDHI**
**2) LATE Mr. SHASHIKANT JIVRAJ GANDHI**

## जाहीर प्रसिद्धीकरण

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६०, नियम १९६१ व महाराष्ट्र सहकारी संस्था (समिती निवडणूक) नियम २०१४ मधील तरतुदीनुसार, खालील 'क' वर्गातील सहकारी संस्थेच्या सन २०२६-२७ ते सन २०३१-३२ साठी संचालक मंडळाच्या निवडणूक करीता तातुरती मतदार यादी कार्यक्रमाचे जाहीर प्रसिद्धीकरण करण्यात येत आहे.

| अं.क्र. | सहकारी संस्थेचे नांव |
|---|---|
| १ | राजयोग अर्बन को-ऑपरेटिव्ह क्रेडीट सोसायटी लि., सांगोला |
| २ | रत्नाई महिला ग्रामिण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्या. वाणी चिंचाळे |
| ३ | संत सावता माळी नागरी सहकारी पतसंस्था मर्या., सांगोला |
| ४ | सांगोला महाविद्यालय सेवकांची सहकारी पतसंस्था मर्या., सांगोला |
| ५ | श्री स्वामी समर्थ अर्बन को-ऑपरेटिव्ह क्रेडीट सोसायटी लि., आलेगांव |
| ६ | श्रीमती शारदादेवी महिला ग्रामिण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्या., मेडशिंगी |

**क वर्ग संस्था प्रारूप मतदार यादी प्रसिद्धी कार्यक्रम :**

| अ. क्र. | तपशिल | तारीख |
|---|---|---|
| १ | निवडणूक नियम ६ (३) नुसार तातुरती मतदार यादी प्रसिद्ध करण्याची तारीख | दि.२३/०६/२०२६ |
| २ | निवडणूक नियम ८ (१) नुसार तातुरत्या मतदार यादीवर आक्षेप अगर दावे तालुका सहकारी निवडणूक अधिकारी सोलापूर यांचेकडे सादर करावयाची तारीख | दि.२३/०६/२०२६ ते दि.२९/०६/२०२६ |
| ३ | प्रारूप मतदार यादीवर आक्षेप अगर दावे प्राप्त न झाल्यास निवडणूक नियम ८ (३) नुसार अंतिम मतदार यादी प्रसिद्ध करावयाची तारीख | दि.३०/०६/२०२६ |
| ४ | निवडणूक नियम ८ (३) नुसार आक्षेप अगर दावे यावर तालुका सहकारी निवडणूक अधिकारी सोलापूर यांनी द्यावयाचा निर्णयाची तारीख | दि.०६/०७/२०२६ |
| ५ | प्रारूप मतदार यादीवर आक्षेप अगर दावे प्राप्त झाल्यास निवडणूक नियम ८ (३) नुसार अंतिम मतदार यादी प्रसिद्ध करावयाची तारीख | दि.०६/०७/२०२६ |

उपरोक्त कार्यक्रम तालुका सहकारी निवडणूक अधिकारी, तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, सांगोला यांचा पत्ता :- क्षत्रिय माळी वि.का.से.इमारत १ ला मजला,कचेरी रोड ,सांगोला.ता. सांगोला जि .सोलापूर येथे व संबंधित संस्थेच्या कार्यालयाचे नोटीस बोर्डावर रितसर प्रसिद्ध करण्यात आलेला आहे याची नोंद घ्यावी.

शिक्का

**सही/-**
**(डॉ. वैशाली साळवे)**
**तालुका सहकारी निवडणूक अधिकारी तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, सांगोला**

## जाहीर नोटीस

तमाम लोकास, विशेषतः डि. सोलापूर सब डि. सोलापूर येथील जनतेस अशी जाहीर नोटीस देण्यात येते की, श्री. सिध्दण्णा पंडीत कुंभार, रा. होटगी, ता. दक्षिण सोलापूर, जि. सोलापूर, महाराष्ट्र यांनी त्यांचे मालकीची खाली परिशिष्टात नमूद केलेली शेती जमीन आमचे अशिलास विकण्याचे ठरवले आहे. सदर जमीन ही विनाजोखिम व पूर्णपणे त्यांच्या मालकीची असल्याचे त्यांनी सांगितले आहे. तथापि सदर जमिनीत जर कोणाचाही कुठलाही हक्क वा हितसंबंध, खरेदी, बक्षीस, लीज, वारसा, अदलाबदल, गहाण, दान, विश्वस्त निधी, दायित्व, कब्जा, वहिवाट, जप्ती, इसार पावती, साठेखत, पोटगी, मृत्युपत्र वा तत्सम अगर कसलाही हक्क व हितसंबंध असल्यास खालील कायदेशीर सल्लागार यांच्या कार्यालयात सदर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ७ दिवसांच्या आत प्रत्यक्ष येऊन अथवा पोस्टामार्फत लेखी पुराव्यासह कागदपत्र सादर करावे. अन्यथा सदरची विक्री पूर्ण होईल व त्यानंतर कोणाचाही काही संबंध असल्यास त्यांनी तो कायदेशीररीत्या सोडून दिला आहे असे समजण्यात येईल. मुदतीनंतर कोणतीही हरकत आमचे अशिलाच्या खरेदी हक्कावर बंधनकारक राहणार नाही. कोणाची फसगत होऊ नये म्हणून ही खरेदी पूर्व जाहीर नोटीस दिली आहे.

दिनांक : २२/०६/२०२६

**परिशिष्ट**

गटक्र. २१८/१ मधील एकूण क्षेत्रफळ ५.३४ हेक्टरपैकी उत्तरेकडील भागातून २ एकर (सुमारे ०.८१ हेक्टर) शेती जमीन, मौजे होटगी, ता. दक्षिण सोलापूर, जि. सोलापूर, महाराष्ट्र. चतुःसीमा :- उत्तर - गट क्र. १६६/२ श्रीनिवास नागेश चव्हाण यांचे शेत जमीन (ULPIN: २५७५३३३२०९५) दक्षिण - गट क्र. २१८/१ मधील शिल्लक जमीन विक्रेत्याची पूर्व - गट क्र. २१८/२/इ नागनाथ शंकर कुंभार यांचे शेत जमीन पश्चिम - गट क्र. २१९/२ चंद्रकांत प्रभू उमबर्ने यांचे शेतजमीन (ULPIN: २२२३७७१८४१६)

**सही /-**
**ॲड. महेश गोविंद करमाळकर**
**ॲड. ज्ञानेश्वर तुकाराम करचे**
**ॲड. दिनेश विश्वनाथ अय्यर**
**पत्ता :- जी-४ माणिकचंद अपार्टमेंट, दक्षिण सदर बाजार, सोलापूर, महाराष्ट्र - ४१३००३**

## खरेदीपुर्व जाहीर नोटीस

तमाम लोकांस विशेषतः उपळाई (ठों.), तथा वारदवाडी, खांडवी, लक्षाचीवाडी, ता. बार्शी, जि. सोलापूर व आसपासचे लोकांना आमचे आशिल यांचेतर्फे त्यांनी माहिती दिलेवरून व नोटीस देण्यास सांगितलेवरून या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, डि. सोलापूर सब डि. व ता. बार्शी पैकी मौजे-उपळाई (ठों.) ग्रामपंचायत हद्दीतील गट नं. ५६७/१ याचे क्षेत्र ०४ हे. ५९ आर, आकार ०६ रू. ३५ पै. यापैकी पश्चिम बाजूचे क्षेत्र ०१ हे. २० आर, आकार ०१ रू. ७३ पैसे यांसी चतुःसिमा :- पुर्वेस - सदर ग.नं. पैकी, दक्षिणेस - गट नं. ५६५, ५६६, पश्चिमेस - वारदवाडी - बार्शी रोड व उत्तरेस गट नं. ६६४, येणेप्रमाणे चतुःसिमापुर्वक शेतजमीन मिळकत आतील सर्व झाड, झडुपे, तदंगभूत वस्तु व वहीवाटीचे हक्कासह. वर नमूद शेतजमीन मिळकत ही श्री. संजय दत्तात्रय स्वामी यांचे वडिलार्जित मालकी व प्रत्यक्ष कब्जेवहीवाटीची असून महसूल दप्तरी ७/१२ हक्कसदरी त्यांचे नावे दाखल आहे. सदर शेतजमीन मिळकत ही संजय दत्तात्रय स्वामी यांनी आमचे आशिलास खरेदी देणेचा ठराव केलेला आहे व आमचे आशिलाकडून इसारा दाखल रक्कम स्विकारलेली आहे. सदर शेतजमीन मिळकतीचे विद्यमान मालकाने सदरची मिळकत ही निर्वेध व निजोखमी असल्याची खात्री व भरवसा आमचे आशिलास दिलेला आहे. या उपरही वर नमूद शेतजमीन मिळकतीशी इतर कोणाचाही खरेदी, साठेखत, गहाण,

दान, लिज, बोजा इजमेंटरी राईट इत्यादी कोणत्याही प्रकारचा कसलाही हक्क, अधिकार, हिस्सा व हित संबंध असल्यास प्रस्तूत नोटीस प्रसिध्द झालेपासून १५ (पंधरा) दिवसांचे आत संबंधितांनी ॲड. गणपतराव विनायक साखरे, फौजदारी व दिवाणी न्यायालय, बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर यांचेकडे संपर्क साधून अथवा त्यांचे सदर नमुद पत्त्यावर त्याबाबत कागदपत्रानिशी शहानिशा करून द्यावी अथवा तक्रार वा हरकत कळवावी. मुदतीत कोणाचीही तक्रार वा हरकत न आलेस आमचे आशिल कोणाची काहीही हरकत अथवा तक्रार नाही असे समजून वर नमूद शेतजमीन मिळकतीबाबत ठरावाप्रमाणे वर नमूद शेतजमीन मिळकतीचे मालकाशी खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. तद्नंतर कोणाचीही कोणत्याही व कसल्याही प्रकारची तक्रार वा हरकत चालणार नाही याची नोंद घ्यावी. कोणाचीही फसगत होऊ नये म्हणून प्रस्तुत जाहीर नोटीस दिली. ता. २२/०६/२०२६

**सही/-**
**ॲड. गणपतराव वि. साखरे**
**बी.एल.एल., एलएल.बी., ॲडव्होकेट**
**बी.आर. नंबर एम.ए.एच. १५६९/९४**
**मो.न. ९४२१९५८३९८**

## IDFC FIRST Bank Limited

**(erstwhile Capital First Limited, amalgamated with IDFC Bank Limited and presently known as IDFC First Bank Limited) | CIN : L65110TN2014PLC097792**
**Registered Office: -** KRM Towers, 8th Floor, Harrington Road, Chetpet, Chennai- 600031.
Tel : +91 44 4564 4000 | Fax: +91 44 4564 4022

IDFC FIRST Bank

### वित्तीय मालमत्तांचे रोखीकरण आणि पुनर्रचना आणि सुरक्षा हितसंबंधांची अंमलबजावणी कायदा (सरफेसी कायदा), २००२ च्या कलम १३ (२) अंतर्गत नोटीस

खालील कर्जदार आणि सह-कर्जदारांनी **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड** (पूर्वीची **कॅपिटल फर्स्ट लिमिटेड,** जी **आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये** विलीन झाली आणि सध्या **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड** म्हणून ओळखली जाते) कडून खाली नमूद केलेले सुरक्षित कर्ज घेतले होते. खाली नमूद केलेल्या कर्जदार आणि सह-कर्जदारांची कर्जे त्यांच्या संबंधित मालमत्ता गहाण ठेवून सुरक्षित करण्यात आली आहेत. ते संबंधित कर्ज करारांच्या अटी व शर्तीचे पालन करण्यात अपयशी ठरल्यामुळे आणि खात्यांमध्ये अनियमितता आल्यामुळे, रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार त्यांची कर्जे 'एनपीए' (अनुत्पादक मालमत्ता) म्हणून वर्गीकृत करण्यात आली आहेत. त्यांनी **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेडला** (पूर्वीची **कॅपिटल फर्स्ट लिमिटेड,** जी **आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये** विलीन झाली आणि सध्या **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड** म्हणून ओळखली जाते) देणे असलेली रक्कम, जारी केलेल्या संबंधित नोटिसींनुसार खालील तक्त्यामध्ये सविस्तरपणे नमूद केली आहे. सदर रक्कमेवर पुढील व्याज देखील लागू होईल आणि ते त्यांच्या संबंधित तारखांपासून कराराच्या दरानुसार आकारले जाईल.

| अं. क्र. | कर्ज खाते क्र. | कर्जाचा प्रकार | कर्जदार आणि सह-कर्जदारांची नावे | कलम १३ (२) नोटीस दिनांक | कलम १३ (२) नोटिस नुसार थकबाकी रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 80248171 | मालमत्तेवर कर्ज | १. रामचंद्र सुखदेव केसकर<br>२. सुखदेव सुदाम केसकर | 03/06/2026 | INR 4,24,990.63/- |
| **मालमत्तेचा पत्ताः** मालमत्ता क्रमांक ६०५ असलेली मालमत्ता, ज्यामध्ये दगड, विटा आणि काँक्रीटने बांधलेले निवासी घर आणि पार्किंग समाविष्ट आहे, एकूण क्षेत्रफळ १२०० चौ. फूट, मु. केसकरवाडी, ता. पंढरपूर, जिल्हा सोलापूर, महाराष्ट्र. चतुःसीमाः पूर्व : रस्ता, पश्चिम : सुखदेव केसकर, उत्तर : अंकुश केसकर, दक्षिण : संभाजी सुदाम केसकर. | | | | | |
| 2 | 93933878 | गृहकर्ज | १. मोहसीन कादर शेख<br>२. रिजवाना मोहसीन शेख | 10/06/2026 | INR 8,39,190.34/- |
| **मालमत्तेचा पत्ताः** बागेवाडी बिगरशेती (छ) सर्व्हे नं. २९/२/ब/२/प/२९ मधील निवासी मालमत्ता, क्षेत्रफळ १.८४.३४ आर चौ.मीटर (१८४.३४ चौ. मीटर), बागेवाडी ग्रामपंचायत हद्दीत, तालुका : माळशिरस, जिल्हाः सोलापूर, महाराष्ट्र - ४१३१०१ चतुःसीमाः पूर्व : प्लॉट नं. ३०, पश्चिम : खुली जागा, उत्तर : ४० फूट कॉलनी रस्ता, दक्षिण : सर्व्हे नं. ३०. | | | | | |
| 3 | 158161568 | मालमत्तेवर कर्ज | १. बापू काशिनाथ गोराड<br>२. पारुबाई बापू गोराड | 03/06/2026 | INR 7,35,258.50/- |
| **मालमत्तेचा पत्ताः** ग्रामपंचायत मिळकत नं. ७२६ ची मालमत्ता, एकूण जमीन क्षेत्रफळ २०१० चौ. फूट, निवासी घराचे क्षेत्रफळ ९६० चौ. फूट (४०२४) आणि खुल्या जागेचे क्षेत्रफळ १०५० चौ. फूट (३०३५), मु. गोराडवाडी, तालुकाः माळशिरस, जिल्हाः सोलापूर, महाराष्ट्र - ४१३१०७. चतुःसीमाः पूर्व : बापू विठ्ठल गोराड, पश्चिम : शामराव काशिनाथ गोराड, उत्तर : गावठाण रस्ता, दक्षिण : अर्जुन सखाराम हांडे. | | | | | |
| 4 | 160056469 | मालमत्तेवर कर्ज | १. धनाजी दत्तात्रय जगदाळे<br>२. नंदा दत्तात्रय जगदाळे | 27/05/2026 | INR 7,16,747.30/- |
| मालमत्तेचा पत्ता : निवासी घराचे क्षेत्रफळ ६२५ चौ. फूट (२५२५) आणि खुल्या जागेचे क्षेत्रफळ ३३०० चौ. फूट (५५६०) असलेली मालमत्ता, मु. माणकी, तालुकाः माळशिरस, जिल्हाः सोलापूर, महाराष्ट्र - ४१३१०७, जी ग्रामपंचायत रेकॉर्डमध्ये मिळकत क्र. १८९/१ म्हणून नोंदणीकृत आहे आणि सध्या श्री. धनाजी दत्तात्रय जगदाळे यांच्या ताब्यात आहे. मालमत्तेची एकत्रित चतुःसीमाः पूर्व : सुरेश दादासो रणनवरे, पश्चिम : माणिक दादासो रणनवरे, उत्तरः चंद्रकांत तानाजी रणनवरे, दक्षिण : युवराज धोंडिबा रणनवरे. | | | | | |
| 5 | 163906171 | मालमत्तेवर कर्ज | १. ज्ञानेश्वर जोतीराम सावंत<br>२. रुपाली ज्ञानेश्वर सावंत | 16/05/2026 | INR 10,79,049.61/- |
| मालमत्तेचा पत्ता : दगड, विटा आणि काँक्रीटने बांधलेले निवासी घर, क्षेत्रफळ तळमजला = ८९६.६४.०० आणि एकूण बांधकाम क्षेत्र = ८९६.६४.०० चौ. फूट, मोडनिंब ग्रामपंचायत मिळकत क्र. १५१९, मोडनिंब विभाग सोलापूर, उपविभाग माढा, महत्त्वाचे ठिकाणः मोडनिंब, पिनकोडः ४१३३०१, शहरः सोलापूर, राज्यः महाराष्ट्र. चतुःसीमा : पूर्व : रस्ता, पश्चिम : शीला सुभाष ढगे, उत्तरः भगवंत साधू सावंत, दक्षिणः मारुती धोंडिराम सूड. | | | | | |
| 6 | 154669537 | मालमत्तेवर कर्ज | १. विजय रामचंद्र रणदिवे<br>२. राजाबाई रामचंद्र रणदिवे | 14/05/2026 | INR 5,47,723.21/- |
| **मालमत्तेचा पत्ताः** ग्रामपंचायत मिळकत/घर क्रमांक २०८, जमीन क्षेत्रफळ ११६० चौ. फूट, आरसीसी निवासी घर क्षेत्रफळ ५०० चौ. फूट (२५२०) आणि खुली जागा क्षेत्रफळ ६६० चौ. फूट (३०२२), मु. उंबरे दहिगाव, तालुकाः माळशिरस, जिल्हाः सोलापूर, महाराष्ट्र - ४१३१०७. चतुःसीमाः पूर्व : रस्ता, पश्चिम : रस्ता, उत्तर : समाज मंदिर, दक्षिण : मनोहर जगू रणदिवे यांची मालमत्ता. | | | | | |

याद्वारे आपणास उपरोक्त तक्त्यामध्ये दर्शविलेल्या तपशिलानुसार **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेडला** (पूर्वीची **कॅपिटल फर्स्ट लिमिटेड,** जी **आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये** विलीन झाली आणि सध्या **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड** म्हणून ओळखली जाते) त्यांच्या संबंधित तारखांपासून कराराच्या व्याजदरासह आणि इतर खर्च, शुल्क इत्यादींसह रक्कम भरण्याचे आवाहन करण्यात येत आहे. ही रक्कम सदर प्रसिद्धीच्या तारखेपासून ६० दिवसांच्या आत भरणे आवश्यक आहे, अन्यथा **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेडला** देणे असलेली रक्कम वसूल करण्यासाठी, अधोस्वाक्षरीकारांना वरील गहाण ठेवलेल्या मालमत्तांविरुध्द सरफेसी कायद्याच्या कलम १३ (४) आणि कलम १४ अंतर्गत कायदेशीर कारवाई सुरू करणे भाग पडेल. याशिवाय, सदर कायद्याच्या कलम १३ (१३) अन्वये आपणास सदर सुरक्षित मालमत्ता विक्री, भाडेपट्टा (लीज) किंवा इतर कोणत्याही मार्गाने हस्तांतरित करण्यास प्रतिबंधित करण्यात येत आहे.

**स्वाक्षरी/- अधिकृत अधिकारी**
**आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड (पूर्वीचे कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, ज्याचे आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये विलीनीकरण झाले असून सध्या ते आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड म्हणून ओळखले जाते)**

दिनांक : **23/06/2026**
स्थळ : सोलापूर, महाराष्ट्र

## अुत्तम सेवा — मंगळवार दि. २३ जून २०२६ — नोकरीच्या शोधात

**उमेदवारांसाठी अत्यंत महत्त्वाची सूचना- खालील विविध स्पर्धा परीक्षांचे फॉर्म योग्य त्या विहीत नमुन्यात नसल्यास रद्द होऊ शकतात. तरी हे टाळण्यासाठी नोकरीविषयक स्पर्धा परीक्षा फॉर्म विक्रीचे सोलापुरातील एकमेव, अचूक फॉर्म विक्री केंद्र, अुत्तम सेवा, पार्क चौक, सोलापूर येथूनच फॉर्म खरेदी करावेत व संभाव्य नुकसान टाळावे.**

| अ. क्र. | ज्या कार्यालयात पद आहे त्या कार्यालयाचे नाव | शैक्षणिक/तांत्रिक अर्हता पदनाम व अनुभव | वयोमर्यादा (वर्षात) | अर्ज भरण्याची अंतिम तारीख |
|---|---|---|---|---|
| **१)** | **जनता सहकारी बँक लि.** | | | |
| १ | लिपीक (५३ पदे) | पदवी (५०%) गुणांसह उत्तीर्ण असावे | ३० पर्यंत | २७/०६/२६ |
| २ | ज्यु. ऑफिसर (१२ पदे) | पदवी व ७ वर्षे अनुभव आवश्यक | ३५ पर्यंत | |
| **२)** | **स्टेट बँक ऑफ इंडिया, SBI** | | | |
| १ | प्रोबेशनरी ऑफिसर (१५०० पदे) | पदवीधर स्त्री/पुरुष उमेदवार असावे | ३० पर्यंत | ०८/०७/२६ |
| **३)** | **भारत संचार निगम लि.** | | | |
| १ | ज्यु. टेलिकॉम ऑफिसर (१०० पदे) | B.E. (इलेक्ट्रॉ/कॉम्प्यु/इले./आय.टी./टेली/रेडीओ) उत्तीर्ण असावे | ३० पर्यंत | ०३/०७/२६ |
| **४)** | **भारतीय वायु सेना, IAF** | | | |
| १ | अग्निवीरवायु | बारावी (५०%) गणित विषयासह किंवा डिप्लोमा (मेकॅ/इले/इलेक्ट्रॉ/ऑटो/कॉम्प्यु/आय.टी) उत्तीर्ण असावे. | २१ पर्यंत | २६/०७/२६ |

**✻ मोफत सरकारी अपडेट ✻**
**सर्व सरकारी नोकरींचे व स्पर्धा परिक्षांचे अपडेट आपल्या व्हॉटस्‌ॲपवर मोफत मिळविण्याकरिता ९७६३७४१९९१ या नंबरला ''जॉईन'' असा मेसेज व्हॉटस्‌ॲप करावा.**

**सुवर्णसंधी - १) वार्षिक वर्गणी भरल्यास वर्षभर नोकरीविषयक फॉर्म घरपोच मिळतील.**
**२) नोकरीविषयक फॉर्म संबंधित कार्यालयास सत्वर पोहोच केले जातील. (कुरिअर सर्व्हिस)**
**३) खाजगी नोकरी (प्रायव्हेट प्लेसमेंट)साठी नाव नोंदणी करा. ४) नोकरीविषयक साप्ताहिकाचे सभासद व्हा.**

वरीलपैकी कोणत्याही फॉर्मसाठी वा अचूक माहितीसाठी भेटा वा रु. ५०/- ची मनिऑर्डर करा. MPSC, RRB, BSRB, SET, NET, IAS / IPS, NDA, CDS, LIC, KVS नवोदय, कोर्ट, निवड मंडळ, स्टाफ सिलेक्शन, इंजिनिअरिंग, पोलीस भरती, तलाठी, रेल्वे या स्पर्धा परीक्षांची अद्ययावत पुस्तके फक्त आमच्याकडेच मिळतील.


वरीलपैकी कोणत्याही फॉर्मसाठी वा अचूक माहितीसाठी भेटा वा रु. ५०/- ची मनिऑर्डर करा. MPSC, RRB, BSRB, SET, NET, IAS / IPS, NDA, CDS, LIC, KVS नवोदय, कोर्ट, निवड मंडळ, स्टाफ सिलेक्शन, इंजिनिअरिंग, पोलीस भरती, तलाठी, रेल्वे या स्पर्धा परीक्षांची अद्ययावत पुस्तके फक्त आमच्याकडेच मिळतील.


अुत्तम सेवा

१) २२, डॉ. कोटणीस शॉपिंग सेंटर, सिद्धेश्वर मंदिराजवळ, पार्क चौक, सोलापूर.
वेळ स. १० ते सायं ७, फोन नंबर - ९७६३७४१९९१.

www.uttamseva.org

लातूर
# दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## पालेभाज्यांची आवक घटली



तभा वृत्तसेवा

लातूर दि. २२ जून : यंदा मान्सूनच्या सुरुवातीला अपेक्षित पाऊस न पडल्याने त्याचा परिणाम आता भाजीपाला बाजारावर झालेला दिसून येत आहे. विशेषतः पालेभाज्यांच्या उत्पादनात घट झाल्याने बाजारातील आवक कमी झाली आहे.

दरात मात्र लक्षणिय वाढ झाली आहे. परिणामी सर्वसामान्य नागरिकांसह गृहिणींचे मासिक बजेट कोलमडू लागले आहे. शहरातील घाऊक व किरकोळ भाजी बाजारात मेथी, पालक, शेपू, चुका, कोथिंबीर यासारख्या पालेभाज्यांचे दर गेल्या काही दिवसांत वाढले आहेत. कमी पावसामुळे अनेक भागातील भाजीपाला उत्पादक शेतकऱ्यांना ठिबक सिंचनावर अवलंबुन राहावे लागत आहे. पाण्याअभावी लागवडीचे क्षेत्र कमी झाले असून त्याचा थेट परिणाम उत्पादनावर झाला आहे.



## विविध वृत्त...

### डॉ. नितीन जोशी यांची कोलकाता राष्ट्रीय एंडोलाईव्ह परिषदेसाठी निवड



तभा वृत्तसेवा

वलांडी दि. २२ जून : वलांडीसह संपूर्ण देवणी तालुक्यासाठी अभिमानाची बाब म्हणजे गॅलेक्सी हॉस्पिटलचे गॅस्ट्रोएन्टेरोलॉजिस्ट डॉ. नितीन जोशी यांची कोलकाता येथे होणाऱ्या राष्ट्रीय स्तरावरील कोलकाता एंडोलाईव्ह-२०२५ परिषदेसाठी फॅकल्टी म्हणून निवड झाली आहे. २७ व २८ जून रोजी होणाऱ्या या परिषदेत देशभरातील नामवंत तज्ज्ञ सहभागी होणार असून डॉ. जोशी यांना आपल्या अनुभव व आधुनिक एंडोस्कोपी तंत्रज्ञानाविषयी मार्गदर्शन करण्याची संधी मिळणार आहे.

ग्रामीण भागात अत्याधुनिक आरोग्यसेवा उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने कार्यरत असलेल्या डॉ. जोशी यांनी अल्पावधीतच वैद्यकीय क्षेत्रात विशेष ओळख निर्माण केली आहे. त्यांच्या या राष्ट्रीय स्तरावरील सहभागामुळे वलांडी, देवणी व मराठवाड्याच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे.

याबाबत नागरिक, रुग्ण, वैद्यकीय क्षेत्रातील सहकारी तसेच विविध सामाजिक संघटनांकडून डॉ. नितीन जोशी यांचे अभिनंदन करण्यात येत असून त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

### आरटीओ कर्मचाऱ्यांचा संप सुरुच

तभा वृत्तसेवा

लातूर दि. २२ जून : आरटीओ कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित मागण्यांसाठी मोटार वाहन विभाग कर्मचारी संघटना, महाराष्ट्र राज्य यांनी विविध मागण्यांसाठी आक्रमक पवित्रा घेत दि. १६ जूनपासून बेमुदत संप पुकारला आहे. दरम्यान शासनाच्या वतीने उद्याप कसलाही प्रतिसाद मिळत नसल्याने हा संप सुरुच ठेवण्याचा निर्णय संघटनेने घेतला आहे. दरम्यान या संपामुळे कर्मचाऱ्यांची विविध कार्यालयीन कामे करण्यासाठीची पूर्ण जबाबदारी ही मोटार वाहन निरीक्षकांवर आली आहे. लातूर प्रादेशिक परिवहन विभागातील ६० कर्मचारी संपावर गेले आहेत. संप सुरु असल्याच्या पार्श्र्वभूमीवर आवश्यक कागे वगळता अनेक वाहनधारकांनी आरटीओ कार्यालयाकडे पाठ फिरवली आहे

### मिनी मार्केट रस्त्यावरील खड्ड्यांमुळे वाहनधारक त्रस्त

तभा वृत्तसेवा


लातूर दि २२ जून : शहरातील मिनी मार्केट परिसरातील रस्त्यावर मोठ्या प्रमाणावर खड़े पडल्याने वाहनधारकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. पावसाच्या पाण्यामुळे खड्यांमध्ये पाणी साचत असल्याने या खक्ष्यांचा अंदाज वाहनधारकांना येत नाही. त्यामुळे अपघाताचा धोका वाढला आहे. दुचाकीस्वार आणि ज्येष्ठ नागरिकांना त्रास सहन करावा लागत आहे. हा मार्ग शहरातील प्रमुख मागधिकी एक असल्याने दररोज हजारो वाहनांची ये-जा होत असते. संबंधीत विभागाने तातडीने रस्त्याची दुरुस्ती करुन खड़े बुजवावेत, अशी मागणी नागरिक व व्यापा-यांनी केली आहे

### कामधेनू गोशाळेस चारा कडबा दान

तभा वृत्तसेवा

लातूर दि. २२ जून : जिल्हावार दाम्पत्याने शहरातील कामधेनू गोशाळेत जाऊन गोमातांसाठी एक गाठीभर चऱ्याचा कडबा दान केला गोसेवा हिच खरी ईश्र्वरसेवा मानून केलेल्या या उपक्रमामुळे समाजात गोसेवेचा एक नवा पायंडा पडला आहे. त्यांच्या या सामाजिक जाणिवेचे आणि दातृत्वाचे सर्वत्र कौतुक होत आहे

# आरोग्य निरोगी राहण्यासाठी वर्षभर योगासने करा



तभा वृत्तसेवा

लातूर दि. २२ जून : जगभरातील जवळपास१७० देशांमध्ये योग दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला लातूरमध्ये ही डॉ . बाबासाहेब आंबेडकर पार्क येथे जिल्हा प्रशासन, लातूर शहर महानगरपालिक, पतंजली योग समिती, प्रजापिता ब्रह्मकुमारी संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता .

यावेळी जिल्हाधिकारी डॉ भारत बास्टेवाड यांनी . आरोग्यासोबत च पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी प्रत्येक नागरिकांनी किमान एक झाड लावून त्याचे संवर्धन करावे . असा संकल्प करण्याचे आवाहन केले .

हा योगदिन लातूर जिल्ह्यातील विविध शाळा, महाविपाल ये, संस्था, सरकारी कार्यालये येथे उत्साहात साजरा करताना काही योगासनेही नागरिकांना करून दाखविण्यात आली . त्यातून

निरोगी, आनंदी आणि संतुलित जीवनासाठी योग आवश्यक आहे . नियमित योगासनामुळे शारीरिक तंदुरुस्ती, मानसिक स्वास्थ्य, एकाग्रता वाढत जाते तसेच करे योग, रहे निरोग . हा संदेश मिळाला . यासोबतच योगासने आणि प्राणायम करणे आवश्यक असून अनुलोम-विलोम, कपाल भारती, भस्त्रिका, सूर्य नमस्कार, हास्यासन, शवासन, शीर्षासन, ताडासन, वृक्षासन, भुजंगासन असे विविध योगासने करून आपले जीवन सुखी, समाधानी आणि निरोगी बनवावे आणि योगी व्हा, निरोग राहा असा संदेश उपस्थितांना मिळाला .यावरून जीवनात निरोगी रहायचे असेल तर योगासना शिवाय तरणोपाय नाही असे म्हटले तर अतिशयोक्ती ठरू नये. कारण आजची जीवनशैली बदलली असून माणूस आळशी बनत चालता आहे . व्यायाम शून्य जीवन शैली बनत आहे . प्रत्येका कडे वाहन असल्यामुळे तसेच व्यायामाच्या अभावामुळे आणि संकरीत खाण पान यामुळे नको नको ते नवनवीन आजारांना जणू आपण आमंत्रण च देत असतो .

पूर्वीच्या काळी निरसे दूध पिले जायचे . वाहने नसल्यामुळे पायी फिरणे व्हायचे त्यामुळे भूक लागायची, तसेच अंगमेहनतीचे कामे करावे लागायचे . तसेच सकस आहार घ्यायचे . कोणात्यात मालात बेसळ नसायची जसे दूध, तुप , भाजीपाला . आज सगळीकडे प्रत्येकात बेसळ होत आहे . ज्वारी, गहू, भाजीवाला, दूध . तुप यात बेसळ दिसून येत असल्यामुळे आरोग्याच्या तक्रारी उदभव लागल्या आहेत

यामुळेच तर आज डॉक्टरांची दुकाने गल्ली - बोळात मोठ्या दिमाखात उभी राहताना आपण पाहातो आहोत .

त्यामुळे आपले, आपल्या कुटुंबाचे आरोग्य निरोगी रहावे असे वाटत असेल तर योगासनाशिवाय पर्याय नाही . फक्त योग दिन आला म्हणून त्या दिवशी भल्या पहाटे उठून योग करून चालणार नाही . तर वर्षभर योग करणे आवश्यक आहे . तरच आपण निरोगी राहू शकतो . आपण खातो - पितो यात भेसळ असून सगळा सरकारी खतांवर आलेले धान्य खातो . गावरान खतं मिळत नाहीत . शेतकरी तरी काय करणार ? त्यामुळे तरी किमान वर्षभर योग करणे आवश्यक असून यातून नच आपले, आपल्या कुटुंबाचे आरोग्य निरोगी राहील .

## माजी मंत्री दिलीपराव देशमुख यांचा निलंगेकरांकडून आभारपर सत्कार



तभा वृत्तसेवा

शिरूर अनंतपाळ दि. २२ जून : शहरातील व तालुक्यातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांना जागृती कारखान्याच्या वतीने सन२०२५/२६ गळीत हंगामातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांना सहकार महर्षी. दिलीपराव देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली उच्चांकी प्रतिमेट्रिक टन ३१७७ रुपये ऊस दर दिल्याबद्दल लातूर जिल्हा बँकेचे ज्येष्ठ संचालक तथा भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षाचे प्रदेश उपाध्यक्ष. अशोकराव शिवाजीराव पाटील निलंगेकर यांच्या नेतृत्वाखाली व प्रमुख उपस्थितीत राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी,शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेश सचिव. महादेव आवाळे,नगरसेवक. सुधीर लखनगावे,राष्ट्रवादी शहराध्यक्ष. व्यंकट हांद्राळे यांनी जागृती शुगर्सचे संस्थापक. दिलीपराव देशमुख यांचा सत्कार करून आभार व्यक्त केले.

या वेळी बोलताना राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी,शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेश सचिव. महादेव आवाळे यांनी दिलेला शब्द पाळण्याची परंपरा ही देशमुख परिवाराची असून बोले तैसा चाले,त्याची वंदावी पाऊले या संतवचनाची प्रचिती पुन्हा एकदा महाराष्ट्र राज्याचे माजी मुख्यमंत्री,विकासरत्न स्व.विलासराव देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली स्थापन झालेल्या मांजरा परिवारातील सर्व कारखान्याच्या माध्यमातून आली असून हा उच्चांकी प्रतिमेट्रिक टन ऊस दर आपल्या भागातील शेतकरी यांना फक्त आणि फक्त माजी मंत्री तथा सहकार महर्षी दिलीपराव देशमुख यांच्या कुशल नेतृत्वामुळे शक्य झाले अशी भावना व्यक्त केली.

या वेळी नगरसेवक. सुधीर लखनगावे यांनी दुष्काळाच्या सावटाखाली सापडलेल्या शेतकऱ्यांना उच्चांकी दर दिल्यामुळे बळीराजाच्या जिवनात मोठा आधार जागृती कारखान्याच्या माध्यमातून मिळाला आहे.या मुळे शेतकरी खुप समाधानी असून हे सर्व सहकार महर्षी दिलीपराव देशमुख यांच्या नियोजन , दुर दृष्टीमुळे शक्य झाले अशी भावना व्यक्त केली या वेळी शिंदे,अग्रवाल, शिवणे,ओम आवाळे आदी उपस्थित होते.

## श्रीराम विद्यालयात आंतरराष्ट्रीय योग दिन योगासन,प्राणायाम करून साजरा



तभा वृत्तसेवा

रेणापूर दि. २२ जून : श्रीराम प्राथमिक माध्यमिक उच्च माध्यमिक विद्यालय रेनापुर व पतंजली योग समितीच्या वतीने आज दिनांक २१ जून रोजी आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा करण्यात आला .

याप्रसंगी प्राचार्य अनिल कुटवाड . शिक्षण विस्तार अधिकारी सुदर्शन लहाने ,श्रीराम प्राथमिक विद्यामंदिरचे मुख्याध्यापक चंचला वलसे ,उपप्राचार्य प्रा .भरत धायगुडे , प्रा .पर्यवेक्षक जुबेर खान पठाण . सांस्कृतिक विभाग प्रमुख अमृतेश्र्वर स्वामी , प्रा . लहुकांत शेवाळे , पतंजली योग समितीचे तालूकाध्यक्ष योगाशीक्षक सतीश मोरे, महिला तालूकाध्यक्ष सुरेखा बस्तापुरे यांची उपस्थिती होती . याप्रसंगी धोंडीराम मामडगे,जयप्रकाश हलकुडे , नगरसेवक सचिन मोटेगावकर , नामदेव साबदे,यांची उपस्थिती होती . याप्रसंगी प्राचार्य अनिल कुटवाड यांनी प्राणायाम आणि योगाचे महत्त्व सांगून सशक्त आणि समृद्ध भारतासाठी सातत्याने व नियमित योग प्राणायाम केला पाहिजे असे सांगितले तर योगशिक्षक सतीश मोरे व सुरेखा बस्तापुरे यांनी विविध प्राणायाम व योगासनांचे मार्गदर्शन केले .अनुलोम-विलोम, भस्त्रिका ,कपालभाती ,सूर्य नमस्कार , हास्यासन ,शवासन शीर्षासन ,इत्यादी योगासने व प्राणायाम याचे प्रात्यक्षिक दाखवले व उपस्थिततांकडून प्रात्यक्षिक करून घेतले .

या कार्यक्रमासाठी गावातील नागरिक,पालक ,विद्यार्थी शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी यांची उपस्थिती होती . कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा . लहुकांत शेवाळे यांनी केले तर आभार सांस्कृतिक विभाग प्रमुख अमृतेश्र्वर स्वामी यांनी मानले .याप्रसंगी शिवाजी अकनगिरे,धोंडीराम मामडगे शशीकुमार अकनगिरे. बालाजी हंबीरे ,संजय म्हेत्रे,सत्यपाल राउत ,काशीनाथ दळवी व ग्रामस्थ उपस्थित होते

## लातुरात महेश नवमीनिमित्त आज भव्य शोभायात्रा

तभा वृत्तसेवा

लातूर : लातूर जिल्हा माहेश्र्वरी सभेच्या वतीने महेश नवमीचे औचित्य साधून मंगळवार, दि. २३ जून २०२६ रोजी दुपारी चार वाजता छत्रपती शिवाजी मार्केट यार्डातील गौरीशंकर मंदिरापासून भव्य शोभायात्रा काढण्यात येणार आहे. या शोभायात्रेचा शुभारंभ सहकार महर्षी दिलीपराव देशमुख यांच्या हस्ते होणार आहे.

याप्रसंगी लातूर उच्चतम कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती जगदीश बावणे, दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष लक्ष्मीरमण लाहोटी, उपाध्यक्ष ललितभाई शहा, सचिव रमेश बियाणी, व्यापारी धर्मशाळेची अध्यक्ष रमेश राठी, उद्योजक अशोक भुतडा, धनराज भुतडा आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. गौरीशंकर मंदिरापासून निघालेली ही शोभायात्रा शहरातील प्रमुख मार्गावरून गोदावरीदेवी लाहोटी कन्या प्रशालेच्या प्रांगणात विसर्जित होणार आहे. शोभायात्रेचे विशेष आकर्षण माहेश्र्वरी ढोलताशा पथक असणार आहे. या शोभायात्रेचे संयोजक ईश्र्वर बाहेती, संतोष तोष्णीवाल, गणेश हेड्डा, नंदकिशोर लोया, राहुल लोया, ईश्र्वर चांडक, दिनेश गिल्डा हे आहेत. या शोभायात्रेत माहेश्र्वरी समाजातील बंधू - भगिनींनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन माहेश्र्वरी सभेचे अध्यक्ष प्रकाश कासट , सचिव राजेश मंत्री, संगठन मंत्री फुलचंद काबरा, जगदीश भुतडा यांसह सर्व पदाधिकाऱ्यांनी केले आहे.

# निरोगी राहण्यासाठी योगाचा अंगीकार करावा

## जिल्हाधिकारी डॉ. भारत बास्टेवाड लातूरमध्ये जागतिक योगदिन उत्साहात साजरा



तभा वृत्तसेवा

लातूर दि. २१ जून : भारतीय संस्कृतीचा अमूल्य ठेवा असलेला योग आज जागतिक पातळीवर स्वीकारला गेला असून, निरोगी आरोग्यासाठी प्रत्येकाने दैनंदिन जीवनात योगाचा अंगीकार करावा, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. भारत बास्टेवाड यांनी केले.

जागतिक योग दिनानिमित्त लातूर येथील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर पार्क येथे विशेष योगाभ्यास कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाला लातूरकरांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. जिल्हा प्रशासन, लातूर शहर महानगरपालिका, पतंजली योग समिती आणि प्रजापिता ब्रह्मकुमारी संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने झाली. यावेळी लातूर शहर महानगरपालिकेच्या महापौर जयश्री सोनकांबळे, जिल्हा पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांची प्रमुख उपस्थिती होती.

जगातील सुमारे १७० देशांनी योगाचे महत्त्व ओळखून त्याचा स्वीकार केला आ हे. त्यामुळेच २१ जून हा दिवस आंतरराष्ट्रीय

स्तरावर साजरा केला जात असल्याचे सांगून जिल्हाधिकारी डॉ. बास्टेवाड म्हणाले की, शा रीरिक आणि मानसिक आरोग्यासाठी प्रत्येकाने दररोज किमान एक तास योगाभ्यास केला पाहिजे. तसेच आरोग्यासोबतच पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी प्रत्येक नागरिकाने किमान एक झाड लावून त्याचे संवर्धन करावे, असे आवाहनही जिल्हाधिकारी डॉ. बास्टेवाड यांनी केले.

या प्रसंगी योग शिक्षक विष्णू भुतडा यांच्या मार्गदर्शनाखाली उपस्थितांनी विविध योगासने आणि प्राणायाम केला. केंद्र सरकारच्या आयुष मंत्रालयाने निश्र्चित केलेल्या योग शिष्टाचारानुसार प्रात्यक्षिके सादर करण्यात आली. या कार्यक्रमास जिल्हा क्रीडा अधिकारी महादेव कसगावडे, जिल्हा आयुष अधिकारी डॉ. सुधीर बनशेळकीकर, सृष्टी जगताप तसेच पतंजली योग समिती आणि प्रजापिता ब्रह्मकुमारी संस्थेचे पदाधिकारी, शासकीय अधिकारी, कर्मचारी, मारवाडी राजस्थान माध्यमिक विद्यालय, बंकटलाल लाहोटी इंग्लिश स्कूल, राजा नारायणलाल लाहोटी इंग्लिश स्कूल, देशिकेंद्र माध्यमिक विद्यालय आणि राजमाता जिजामाता माध्यमिक विद्यालयाचे विद्यार्थी उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला जिल्हा आयुष अधिकारी डॉ. सुधीर बनशेळकीकर यांनी प्रास्ताविक केले. जागतिक योग दिनाचे औचित्य साधून जिल्ह्यातील सर्व शासकीय कार्यालये, शाळा आणि महाविद्यालयांमध्येही विविध विशेष कार्यक्रमांचे व योगाभ्यास सत्रांचे आयोजन करण्यात आल्याची माहिती त्यांनी प्रास्ताविकात दिली.

# वादळ वाऱ्याने निकम कुटुंबीयांचा संसार उध्वस्त

## आ. रमेशआप्पा कराड यांनी संपूर्ण साहित्य देऊन आधार दिला



तभा वृत्तसेवा

लातूर दि. २२ जून : अचानकपणे वादळ वाऱ्यासह अवकाळी पाऊस होऊन लातूर ग्रामीणच्या भादा सर्कल मधील मौजे वानवडा येथील अल्पभूधारक शेतकरी काशिनाथ सिद्धू निकम यांचे संपूर्ण घर आणि घरालगत असलेल्या व्यवसायाचे संपूर्ण नुकसान होऊन निकम कुटुंबीय उध्वस्त झाल्याने लातूर ग्रामीणचे आ. रमेशआप्पा कराड यांनी तात्काळ सदर कुटुंबीयास संसार उपयोगी साहित्यासह सर्व प्रकारची मदत केली.

अद्यापही मृगाचा पाऊस झाला नाही सर्वजण पावसाची वाट पाहत असतानाच शनिवारी अचानकपणे वादळ वाऱ्यासह अवकाळी पाऊस होऊन अनेकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. लातूर ग्रामीण मतदार संघात असलेल्या भादा सर्कलमधील मौजे वानवडा येथे झालेल्या अवकाळी पावसामुळे आणि वादळ वाऱ्यामुळे अल्पभूधारक शेतकरी काशिनाथ सिद्धू निकम यांचे घरासह घराच्या परिसरात थाटलेल्या किराणा दुकान, पानटपरी आणि आरो प्लांट या व्यवसायाचे मोठे नुकसान झाले. अत्यंत गरीब असलेल्या निकम कुटुंबीयांनी कष्टातून छोटे-मोठे उद्योग व्यवसाय सुरू करून आपली उपजिविका भागवत असतानाच अचानक झालेल्या या नैसर्गिक आपत्तीमुळे घरावरील संपूर्ण पत्र्याचे शेड उखडून गेले. साईडच्या भिंती जमीन दोस्त झाल्याने अनेक वस्तूची मोडतोड झाली. अवकाळी पावसाने अन्नधान्य, कपडे, अंथरून पांघरून भिजून गले. संसार उपयोगी भांडीकुंडीसह सर्व प्रकारच्या वस्तू आणि साहित्याची दयनीय अवस्था निर्माण झाली तर किराणा दुकानासह पानटपरी बरोबरच अत्यंत मेहनतीतून आणि कष्टातून उभारलेला आरो प्लांट (शुद्ध पाणीपुरवठा) छोटासा व्यवसाय उध्वस्त झाला.

या नैसर्गिक आपत्तीत उघड्यावर आलेल्या निकम कुटुंबीयांना लातूर ग्रामीणचे आ. श्री. रमेशआप्पा कराड यांनी शनिवारी मोठा आधार दिला. भाजपाच्या लातूर येथील संवाद कार्यालयात कदम कुटुंबीयातील सुमनबाई काशिनाथ निकम व त्यांचा मुलगा बळीराम निकम यांना आ. रमेशआप्पा कराड यांनी संसार उपयोगी सर्व प्रकारची भांडीकुंडी व इतर साहित्यसह दैनंदिन वापराचे कपडे, अंथरून पांघरून यासह तात्काळ लागणारे अन्नधान्य देऊन मोठा आधार दिला.

याप्रसंगी जिल्हा परिषदेचे सदस्य महादेव साळुंके, रेणापूर तालुका संगायो अध्यक्ष सतिश आंबेकर, वानवडा येथील सरपंच फुलचंद अंधारे, उपसरपंच दीपक काळे, लिंबराज सोमवंशी, राजेंद्र घोडके, नितीन अंधारे यांच्यासह इतर अनेकांची उपस्थिती होती. आ. रमेशआप्पा कराड यांनी तातडीने मदत देऊन मोठा आधार दिल्याबद्दल निकम कुटुंबीयांनी यावेळी आ. कराड यांचे आभार व्यक्त केले.

## योग दिनाचा उत्साह...



### आदर्श सैनिक स्कूल, कुर्डूवाडी

आदर्श सैनिक स्कूल, कुर्डूवाडी येथे योग दिन साजरा केला. सर्व कॅडेट्सनी निरोगी जीवनाचा संदेश दिला. सुरुवात वॉर्मिंग अपने झाली. योगासने, प्राणायाम, झुम्बा डान्स, आदर्श गीत आणि ५१ सूर्यनमस्कार आदी उपक्रम झाले. सर्व कॅडेट्सनी सहभाग नोंदवत उत्कृष्ट शिस्त व एकजूट दाखवली. संस्थापक अध्यक्ष अमोल सुरवसे आणि प्रकल्प संचालिका पूजा सुरवसे यांनीही योगाभ्यास केला.



### श्री शंकरलिंग प्रशाला, वळसंग

वळसंग (ता.द. सोलापूर) येथील श्री शंकरलिंग माध्यमिक व उच्च माध्यमिक प्रशालेत योगदिन साजरा केला. कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य वीरेश थळंगे होते. संतोष कस्तुरे यांनी प्रास्ताविक केले. सुरुवात योगावर आधारित प्रार्थनेद्वारे करूंन सहावी व सातवीतील विद्यार्थिनींनी संगीतावर आधारित प्रात्यक्षिकांसह नृत्याद्वारे योगासनाचे प्रकार सादर केले. कार्यक्रमासाठी पर्यवेक्षक शिवानंद घोडके, तानाजी जमादार, सिद्धाराम भैरामडगी, श्रीमंत भोसले, बसवराज दुधगी, संतोष शिंदे, विरेश थळंगे, सिध्दारूढ हिरेमठ, गंगाधर बिराजदार, मल्लिनाथ गौडगाव, शिवराज अष्टगी, अजय माणकोजी, शरणय्या मसुती, विजयालक्ष्मी थळंगे, शैला निंबाळ, गंगा बागलकोटी, स्नेहा हळगोदे, प्रतिभा तांडुरे, राजश्री दुधगी, गौरीशंकर चनशेट्टी, विनोद दुधगी, सुनिता कुर्ले आदिंनी परिश्रम घेतले. बाळकृष्ण गुंड यांनी सूत्रसंचालन केले.



### स्विमिंग ग्रुप, अक्कलकोट

योग विद्या ही भारताला लाभलेली महान प्राचीन परंपरा असल्याचे प्रतिपादन स्विमींग ग्रुपचे संस्थापक महेश इंगळे यांनी केले. स्विमिंग ग्रुपतर्फे योग प्रशिक्षक विद्याधर गुरव, सनदी लेखापाल ओंकारेश्वर उटगे, डॉ.चिंचोळी, आप्पा गवळी यांच्या मार्गदर्शनाखाली योग दिन साजरा केला. यावेळी ते बोलत होते. प्रारंभी महेश इंगळे, प्रथमेश इंगळे यांच्या हस्ते श्री स्वामी समर्थांच्या प्रतिमेचे पुजन केले. शिबीरात स्विमींग ग्रुपमधील प्रथमेश इंगळे, संतोष पराणे, समर्थ पराणे, श्रीनाथ पराणे, सचिन किरनळ्ळी, मा.प्राचार्य डॉ.शिवराया आडवितोट, नगरसेवक अविनाश मडीखांबे, नगरसेवक शैलेश राठोड, समर्थ पराणे, विश्वनाथ देवरमनी, कुमार हत्तुरे, रमेश कणबसे, शेखर आडवीतोटे, रामलिंगय्या स्वामी, रफिक पठाण, मोईन पठाण, प्रितेश किलजे, अंकुश केत, सुनील पवार, मधुकर सदाफुले, शिवशरण पाटील, श्रीकांत झिपरे, राजू एकबोटे, सैदप्पा इंगळे, श्रीशैल गवंडी, अमर पाटील, डॉ. राजू मलंग, मेजर अमोल माने, दत्तात्रय कटारे, डॉ. पांडुरंग पाटील, संदीप पंडित, शांतय्या स्वामी, तन्मय इचगे, सिद्धाराम बिडवे, मनोज जगताप सर, संतोष जवळगी, संदीप बिराजदार, गणेश कांदे, राहुल स्वामी, श्रीनिवास गुंजे, सागर माळी, पिंटू स्वामी, सिद्धाराम अष्टगे, संतोष मुळे, विपुल गवळी, निखिल गवळी, अथर्व वाकडे, शिवराज जमगे, रेवणू स्वामी, महांतेश कुंभार, डॉ.श्रीकांत पाटील, तारापुरे साहेब, समर्थ भोसले, समर्थ स्वामी, प्रसाद इंगळे, आदित्य किलजे वर्धन चिंचोळी, गिरीश पाटील, अजिंक्य पाटील, अनिकेत कांबळे, आयुष्मती उटगे, श्रीपाद उटगे, अथर्व कोम्पा, गिरीश पाटील, अजिंक्य पाटील, कीर्ती एकबोटे, जानवी एकबोटे, रमेश शिंदे आदी सहभागी झाले होते.


### पद्मनगर बास्केटबॉल अकॅडमी




सोलापुरातील अशोक चौक भागातील पद्मनगर बास्केटबॉल अकॅडमीतर्फे योग दिन साजरा झाला. भारतीय योग संस्थान केंद्र दिल्ली, सोलापूर इंद्रभुवन शाखेचे योग प्रशिक्षक नागेश कन्नूरकर, अंजली वीटकर व माजी मुख्याध्यापक श्रीशैल गुरव यांनी मार्गदर्शन केले. त्यानी खेळाडूंकडून योगासने करून घेतली. मान्यवरांचा सत्कार ऐश्वर्या होनकोरे, अर्चना बोमड्याल, श्रीधर गायकवाड, प्रबुध्द चिंचोलीकर व मार्गम यांनी केला. सूत्रसंचालन आनंद वलाकाटी यांनी केले.

## निधन वृत्त...

### नागनाथ गुंड



**सोलापूर, दि. २२ जून-**

ए/२४ शिवनेरी पार्क, डोणगांव रोड येथील रहिवासी नागनाथ यशवंत गुंड (वय ८१) यांचे दीर्घ आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात एक मुलगा, सून, नातवंडे असा परिवार आहे.

# वीज, पाणी, नुकसान भरपाईसाठी 'स्वाभिमानी' आक्रमक

## जिल्हाधिकारी कार्यालयावर आंदोलन; मागण्या मान्य न झाल्यास मोर्चाचा इशारा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २२ जून-**

भीमा नदीकाठच्या शेतकऱ्यांचा वीजपुरवठा कमी केल्याने पिके धोक्यात आली आहेत. शेतीसाठी आवश्यक वीज, पाणी आणि नुकसानभरपाईच्या मागण्यांसाठी स्वाभिमानी शेतकरी संघटनेने आक्रमक भूमिका घेतली आहे. सोमवारी दि. २२ जून रोजी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर स्वाभिमानी शेतकरी संघटनेने आंदोलन केले. मागण्यांकडे प्रशासनाने तातडीने लक्ष न दिल्यास जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढण्याचा इशारा स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे माजी खासदार राजू शेट्टी यांनी दिला आहे.

जिल्हाध्यक्ष विजय रणदिवे यांनी जिल्ह्यातील विहीर, बोअरवेल व इतर कृषी पंपधारक शेतकऱ्यांना सलग दहा तास पूर्ण क्षमतेने वीजपुरवठा देण्याची मागणी केली. शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर दीर्घकालीन उपाययोजना करण्यासाठी उजनी धरणातून शेतीसाठी अतिरिक्त पाणी सोडणे, भीमा नदीवर अत्याधुनिक बंधारे उभारणे आणि जिल्ह्यातील थकीत ऊस बिले तातडीने अदा करावीत, अशा मागण्याही निवेदनातून मांडल्याचे त्यांनी सांगितले. याशिवाय, २०२५ मधील पीकविम्याची रक्कम त्वरित वितरित करणे, सरसकट कर्जमाफी लागू करणे, महापुरामुळे नदीकाठच्या जमि




> भीमा नदी कालव्यावरील शेतकऱ्यांना सध्या केवळ दोन तास वीजपुरवठा केला जात आहे. उन्हाळ्यात मोठ्या कष्टाने जगविलेली पिके आता पावसाळ्याच्या तोंडावर वीजेअभावी संकटात सापडली आहेत. त्यामुळे हा आदेश तात्काळ रद्द करून भीमा नदीकाठच्या शेतकऱ्यांना किमान आठ तास वीजपुरवठा करावा.
>
> **- राजू शेट्टी, माजी खासदार, स्वाभिमानी शेतकरी संघटना.**

नींचे झालेले नुकसान भरून काढण्यासाठी तातडीची नुकसानभरपाई देणे, तसेच वीज खांब, तारा व ट्रान्सफॉर्मरच्या बिघाडामुळे होणाऱ्या नुकसानीची जबाबदारी महावितरणने स्वीकारून भरपाई द्यावी, अशी मागणी संघटनेने केली आहे.

शेतीसाठी आवश्यक असलेल्या मूलभूत सुविधा आणि शेतकऱ्यांच्या आर्थिक प्रश्नांकडे दुर्लक्षाने जिल्ह्यातील शेतकरी नाराज आहेत. प्रशासनाने सकारात्मक निर्णय न घेतल्यास व्यापक जनआंदोलनाचा इशाराही निवेदनातून दिला आहे. यावेळी मोहसीन पटेल, तानाजी बागल, सचिन पाटील, शिवाजी पाटील, इकबाल मुजावर, अब्दुलरझाक मकानदार, अजिनाथ परबत, सचिन अटकळे, शहाजान शेख, युवराज घुले उपस्थित होते.



## करमाळ्यात योग दिनानिमित्त योग दिंडी

**तभा वृत्तसेवा,**
**जेऊर दि.२२ जून-**

बाराव्या आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त करमाळा येथील ध्यान योग साधना केंद्र, भारत स्वाभिमान न्यास आणि आर्ट ऑफ लिव्हिंग, करमाळा यांच्या संयुक्त विद्यमाने भव्य योग दिंडीचे आयोजन करण्यात आले. योगाचा प्रसार-प्रचार व्हावा, देशाचा अभिमान व स्वाभिमान वृद्धिंगत व्हावा, प्रत्येकाने आपल्या आरोग्याची काळजी घ्यावी आणि समाजामध्ये योगाविषयी जनजागृती निर्माण व्हावी, या उद्देशाने या योग दिंडीचे आयोजन करण्यात आल्याची माहिती ध्यान योग साधना केंद्राचे संचालक बाळासाहेब नरारे यांनी दिली. दिंडीची सुरुवात छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. शहरातील प्रमुख मार्गांवरून निघालेल्या या दिंडीला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. दिंडीची सांगता ही वीस मिनिटांचे ध्यान घेऊन करण्यात आली.

## कोळेकर महास्वामींचा पुण्यस्मरण सोहळा उत्साहात

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि.२२ जून-**



जीवनात एकच गुरु करा. त्यांच्यावर निष्ठा, प्रेम ठेवा. अडचणीतून तोच तुम्हाला बाहेर काढणार आहे. म्हणजे गुरु हा जीवन मार्गातील दीपस्तंभ आहे असे कोळेकर महास्वामी ३१ वे पिठाधिपती यांनी कोळेकर महास्वामी ३० वे पिठाधिपती यांच्या द्वितीय पुण्यस्मरण सोहळ्यानिमित्त कोळे (ता.सांगोला) मठात आशीर्वाचनात सांगितले.

यावेळी शिवाचार्य वेळापूरकर महास्वामी उपस्थित होते. याप्रसंगी हनुमंत कोरे व मुक्तापुरे महाराज यांनी मनोगत व्यक्त केले. ३० वे पीठाधिपती कोळेकर महाराज यांनी कधीही भेदभाव व जातीभेद केला नाही. सर्वांवर प्रेम केले. त्यांच्यामुळे आज मी कीर्तनात उभा आहे. हा माझ्या आयुष्यातील सुवर्णक्षण आहे. तसेच गुरुच्या माध्यमातून देवाचे दर्शन होते असे कीर्तनात सचिन कुंभार महाराज यांनी सांगितले. सदर प्रसंगी कोळेकर व वेळापूरकर महास्वामींचे स्वागत तानाजी गोडसे व प्रभू कोरे यांनी केले. महाआरती रामहरी गोडसे व अर्चना गोडसे यांच्या शुभहस्ते करण्यात आली. त्यानंतर महाप्रसाद वाटप करण्यात आला. याप्रसंगी हर हर महादेव, माऊली..माऊली..गुरुराज माऊली. माझी कोळेकर माऊली नावाने मोठ्याने जयघोष करण्यात आला.




## डोंबाळवाडीतील शेतकऱ्यांना कृषिदूत करणार मार्गदर्शन

**तभा वृत्तसेवा,**
**पिलीव, दि. २२ जून-**

महात्मा फुले कृषी विद्यापीठ राहुरी अंतर्गत पानीव (ता. माळशिरस) येथील श्रीराम कृषी महाविद्यालयातील चौथ्या वर्षात शिकणाऱ्या विद्यार्थ्यांचे ग्रामीण कृषी कार्यानुभव कार्यक्रमांतर्गत डोंबाळवाडी गावात आगमन झाले. हे कृषिदूत पुढील तीन महिने गावात मुक्कामी राहून शेतकऱ्यांना विविध पिकांविषयी मार्गदर्शन करणार आहेत. तीन महिन्यांच्या कालावधीत हे कृषिदूत विविध पिकांच्या लागवडीपासून ते काढणीपश्चात व्यवस्थापनापर्यंत मार्गदर्शन करणार आहेत. राणासिंग भैस, रोहन लावंड, कैवल्य लाडे, प्रकाश शिंदे, विराज रेड्डे, गौरव खारे, श्रीराम जाधव हे कृषिदूत मार्गदर्शन करणार आहेत. या कृषिदूतांना श्रीराम शिक्षण संस्थेचे अध्यक्ष प्रकाश पाटील, मार्गदर्शक श्रीलेखा पाटील, उपाध्यक्ष करण पाटील, सचिव ॲड.अभिषेक पाटील, प्रमोद झगडे, प्राचार्य हरी हाके, प्राचार्य पांडुरंग कोळेकर, प्राचार्य सुगंध शिंदे, प्रा. शेख, प्रा. राऊत यांचे मार्गदर्शन लाभत आहे.



## ज्येष्ठ नागरिकांच्या मागण्या शासन दरबारी मांडून सोडवणार : आ. देशमुख

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि. २२ जून-**

समर्थ यश नागरिक संघ, सांगोला तालुका ज्येष्ठ नागरिकांतर्फे प्रलंबित मागण्यांसंदर्भात आ.बाबासाहेब देशमुख यांना निवेदन देण्यात आले. यावेळी आ. देशमुख यांनी निवेदन स्वीकारून ज्येष्ठ नागरिकांच्या मागण्या येत्या अधिवेशनात मांडून त्यासाठी पाठपुरावा केला जाईल, असे आश्वासन दिले. महाराष्ट्रातील ज्येष्ठ नागरिकांसाठी लागू असलेल्या शासकीय सवलती व कल्याणकारी योजना ६५ वर्षांच्या वयोमर्यादेऐवजी ६० वर्षांपासून लागू कराव्यात, दरमहा किमान तीन हजार रुपये मानधन स्वरूपात आर्थिक मदत द्यावी, ज्येष्ठ नागरिकांसाठी स्थापन आर्थिक महामंडळावर ५० टक्के प्रतिनिधित्व ज्येष्ठ नागरिकांना सभासद म्हणून द्यावे, रेल्वे प्रवासात महिलांना ५० टक्के व पुरुषांना ४० टक्के मिळणारी सवलत कोविड काळात बंद केली असून ती पुन्हा सुरू करावी, ज्येष्ठ नागरिकांच्या प्रश्नांना विधिमंडळात प्रभावीपणे आवाज मिळण्यासाठी महाराष्ट्र ज्येष्ठ नागरिक महासंघाचे दोन प्रतिनिधी विधानपरिषदेत सदस्य म्हणून नियुक्त करावेत. तेलंगणातील कर्मचारी उत्तरदायित्व व पालक आधार देखरेख विधेयक २०२० च्या धर्तीवर महाराष्ट्रात कायदा करावा आणि केरळप्रमाणे स्वतंत्र ज्येष्ठ नागरिक आयुक्तालय सुरू करावे,आदी मागण्या निवेदनात केल्या आहेत. याप्रसंगी संघाचे अध्यक्ष नवनाथ पवार, कार्याध्यक्ष अरुण वाघमोडे, सचिव वसंत दिघे, विष्णू चव्हाण गुरुजी उपस्थित होते.

## विवेकानंद प्रतिष्ठान, पतंजली योग समितीतर्फे योग दिन

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि २२ जून-**

आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त विवेकानंद प्रतिष्ठान अक्कलकोट व पतंजली योग समिती यांच्या संयुक्त विद्यमाने ए-वन चौक येथील विठ्ठल मंदिर परिसरात उत्साहपूर्ण वातावरणात योग शिबिराचे आयोजन करण्यात आले. योग कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून करण्यात आली.

यावेळी अक्कलकोट नगरपरिषदेचे उपनगराध्यक्ष ऋतुराज राठोड, नगरसेवक रमेश कापसे, अशोक जाधव, उर्मिला शिंदे, नगरसेविका अपर्णा सिद्धे, मल्लिकार्जुन मसुती, प्रदीप पाटील, दिनेश पटेल, अंदप्पा कळके, योगशिक्षक कस्तुरीताई गुरव, परमेश्वर जकापुरे उपस्थित होते.

याप्रसंगी विवेकानंद प्रतिष्ठानचे अध्यक्ष आ. सचिन कल्याणशेट्टी यांनी यावेळी मार्गदर्शन केले. कार्यक्रमात योगशिक्षक परमेश्वर गुरव व माणिक माशाळे यांनी विविध योगासनांचे प्रात्यक्षिक सादर



करून उपस्थितांना योगाचे धडे दिले. यावेळी नगराध्यक्ष मिलन कल्याणशेट्टी, राजशेखर उंबरणीकर, विजयकुमार पाटील, विलास कोरे, मल्लिकार्जुन आळगी, गुरुपादप्पाआळगी, दयानंद बिडवे, शिवशरण जोजन, राजू हिप्परगी, संजय हारकुड, डॉ. सतीश बिराजदार, वेद मूर्ती बसवराज शास्त्री तीर्थ, गजानन पाटील, डॉ. बसवराज नंदीकोले, राजशेखर हिप्परगी,सत्यजीत लोके, शिवशरण जोजन,मल्लिनाथ मजगे, मलकप्पा भरमशेट्टी, ज्ञानेश्वर शिंदे, सुरेश आवटे, विश्वनाथ नवभागे उपस्थित होते. सूत्रसंचालन विश्वनाथ देवरमनी यांनी केले तर आभार चंद्रकांत दसले यांनी मानले.

## प्रचंडे प्रशालेत योग दिन साजरा

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. २२ जून-**

अक्कलकोट तालुक्यातील नागणसूर येथील एच.जी.प्रचंडे माध्यमिक व उच्च माध्यमिक प्रशालेत आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा करण्यात आला. या कार्यक्रमात शाळेतील सर्व विद्यार्थी-विद्यार्थींनी, प्राध्यापक, शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी सक्रिय सहभाग नोंदवला. कार्यक्रमासाठी प्रमुख प्रशिक्षक म्हणून प्रचंडे प्रशालेतील उच्चमाध्यमिक विभागातील सहशिक्षक अनिल इंगळे यांनी उपस्थित विद्यार्थ्यां व शिक्षक यांना विविध योगासनांचे प्रत्यक्ष प्रात्यक्षिक करून दाखवले. तसेच चुकीच्या पद्धती टाळून योग्य रीतीने योगासने कशी करावीत, याविषयी महत्त्वपूर्ण मार्गदर्शन केले. त्यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी ताडासन, भुजंगासन, वज्रासन आणि प्राणायाम, सूर्यनमस्कारासारखी आसने केली. सुरुवातीला प्रशालेचे प्राचार्य शंकर व्हनमाने यांनी आपल्या प्रास्ताविक केले. प्राध्यापक चिदानंद मठपती यांनी शिर्षासनाचे महत्व सांगून प्रत्येकक्षात करून दाखविले. यावेळी ज्येष्ठ शिक्षीका सूनिता आलूरकर, क्रिडाशिक्षक ईरण्णा धानशेट्टी, प्राध्यापक प्रशांत नागूरे, बसवराज कोळी, सहशिक्षक बसवराज धानशेट्टी, संजयकुमार गंगदे, विश्वनाथ वाघमोडे, सोमशेखर कळसगोंडा, अजय पाटील, प्रमिला शिवगुंडे, थावरू चव्हाण, चन्नवीर कल्याण, अर्चना मणूरे, माणिक किणगी, सागर पोद्दार उपस्थित होते.

# कन्नड भाषेच्या जतनासाठी सामूहिक प्रयत्नांची गरज

## कर्नाटक विद्यावर्धक संघाच्या दहाव्या महामेळ्यातील सूर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २२ जून-**

कन्नड ही केवळ संवादाची भाषा नसून ती कर्नाटकाची संस्कृती, परंपरा आणि अस्मितेचे प्रतीक आहे. बदलत्या काळात कन्नड भाषेसमोर उभ्या राहणाऱ्या विविध आव्हानांच्या पार्श्वभुमीवर तिच्या संवर्धनासाठी व्यापक प्रयत्नांची आवश्यकता असल्याचे मत देशभरातील कन्नड संघटनांच्या महामेळाव्यात व्यक्त करण्यात आले. कर्नाटकाबाहेरील कन्नड भाषिकांना मदत व प्रोत्साहन देण्यासाठी कर्नाटक विद्यावर्धक संघाने राज्य सरकारशी समन्वय साधून ठोस कार्यक्रम राबवावेत, अशी मागणीही यावेळी करण्यात आली.

हुतात्मा स्मृती मंदीरातील शिवयोगी सिध्दरामेश्वर विचारपीठावर धारवाड येथील कर्नाटक विद्यावर्धक संघाच्यावतीने आणि सोलापूर जिल्ह्यातील विविध कन्नड संघटनांच्या सहयोगाने आयोजित दहाव्या अखिल भारतीय राज्याबाहेरील (होरनाडू) कन्नड




संघांच्या प्रतिनिधींच्या दोन दिवसीय महामेळ्याचा आरंभ उत्साहात झाला. किरीटेश्वरमठाचे निरंजनमूर्ती स्वामीनाथ महास्वामी यांच्या सानिध्यात झालेल्या या मेळ्याच्या अध्यक्षस्थानी कर्नाटक विद्यावर्धक संघाचे अध्यक्ष चंद्रकांत बेल्लद होते. यावेळी हंपी विद्यापीठाच्या माजी कुलगुरू मल्लिका घंटी, माजी शिक्षण आयुक्त वेंकटेश मल्लप्पनवरू, बसवप्रभु होसकेरी, शंकर कुंबी, शिवानंद भाविकट्टी यांच्यासह विद्यावर्धक संघाचे पदाधिकारी उपस्थित होते.

बसवप्रभू होसकेरी यांनी प्रास्ताविकात विद्यावर्धक संघाने या पुर्वी घेतलेल्या ९ महामेळ्यांचा आढावा घेतला. विद्यावर्धक संघाचे सरचिटणीस शंकर हलगत्ती यांनी स्वागत करून कार्यक्रमाची भूमिका सांगितली. प्रारंभी डॉ.ज्योतीलक्ष्मी कोडलगी यांनी वचन गायन केले. दीपप्रज्वलन आणि नाडगीतेने कार्यक्रमाचा आरंभ झाला. सतीश तुरमरी यांनी आभार मानले.

### शरणांची वचने सर्वकालीन मार्गदर्शक

वचनकारांची समकालीन प्रस्तुतता या विषयावरील परिसंवादात कलबुरगी येथील प्रा. मिनाक्षी बाळी यांनी १२ व्या शतकातील शरण चळवळीतून जन्मलेल्या वचन साहित्याचे समकालीनत्व उलगडून दाखविले. शिवयोगी सिध्दरामेश्वर, महात्मा बसवेश्वर आणि अल्लमप्रभू यांच्यासह इतर शरणांच्या वचनांतील दाखले देत डॉ. बाळी यांनी समकालीन संदर्भातील उपयुक्तता सांगितली. परिसंवादत धारवाड येथील सविता नडकट्टी यांनी शरण साहित्य हे शाश्वत साहित्य असून सर्वकालीन मानवजातीला मार्गदर्शक असल्याचे सांगितले. वचन साहित्य वाचविण्यासह शरणांच्या संरक्षणात शिवयोगी सिध्दरामेश्वर आणि राणी चामलादेवी यांचे योगदान मोठे असल्याचे नडकट्टी यांनी सांगितले. 'सोन्नलगी सिद्धराम' या विषयावर डॉ.भिमाशंकर बिराजदार, इंदुमती बसवंती आणि एन.एम. मरूळाराध्य यांनी विचार मांडले. परिसंवादाच्या अध्यक्षस्थानी डॉ. के. एस.कौजलगी होते.

## विविध शाळांतील योग दिन



अहिल्याबाई प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालयात अतिशय उत्साही वातावरणामध्ये आंतरराष्ट्रीय योगा दिन साजरा करण्यात आला.

### नूतन मराठी विद्यालय



**सोलापूर, दि. २२ जून-**

आजच्या युगातील धावपळीच्या जीवनात मानवाचे आरोग्य निरोगी व सुदृढ राहावे असे सर्वांना वाटते त्यासाठी आता सर्वांनाच योगाचे महत्त्व पटलेले आहे. सूर्याच्या किरणांनी शरीराचे सौंदर्य आणि शरीर निरोगी होते. म्हणूनच या दिवशी नूमवि शिशु शाळेमध्ये आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा करण्यात आला. यावेळी विवेकानंद केंद्राचे कार्यकर्ते जितेंद्र महामुनी तसेच आनंद टाक यांनी योगाचे महत्व मुलांना पटवून दिले. मोठ्या गटाच्या विद्यार्थ्यांनी वैशाली पाटील व स्नेहा गडकर यांच्या समवेत सूर्यनमस्कार घातले. मुख्याध्यापिका अर्चना कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाने सांस्कृतिक प्रमुख अलका ओक, मृणाल देशपांडे, स्नेहा गडकर, सारिका कुलकर्णी यांनी कार्यक्रम यशस्वीरित्या पार पाडला. सूत्रसंचालन माधुरी फंड यांनी केले.

### आदर्श बालक मंदिर



**सोलापूर, दि. २२ जून-**

आदर्श बालक मंदिर शिवाजीनगर मोदी या शाळेत आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा करण्यात आला. शाळेतील सहशिक्षक मोहन साठे यांनी योगासन प्रकार प्रात्यक्षिक व माहिती विद्यार्थ्यांना दिली. त्यामध्ये अनुलोम,विलोम, भुजंगासन,गरुडासन, कपालभाती व सूर्यनमस्कार असे विविध प्रकार करून घेतले. योगासनामुळे आरोग्य, मन व बुद्धी चांगली विकसित होते याबाबत माहिती दिली. कार्यक्रमास संस्था सचिव अरुण गायकवाड व शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्षा सुनिता गायकवाड यांचे मार्गदर्शन लाभले. कार्यक्रमाचे आयोजन शाळेच्या मुख्याध्यापिका संगीता शिर्के व सूत्रसंचलन जनार्दन वाघमारे यांनी केले.

### छत्रपती शिवाजी महाविद्यालय



**सोलापूर, दि. २२ जून-**

छत्रपती शिवाजी कनिष्ठ महाविद्यालय येथे आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त योगासनाचे महत्त्व या विषयावर प्रा. सचिन गायकवाड यांनी विद्यार्थी व प्राध्यापक यांना मार्गदर्शन केले. यावेळी विद्यार्थी व शिक्षकांनी वज्रासन, पद्मासन, पर्वतासन, भुजंगासन, , वक्रसन, ताडासन, वृक्षासन, आदी योगाआसन केले. यावेळी प्राचार्य मंजुश्री सपाटे, पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रास्ताविक प्रा. शंभूदेव गावडे यांनी केले तर आभार प्रा. अश्विन नागणे यांनी मानले यावेळी प्रा हरीश गरड, प्रा सौ पवार, प्रा. साळुंखे, प्रा. शिंदे, प्रा. स्वार, प्रा. गिरीश लोंढे, प्रा. सुरवसे, प्रा. पांढरे, प्रा. संदीप गायकवाड, रोहन हावळे उपस्थित होते

### संत निरंकारी मिशन शाखेत योग दिन साजरा

**सोलापूर, दि. २२ जून-**

आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त संत निरंकारी मिशनच्या विविध शाखांमध्ये योग आणि आध्यात्मिक जागृतीवर आधारित कार्यक्रमांचे यशस्वी आयोजन करण्यात आले. याच अनुषंगाने सोलापूर झोनचे झोनल इंचार्ज इंद्रापलसिंह नागपाल जी यांनी माहिती देताना सांगितले की, संत निरंकारी मिशनची शाखा अंत्रोळीकर नगर भाग १, कुमठा नाका येथेही योग दिन साजरा करण्यात आला. संत निरंकारी चॅरिटेबल फाउंडेशनचे सचिव आदरणीय जोगिंदर सुखीजा यांच्या माहितीनुसार, मिशनतर्फे देशभरातील १५०० हून अधिक केंद्रांवर सामूहिक योग कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमाचा मुख्य उद्देश शारीरिक आरोग्य, मानसिक संतुलन आणि आध्यात्मिक चेतना यांना प्रोत्साहन देणे हा होता.

### एसटी बसच्या धडकेत ८० वर्षीय वृध्दा ठार

**सोलापूर, दि. २२ जून-**

एसटी बसच्या धडकेत भूम येथे राहणारी ८० वर्षीय वृद्ध महिला ठार झाल्याची घटना रविवारी रात्री घडली. रुक्मिणी विश्वनाथ माळी (वय ८० वर्ष , रा.भूम ,जी धाराशिव) असे मयत झालेल्या महिलेचे नाव आहे. त्या रविवारी रात्री नऊ वाजेच्या सुमारास भूम येथील एसटी स्टँडजवळ पायी निघाल्या असताना त्यांना महाराष्ट्र परिवहन मंडळाच्या बसने पाठीमागून धडक दिली .या धडकेत त्या मार लागून जखमी झाल्या . त्यांना धाराशिव येथील सरकारी दवाखान्यात प्रथमोपचार करून पहाटे दीड वाजता मुलगा दत्तात्रय यांनी येथील शासकीय रुग्णालयात दाखल केले असता डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले .

# नैसर्गिक नाला पूर्ववत करण्यास उच्च न्यायालयाची मान्यता

## महापालिकेच्या पूरनियंत्रण कारवाईला कायदेशीर दुजोरा

## महापालिकेची भूमिका ग्राह्य धरत सर्व याचिका फेटाळल्या

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२२ जून-**

जुळे सोलापुरातील होटगी रोड परिसर येथील नैसर्गिक नाला पूर्ववत करण्याच्या सोलापूर महानगरपालिकेच्या निर्णयाला मुंबई उच्च न्यायालयाच्या कोल्हापूर खंडपीठाने कायदेशीर मान्यता दिली आहे. न्यायालयाने महानगरपालिकेची भूमिका ग्राह्य धरत संबंधित सर्व रिट याचिका फेटाळून लावल्या.

होटगी रोडवरील मुलतानी बेकरी कॉर्नरपासून दक्षिण मध्य रेल्वे नाल्याच्या मिळणीपर्यंतचा नाला क्रमांक १ हा नैसर्गिक नाला असून त्याचा प्रवाह वर्षानुवर्षे अस्तित्वात असल्याचे भारतीय



सर्वेक्षण विभागाच्या १९७८ आणि २००१ च्या टोपोशीटमध्ये नमूद आहे.

मात्र, परिसरातील लेआऊट विकासादरम्यान या नाल्याचे मूळ पात्र बदलून सुमारे ९० अंश कोनात वळविण्यात आले. त्यामुळे नैसर्गिक जलप्रवाहात अडथळे निर्माण होऊन सप्टेंबर २०२५ मधील अतिवृष्टीदरम्यान नवोदय नगर, मुलतानी बेकरी परिसर आणि मजरेवाडी भागात पूरसदृश्य परिस्थिती निर्माण झाली होती.

महापालिकेच्या आपत्ती व्यवस्थापन समितीने टोपोशीट, गुगल इमेजेस, तांत्रिक सर्वेक्षण अहवाल आणि क्षेत्रीय पाहणीच्या आधारे नाल्याची मूळ अलाइनमेंट निश्चित केली. त्यानुसार नाला पूर्ववत करण्याचा निर्णय घेण्यात आला. महापालिकेच्या आपत्ती व्यवस्थापन आराखड्यासह विकास आराखड्यात समावेश करण्यात आला आहे.

आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५ च्या कलम २६ व ३० अंतर्गत संबंधित जमीनधारकांना नोटिसा बजावण्यात आल्या होत्या. या नोटिसांना आव्हान देत नेताजी भोपळे, विलास ताकमोगे आणि मारुती ताकमोगे यांनी उच्च न्यायालयात याचिका दाखल केल्या होत्या.

महापालिकेने न्यायालयात मांडलेल्या बाजूनुसार, नैसर्गिक नाल्याचा प्रवाह बदलल्यामुळे पूरस्थिती निर्माण झाली असून नागरिकांच्या जीवित व मालमत्तेच्या सुरक्षेसाठी नाला पूर्ववत करणे अत्यावश्यक आहे.

१८ जून २०२६ रोजी दिलेल्या निकालात न्यायालयाने नैसर्गिक जलप्रवाह पूर्ववत करणे, नाल्यांची स्वच्छता करणे आणि पूरनियंत्रणासाठी उपाययोजना राबविणे हे महानगरपालिकेच्या अधिकारक्षेत्रात येत असल्याचे स्पष्ट केले.

या निर्णयामुळे सोलापूर महानगरपालिकेच्या पूरनियंत्रण, आपत्ती व्यवस्थापन आणि नैसर्गिक जलप्रवाह पुनर्स्थापना उपक्रमांना महत्त्वाचा कायदेशीर आधार मिळाला असल्याचे सांगण्यात येते.

### उपाययोजनांना कायदेशीर आधार प्राप्त


नैसर्गिक नाला पूर्ववत करण्यास उच्च न्यायालयाची मान्यता मिळाली असून सोलापूर महानगरपालिकेची कारवाई पूर्णतः कायदेशीर ठरली आहे. या निर्णयामुळे शहरातील पूरनियंत्रण व आपत्ती व्यवस्थापनाच्या उपाययोजनांना महत्त्वाचा कायदेशीर आधार प्राप्त झाला आहे, असे मुंबई उच्च न्यायालयाचे ॲड.विश्वनाथ पाटील यांनी स्पष्ट केले आहे.

# शेतीसह कौटुंबिक वादातून सख्ख्या चुलत्याचा निर्घृण खून

**तभा वृत्तसेवा,**
**मोहोळ, दि.२२ जून-**

शेतीसह कौटुंबिक वादातून सख्या चुलत्याचा दोन पुतण्यांनी आणि भावाच्या बायकोने तलवारीने निर्घृण हत्या केल्याची घटना कामती खुर्द येथे घडली. संजय नागनाथ शिंदे (वय-५५) असे मृताचे नांव आहे.

कामती पोलीस स्टेशन कडून मिळालेली माहिती अशी की, सोमवार, दि.२२ जून रोजी सकाळी ७.३० वाजण्याच्या सुमारास कामती खुर्द लमाण तांडा येथील आपल्या शेतातून दूधघेऊन मयत संजय हे दुचाकीवरून निघाले होते.



संजय शिंदे यांच्या नावे असलेली १२ एकर जमिनीपैकी ६ एकर जमीन परस्पर विकण्याचे कारणावरून त्यांच्या भावाभावात धुसफूस सुरु होती. ही जमीन त्यांनी सख्खा बहिणीलाच विकली होती. या सर्व प्रकरणात तिन्ही भावांच्या कुटूंबियात वादावादी आणि केसेस सुरु होत्या. सोमवारी सुरेखा शिंदे हिने मयताच्या डोळ्यात मिरची पावडर टाकली. त्यानंतर रणजीत शिंदे व रितेश शिंदे यांनी त्यांच्या ताब्यातील तलवारीने मयताच्या हातावर, गळ्यावर व डोक्यावर असे गंभीर वार करून त्यांना जखमी केले. या हल्ल्यात त्यांचा मृत्यू झाला असून आरोपीने जिवे ठार मारण्याच्या उद्देशाने सदरचेकृत्य केलेले आहे असे फिर्यादीने नमूद केले आहे. या घटनेची फिर्याद मृताच्या पत्नीने दिली आहे.

कामती पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल झालेला असून तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक बसवेश्वर जकिकोरे हे करत आहेत आरोपीच्या तपासासाठी कामती पोलीस स्टेशन येथील चार तपास पथके रवाना करण्यात आलेले आहेत.

# पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी केला करेक्ट कार्यक्रम : लक्ष्मण केकान



**तभा वृत्तसेवा,**
**जेऊर दि.२२ जून-**

सोलापूर स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीमध्ये आमदार राजेंद्र राऊत यांच्या विजयाच्या निमित्ताने पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी विरोधकांचा करेक्ट कार्यक्रम केला, असे भारतीय जनता पार्टीचे जिल्हा सचिव लक्ष्मण केकान यांनी सांगितले. 'महायुती'चे उमेदवार राजेंद्र राऊत यांच्या विजयाबद्दल शेलगाव वांगी येथे आयोजित केलेल्या जल्लोषप्रसंगी ते बोलत होते.

महाराष्ट्र राज्याचे ग्रामविकास मंत्री तथा सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार गोरे, आमदार सचिन कल्याणशेट्टी यांच्या योग्य नियोजनामुळे राजेंद्र राऊत यांचा प्रचंड मताने विजय झाला. येणाऱ्या काळामध्ये सोलापूर, माढा लोकसभा मतदार संघ आणि करमाळासह जिल्ह्यातील सर्व विधानसभा मतदार संघात भारतीय जनता पार्टीचीच सत्ता येणार आहे, असेही त्यांनी सांगितले.

यावेळी करमाळा पंचायत समितीचे माजी सदस्य रोहिदास सातव, वांगी नं २ चे युवा नेते युवराज जाधव, दत्तुमालक सातव, शेलगावचे युवा नेते अनिल केकान, ग्रामपंचायतचे माजी सदस्य गणेश साळुंके, प्रगतशील बागायतदार संजय कोंडलकर, अजितदादा केकान, वैभव केकान, समाधान बेरे, समाधान पवळ, मनोज लोंढे, योगेश केकान, आदित्य कोळी, शैलेश केकान, लक्ष्मण खरमाटे आदी उपस्थित होते.

# उस्मानाबाद-लातूर-बीड विधान परिषद मतदारसंघात 'महायुती'ची ताकद पुन्हा सिध्द



### विधान परिषद तालिका सभापतींची नियुक्ती जाहीर

**मुंबई, दि. २२ जून-**

विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनाला पहिल्या दिवशी विधान परिषदेच्या कामकाजासाठी तालिका सभापतींची नियुक्ती सभापती प्रा.राम शिंदे यांनी जाहीर केली. तालिका सभापती म्हणून सदस्य प्रमोद जठार, कृपाल तुमाने, संजय खोडके, अभिजीत वंजारी, सुनील शिंदे यांची नियुक्ती करण्यात आल्याचे सभापती प्रा.शिंदे यांनी जाहीर केले.

### बसवराज पाटील ७१९ मतांनी विजयी

**तभा वृत्तसेवा,**
**धाराशिव, दि.२२ जून-**

उस्मानाबाद-लातूर-बीड स्थानिक प्राधिकारी मतदारसंघाच्या विधान परिषद निवडणुकीत भाजपचे उमेदवार तथा माजी मंत्री बसवराज माधवराव पाटील यांनी दणदणीत विजय मिळवत महायुतीचे वर्चस्व पुन्हा एकदा अधोरेखित केले आहे. बसवराज पाटील यांना ८४४ तर काँग्रेसचे उमेदवार महेश देशमुख यांना १२५ मते मिळाली. पाटील यांनी तब्बल ७१९ मतांच्या विक्रमी फरकाने विजय संपादन केला.



धाराशिव येथील भाई उद्धवराव पाटील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था (आयटीआय), तुळजापूर रोड येथे मतमोजणी प्रक्रिया पार पडली. जिल्हाधिकारी तथा निवडणूक निर्णय अधिकारी किर्ती किरण पुजार यांच्या मार्गदर्शनाखाली मतमोजणी शांततापूर्ण व पारदर्शक वातावरणात पूर्ण झाली. निवडणुकीत एकूण ९८३ मतपत्रिका प्राप्त झाल्या. त्यापैकी १४ मते अवैध ठरली, तर ९६९ मते वैध ठरली. वैध मतांपैकी बसवराज पाटील यांनी ८४४ मते मिळवत एकहाती वर्चस्व सिध्द केले.

या निवडणुकीकडे केवळ एका जागेच्या विजय-पराभवाच्या दृष्टीने नव्हे, तर मराठवाड्यातील राजकीय शक्तीपरीक्षेच्या रुपात पाहिले जात होते.

उस्मानाबाद, लातूर आणि बीड जिल्ह्यांतील स्थानिक स्वराज्य संस्थांचे सदस्य या निवडणुकीतील मतदार होते. मतदानापूर्वी विविध बैठका, संपर्क मोहिमा आणि राजकीय हालचालींमुळे ही निवडणूक चर्चेत राहिली होती.

निकाल जाहीर होताच धाराशिव, लातूर आणि बीड जिल्ह्यांमध्ये महायुतीच्या कार्यकर्त्यांनी जल्लोष केला. फटाक्यांची आतषबाजी, मिठाई वाटप आणि घोषणाबाजी करत विजयाचा आनंद साजरा करण्यात आला.

### प्रत्येक गावात वेदर स्टेशन बसवण्यासाठी केंद्र सरकारकडे प्रस्ताव पाठवणार

**मुंबई, दि. २२ जून-**

फळपीक विमा योजनेतील शेतकऱ्यांना झालेल्या नुकसानीची अचूक भरपाई मिळवून देण्यासाठी राज्यातील प्रत्येक गावात 'वेदर स्टेशन' बसवण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. यासाठी केंद्र शासनाकडे लवकरच प्रस्ताव पाठवण्यात येईल, असे कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी सांगितले.

**कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांचे प्रतिपादन**

फळपीक विमा योजनेतील अनियमितता, शेतकऱ्यांना न मिळालेली नुकसानभरपाई आणि प्रलंबित तक्रारींबाबत मंत्रालयात आयोजित केलेल्या एका बैठकीत ते बोलत होते. यावेळी आमदार मनीषा चौधरी, कृषी विभागाचे सचिव परिमल सिंह, कृषी आयुक्त सूरज मांढरे, कृषी संचालक विनयकुमार आवटे, विमा कंपन्यांचे वरिष्ठ अधिकारी आदी उपस्थित होते.

# बार्शीत जल्लोष; राजेंद्र राऊत यांनी घेतले भगवंतांचे दर्शन





### फटाक्यांची अतिषबाजी, गुलालाची उधळण

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि.२२ जून-**

सोलापूर स्थानिक स्वराज्य मतदार संघातून विधान परिषद निवडणुकीत 'महायुती'चे उमेदवार राजेंद्र राऊत यांच्या विजयाबद्दल बार्शी शहर-तालुक्यात जल्लोष करण्यात आला. दरम्यान, नूतन आमदार राजेंद्र राऊत यांनी येथील भगवंत मंदिरात जाऊन 'श्रीं'चे मनोभावे दर्शन घेतले. यावेळी कार्यकर्त्यांनी फटाक्यांची आतषबाजी व गुलालाची मुक्तपणे उधळण करत आनंद व्यक्त केला.

बार्शीच्या नगराध्यक्ष तेजस्विनी कथले, पंचायत समितीच्या सभापती मीनाक्षी रोंगे, नगरसेविका कांचन मोहिते, सुनीता ढोणे, अर्चना बारस्कर, उर्मिला मोहिते, सुजाता मस्के, उर्मिला मुळे, फर्जाना जलसे, चंद्रकला कांबळे आदींनी बार्शी नगरपरिषद, राऊत यांच्या घरासमोर विजयोत्सव साजरा केला. राजेंद्र राऊत यांच्या पत्नी कविता राऊत ह्यादेखील आनंदात सहभागी झाल्या होत्या.

आमदार राजेंद्र राऊत यांचे कार्यालय असलेल्या कर्नल भोसले चौक येथेही पेढे आणि लाडू वाटप करत आणि फटाके फोडून आनंदोत्सव साजरा करण्यात आला. सुभाष नगर, राऊत चाळ, सोमवार पेठ, भवानी पेठ, कसबा पेठ, मंगळवार पेठ, कचेरी रोड, अलीपुर रस्ता, हांडे गल्ली, उपळाई रस्ता, परंडा रस्ता, गाडेगाव रस्ता, कुर्डूवाडी रस्ता, कासारवाडी रस्ता यांसारख्या शहराच्या सर्वच भागात आ.राऊत समर्थकांनी फटाक्यांची आतिषबाजी आणि गुलालाची उधळण करत आनंद साजरा केला.

**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : **विवेक कृष्णाजी घळसासी.** ● समूह मुख्य संपादक : **दिलीप यशवंत पेठे.**● मुख्य संपादक :**प्रशांत वसंतराव माने** दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Website:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi -** Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT



# ‘महायुती’चे राजेंद्र राऊत ३६५ मताधिक्क्याने विजयी; ‘महाविकास’चे वसंतराव देशमुख यांच्या पारड्यात ११८ मते

## विधानपरिषद निवडणूक : राजेंद्र राऊत यांना ४८३ मते; १३ मते ठरली बाद

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२२ जून-**

विधानपरिषद निवडणुकीच्या अनुषंगाने सोलापूर स्थानिक स्वराज्य संस्था मतदार संघातून ‘महायुती’चे राजेंद्र राऊत हे ३६५ मताधिक्क्याने विजय संपादन केले. ‘महाविकास’चे वसंतराव देशमुख यांच्या पारड्यात ११८ मते पडली. राजेंद्र राऊत यांना ४८३ मते पडली. दरम्यान, १३ मते बाद ठरली.

‘महायुती’कडून राजेंद्र राऊत तर ‘महाविकास’कडून वसंतराव देशमुख यांच्यात दुरंगी लढत झाली. पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी ‘महायुती’च्या तर खासदार धैर्यशील मोहिते-पाटील यांनी ‘महाविकास’च्या उमेदवाराच्या विजयासाठी कंबर कसली होती. यात पालकमंत्री गोरे यांनी खासदार मोहिते-पाटील यांच्यावर मात केली. ही निवडणूक बिनविरोध करण्याच्या दृष्टीने आटोकाट प्रयत्न करण्यात आला. गुरुवार, दि.१८ जून रोजी मतदान झाले. प्रचारादरम्यान दोन्ही गटांकडून आरोप-प्रत्यारोपांच्या फैऱ्या झाडण्यात आल्या. ‘अदृश्य शक्ती’ पाठीशी असल्याचा दावाही करण्यात आला होता.

जिल्ह्यातील एकूण ६१४ पैकी ६१५ जणांनी मतदानाचा हक्क बजाविला होता. ‘भाजपा’चे प्रभाग क्रमांक २२ मधील नगरसेवक दत्तात्रय नडगिरी यांचे निधन झाल्याने आणि स्वीकृत नगरसेवक रुद्रेश बोरामणी हे परदेशात असल्याचे त्यांचे मतदान झाले नाही. सोमवार, दि.२२ जून रोजी मतमोजणी करण्यात आली. ‘महायुती’चे राजेंद्र राऊत यांच्या पारड्यात ४८३ तर ‘महाविकास’चे वसंतराव देशमुख यांच्या पारड्यात ११८ मते पडली. ‘महाविकास’च्या एकूण मतांची संख्या लक्षात घेता, क्रॉस व्होटिंग झाल्याचे स्पष्ट होते. आजच्या या निकालाने ‘महायुती’ची संघटनात्मक ताकद अधोरेखित झाली आहे. यावेळी ‘महायुती’च्या कार्यकर्त्यांनी एकच जल्लोष केला. सोलापूर जिल्ह्यातील आगामी राजकीय समीकरणांवर या निकालाचा परिणाम होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.







### एवढा आत्मविश्वास, खुमखुमी होती तर...

काही नेत्यांच्या अहंकारी भूमिकेमुळे ही निवडणूक लागली. एका सर्वसामान्य कार्यकर्त्याला पुढे करून राजकीय प्रतिष्ठेची लढाई उभी करण्यात आली. वसंतराव देशमुख यांना ११८ मते मिळाली. ‘त्या’ नेत्यांना जर एवढा आत्मविश्वास आणि खुमखुमी होती तर स्वतःच्या घरातील उमेदवार मैदानात उतरवायला हवा होता. घरातील उमेदवाराला तेवढीही मते मिळाली नसती, असा टोला राजेंद्र राऊत यांनी मोहिते-पाटील यांचे नाव न घेता लगावला. विधानमंडळाचे अधिवेशन संपल्यानंतर अकलूज येथे भव्य विजयी सभेचे आयोजन करण्यात येणार आहे, असे सांगायलाही ते विसरले नाहीत.

### ‘महायुती’च्या कार्यकर्त्यांमध्ये अमाप उत्साह

निवडणुकीचा निकाल जाहीर होताच सोलापूर शहरासह जिल्ह्यात ‘महायुती’च्या कार्यकर्त्यांमध्ये अमाप उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते. विविध ठिकाणी जल्लोष साजरा करण्यात आला. फटाक्यांची मोठी आतिषबाजी, संबळाचा निनाद, ढोलताशा आणि डॉल्बीच्या दणदणाटात कार्यकर्त्यांनी जल्लोष साजरा केला.

---

## ▶▶ महत्वाचे...

### तरुणाची गळफासाने आत्महत्या

**सोलापूर, दि.२२ जून-**

एका ३५ वर्षीय तरुणाने घरातील लाकडीवाशाला साडीच्या साह्याने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना नीलम नगर येथे उघडकीस आली. विनायक बलराम रेब्बा (रा. नीलम नगर, एमआयडीसी रोड, सोलापूर) असे त्या तरुणाचे नाव आहे. रविवार, २१ जून २०२६ रोजी त्याने गळफास घेतला असल्याचे घरच्यांना आढळून आले. एमआयडीसी पोलिसांना ही खबर समजली असता हवालदार कांबळे यांनी घटनास्थळी दाखल होत त्या तरुणाला शासकीय रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले. मात्र डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले.

### स्विफ्ट कारच्या धडकेत दुचाकीस्वार ठार

**सोलापूर, दि.२२ जून-**

स्विफ्ट कारचा धडकेत जखमी झालेल्या ६५ वर्षीय दुचाकीस्वाराचा उपचारादरम्यान शासकीय रुग्णालयात सोमवारी सकाळी मृत्यू झाला. बापू उमाजी मदने (रा.इंदापूर, जि.पुणे) असे त्यांचे नाव आहे. रविवारी दुपारी ते दुचाकीवरुन टेंभुर्णीहून इंदापूरकडे निघाले असताना शिराळ पाटीजवळ त्यांच्या दुचाकीला एम.एच.४४ झेड ४४ या क्रमांकाच्या स्विफ्ट कारने पाठीमागून धडक दिली. यात ते जखमी झाल्याने त्यांना टेंभुर्णी येथील एका खासगी दवाखान्यात प्राथमिक उपचार करुन नातेवाईक पवन जाधव यांनी पुढील उपचारासाठी सोलापुरातील शासकीय रुग्णालयात दाखल केले. सोमवारी उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला.

### घरात झोपल्या ठिकाणी सर्पदंश

**सोलापूर, दि.२२ जून-**

घरात झोपल्या ठिकाणी सर्पदंश झाल्याने एका ७५ वर्षीय वृध्दाचा मृत्यू झाल्याची घटना दक्षिण सोलापूर तालुक्यातील मळकवठा येथे घडली. महादेव कामन्ना थोरात असे त्या वृध्दाचे नाव आहे. सोमवारी पहाटे ते घरात झोपलेले असताना त्यांना सापाने दंश केला. त्यांना प्रकाश थोरात यांनी शासकीय रुग्णालयात दाखल केले असता उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला.

### ‘अभिनव’च्या वतीने वधू-वर मेळावा

**सोलापूर, दि.२२ जून-**

येथील अभिनव सामाजिक संस्थेच्या वतीने बुधवार, दि.२४ जून २०२६ रोजी सकाळी ११ वाजता रंगभवन चौकातील समाजकल्याण केंद्र येथे सर्वधर्मिय वधू-वर मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. या मेळाव्यात सहभागी होऊ इच्छिणाऱ्यांनी अथवा त्यांच्या पालकांनी ८२६३००८९१३ या मोबाईल नंबरवर संपर्क साधून नावे नोंदवावीत, असे आवाहन मीनल दास यांनी केले.

---

## तेरे बाप को जैसे तडीपार किया अब तेरे को करता...

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२२ जून-**

‘तेरे बाप को जैसे तडीपार किया अब तेरे को करता’, असे म्हणत एका तरुणाला लोखंडी रॉड आणि फायबर पाईपने बेदम मारहाण करण्यात आल्याची घटना सात रस्ता परिसरातील सुरभी हॉटेलजवळ घडली. याप्रकरणी सदर बझार पोलिस ठाण्यात चार जणांविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला.

सुनील चौधरी, धनंजय पंतुवाले, अक्षय पंतुवाले, गणेश मौलावाले (सर्वजण रा.महाराणा प्रताप झोपडपट्टी, सोलापूर) अशी गुन्हा दाखल करण्यात आलेल्यांची नावे आहेत. याबाबत गणेश राम जमादार (वय-२४, रा.महाराणा प्रताप झोपडपट्टी, सोलापूर) यांनी फिर्याद दाखल केली. यातील फिर्यादी हा रविवार, दि.२१ जून रोजी दुपारी ३ वाजण्याच्या सुमारास सुरभी हॉटेलसमोर थांबला असताना वरील आरोपींनी तू आर के ग्रुपके नाद को लगता क्या? तेरे बाप को जैसे तडीपार किया अब तेरे को करता और तेरे को खलास करता अशी धमकी देत मारहाण केली, असे फिर्यादीत म्हटले आहे.

## अदृश्यशक्ती म्हणणारे स्वतः अदृश्य झाले

**पालकमंत्री गोरे यांचा शाब्दिक टोला**

**देवाभाऊंनी राजाभाऊंचे पुनर्वसन केले**

**‘गॉगल’चे राजकारण संपले**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २२ जून-**

सोलापूर स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघाच्या विधानपरिषद निवडणुकीत ‘महायुती’चे उमेदवार राजेंद्र राऊत यांना ५०१ मते पडतील, असा आपला दावा होता. परंतु काही मते अवैध ठरली गेल्याने १० ते १२ मते कमी पडली. ‘अदृश्यशक्ती’ पाठीशी आहे, असे म्हणणारे स्वतः अदृश्य झाले, हे आजच्या निकालावरुन दिसून आले, असे पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी प्रसारमाध्यमांशी बोलताना सांगितले.



या निवडणुकीच्या निमित्ताने देवाभाऊ अर्थात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राजाभाऊ अर्थात राजेंद्र राऊत यांचे पुनर्वसन केले. आमच्या मागे अदृश्यशक्ती आहे, असे म्हणणारे स्वतः अदृश्य झाले असल्याने त्यांना फारसे महत्त्व देणे गरजेचे नाही. आता राजाभाऊ थेट विधानसभेत आपला दमदार आवाज उठवतील असे सांगतानाच, गॉगलचे राजकारण संपले आहे. आता विरोधकांनी जमिनीवर यावे, असा टोलाही त्यांनी लगावला.

सोलापूरसह राज्यभरातील निकालाचा विचार करता, विधानपरिषद निवडणुकीत प्रभावी विजय मिळवत ‘महायुती’चे आपले वर्चस्व अधोरेखित केले आहे. राज्यभरात विरोधकांचा सुफडा साफ झाला असून स्थानिक स्वराज्य संस्थांमधील लोकप्रतिनिधींनी विकासाभिमुख नेतृत्वावर दाखविलेल्या विश्वासामुळे हा विजय शक्य झाल्याची भावना पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी व्यक्त केले.

पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या हस्ते नूतन आमदार राजेंद्र राऊत यांचा सत्कार करण्यात आला. आमदार देवेंद्र कोठे, माजी आमदार राम सातपुते, ‘भाजपा’चे प्रदेश कार्यकारिणी सदस्य शहाजी पवार, जिल्हाध्यक्षद्वय चेतनसिंह केदार सावंत, शशिकांत चव्हाण, शहराध्यक्षा रोहिणी तडवळकर, महापौर विनायक कोंड्याल, सभागृह नेते नरेंद्र काळे, आदींनी नूतन आमदार राजेंद्र राऊत यांची सदिच्छा भेट घेऊन त्यांचे अभिनंदन केले.

---

## सोलापूर शहरात १५ दिवसांसाठी मनाई आदेश लागू

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २२ जून-**

सार्वजनिक शांतता आणि सुरक्षितता राखण्यासाठी पोलीस उप आयुक्त (गुन्हे/विशा) डॉ.अश्विनी पाटील यांनी महाराष्ट्र पोलिस अधिनियम १९५१ चे कलम ३७ अन्वये मनाई आदेश जारी केला आहे. हा आदेश दि.२४ जून रोजी रात्री ००.०१ वाजता लागू होणार असून दि.८ जुलै रोजी मध्यरात्री २४.०० वाजेपर्यंत लागू राहणार आहे. या आदेशानुसार शस्त्रे, अग्निशस्त्रे, तलवारी, भाले, दंडुके, चाकू, लाठ्या, स्फोटके, क्षेपणास्त्रे, उपरोधिक पदार्थ तसेच सार्वजनिक ठिकाणी उत्तेजक गाणी, संगीत वाजवणे, अश्लील चित्रे किंवा चिन्हे प्रदर्शित करणे यावर बंदी घालण्यात आली आहे. आदेशाचे उल्लंघन करणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात येणार असून जप्त केलेली शस्त्रे व वस्तू राज्य सरकारकडे जमा करण्यात येतील, असे सांगण्यात आले.

## ‘सीसीटीव्ही सिस्टीम’संदर्भात मानवी हक्कभंगाची शक्यता?

**विद्यापीठ विकास कृती समितीची शंका**

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २२ जून-**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाने महाविद्यालयांच्या सीसीटीव्हीचे डायनॅमिक/स्टॅटिक आयपी एड्रेस मागितले आहे. मात्र याद्वारे मानवी हक्कभंगाच्या शक्यता निर्माण होऊ शकतात. त्यामुळे हा निर्णय मागे घेण्यात यावा, अशी मागणी विद्यापीठ विकास कृती समितीने कुलगुरु प्रा.डॉ.प्रकाश महानवर यांच्याकडे एका निवेदनाद्वारे केली आहे.

कृती समितीच्या अध्यक्षा पद्मजादेवी मोहिते-पाटील व सचिव प्राचार्य डॉ. महेंद्र कदम यांच्या नेतृत्वाखाली देण्यात आलेल्या या निवेदनात म्हटले आहे की, कोरोनानंतर आणि राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० लागू झाल्यानंतर शिक्षण व्यवस्थेत मोठे बदल झाले आहेत. या बदललेल्या परिस्थितीत विद्यार्थ्यांसमोर नोकरी-रोजगाराचे प्रश्न निर्माण झाले आहेत.



महाविद्यालयातील बायोमेट्रिक उपस्थिती अनिवार्य केल्याने विद्यार्थ्यांचे नुकसान होऊ शकते. याबाबत शासनाचा असा कोणताही आदेश नाही. दरम्यान, प्राध्यापक भरती प्रक्रिया वेळेवर पूर्ण करण्यासाठी विद्यापीठाने दप्तर दिरंगाई न करता वेळेत समित्या द्याव्यात. सीएचबीच्या मान्यता आणि ना हरकत प्रमाणपत्र देण्यासाठी १ ऑक्टोबर २०१७ चा कार्यभार ग्राह्य धरण्यात यावी, असेही या निवेदनात नमूद आहे.

## मुंबई-लातूर आणि मुंबई-बिदर रेल्वेगाड्या २४ डब्यांसह धावणार

**3 अतिरिक्त डब्यांमुळे १८२ अतिरिक्त जागांची उपलब्धता**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२२ जून-**

मुंबई-लातूर आणि मुंबई-बिदर एक्सप्रेसच्या रेल्वेगाड्या आता २४ डब्यांसह धावणार आहेत. प्रवाशांचा प्रवास सुखकर व्हावा याचा विचार करुन मध्य रेल्वेने ३ अतिरिक्त डबे जोडण्याचा निर्णय घेतला. त्यामुळे या गाड्यांची एकूण डब्यांची संख्या २४ होईल.

मुंबई-लातूर एक्सप्रेस दि.२५ जून २०२६ पासून, लातूर-मुंबई एक्सप्रेस दि.२६ जून २०२६ पासून, मुंबई-बिदर एक्सप्रेस दि. २६ जून २०२६ पासून, बिदर-मुंबई एक्सप्रेस दि.२७ जून २०२६ पासून धावेल. याद्वारे प्रवाशांना सुखकर प्रवासाचा अनुभव घेता येईल. सुधारित २४ डब्यांच्या रचनेत १ फर्स्ट एसी, ३ एसी टू-टायर, ५ एसी थ्री-टायर, ९ स्लीपर क्लास, ४ सामान्य द्वितीय श्रेणी आणि २ गार्ड-कम-ब्रेक व्हॅन यांचा समावेश आहे. ३ अतिरिक्त डब्यांमुळे प्रवाशांसाठी १८२ अतिरिक्त जागा उपलब्ध होणार आहेत.

---


## दोन मजली इमारतीला भीषण आग; ५ ते ६ लाखांचे नुकसान

**फटाक्यांच्या ठिणगीमुळे आग लागल्याचा तांबोळी कुटुंबीयांचा दावा**

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि.२२ जून-**

बार्शी शहरातील राऊळ गल्ली परिसरात सोमवार दि.२२ जून रोजी दुपारी एका दोन मजली निवासी इमारतीला भीषण आग लागून जुन्या सागवानी लाकडाच्या माळवदासह संपूर्ण दुसऱ्या मजल्याचे मोठे नुकसान झाले आहे. या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नसली तरी घरातील संसारोपयोगी साहित्य, फर्निचर आणि घराचे मिळून अंदाजे ५ ते ६ लाख रुपयांचे नुकसान झाल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त करण्यात आला आहे.

राऊळ गल्ली येथील तांबोळी कुटुंबीयांच्या मालकीच्या या इमारतीत मजहर तांबोळी, जहीर तांबोळी आणि जुबेर तांबोळी हे आपल्या आई, पत्नी आणि मुलांसह



संयुक्त कुटुंब पद्धतीने वास्तव्यास आहेत. दुपारी तीनच्या सुमारास इमारतीच्या वरच्या भागातून धूर आणि ज्वाळा दिसू लागल्याने परिसरात एकच खळबळ उडाली. तांबोळी कुटुंबीयांच्या म्हणण्यानुसार, दुसऱ्या मजल्याच्या वरच्या भागावर पडलेल्या फटाक्यांच्या ठिणगीमुळे आग लागली. इमारतीतील माळवद हे जुन्या सागवानी लाकडाचे असल्याने आगीने काही क्षणांतच मोठा पेट घेतला.

आग लागल्याचे लक्षात येताच घरातील महिला, लहान मुले आणि ज्येष्ठ नागरिकांना तातडीने सुरक्षितस्थळी हलविण्यात आले. त्यामुळे मोठी जीवितहानी टळली. आग वाढत असल्याचे दिसताच बार्शी नगर परिषदेच्या अग्निशामक दलाला माहिती देण्यात आली. त्यानंतर अग्निशामक दलाच्या तब्बल सात गाड्यांनी आग विझवण्यासाठी प्रयत्न केले. सुमारे तीन तासांच्या अथक प्रयत्नांनंतर अग्निशमन दलास आगीवर नियंत्रण मिळिवण्यात यश आले.

मौला मुलाणी, जाकीर चौधरी, वसीम तांबोळी, एजाज तांबोळी, डॉ. जीशान मुलाणी, इरफान तांबोळी तसेच अन्य युवकांनी प्रसंगावधान राखत घरातील महिला व मुलांना बाहेर काढण्यास मदत केली. या आगीत दुसऱ्या मजल्यावरील सर्व खोल्यांमधील कपाटे, बेड, गाद्या, कपडे, शालेय दप्तरांसह मोठ्या प्रमाणातील संसारोपयोगी साहित्य जळून खाक झाले. सागवानी लाकडाचे माळवद जळून त्याचे कोळशात रूपांतर झाले आहे. काही खोल्यांवरील पत्रेही जळाल्याने दुसरा मजला पूर्णपणे उघड्यावर पडला आहे. खालच्या मजल्यावरील स्वयंपाकघर व इतर खोल्यांमधील साहित्याचेही मोठे नुकसान झाले आहे.

### डोळ्यात अश्रू, चेहऱ्यावर दुःखाचे भाव

सुदैवाने जीवितहानी टळली असली तरी संसार उभा करण्यासाठी वर्षानुवर्षे जमविलेले साहित्य आगीत भस्मसात झाल्याने तांबोळी कुटुंबीय अक्षरशः हतबल झाले होते. डोळ्यांत अश्रू आणि चेहऱ्यावर दुःखाचे भाव घेऊन उभ्या असलेल्या कुटुंबीयांना पाहून परिसरातील नागरिकांनीही हळहळ व्यक्त केली.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



# शहरात विविध ठिकाणी योग दिन उत्साहात साजरा

## ज्ञानामृत आनंदलहरी -१४८०

**ऐसे युक्तिचेनि हातें। जैं इंद्रियां ओपिजे भातें।।**
**तैं संतोषासी वाढते। मनचि करी।।**

योगाभ्यासाने कुंडलिनी शक्ती कशी जागृत करता येते, ती जागृत झाल्यानंतर शरीरात, मनात कसे बदल होतात. हे भगवंतानी अर्जुनाला स्पष्ट करुन सांगीतले. कुंडलिनी जागृत झाल्यानंतर, ती तिचे संपूर्ण कार्य करुन टाकते. त्यानंतर ती निस्तेज होते. त्याबरोबरच देहातील पंचमहाभुतांचे स्वरुपही लुप्त होते. अशा योग्याचा देह एक चमत्कार वाटू लागतो. कुंडलिनी शक्तीच्या जागृतीमुळे येणारा अनुभव हा केवळ सांगून समजणारा विषय नव्हे तर तो प्रत्यक्ष अनुभव घेण्याचा विषय आहे. अर्जुनाने श्रीकृष्णाच्या तोंडून हा सर्व योग ऐकला.



योग ऐकुन त्याला खूप आनंद वाटला. तुम्हा आम्हाला जसे हा योग वाचून-ऐकुन आनंद वाटत असेल तसे अर्जुनाला प्रत्यक्ष योग ऐकुन आनंद वाटला. परंतु अर्जुन म्हणाला, देवा माझ्याकडे या योगाचा अनुभव घेण्याचे सामर्थ्य नाही. माझ्याजवळ जेवढे सामर्थ्य आहे, तेवढया सामर्थ्याने हा योग साधता येईल काय ? हा योग कोणालाही मनात इच्छा झाली तर साध्य करता येईल का ? असे प्रश्न अर्जुन भगवंताना विचारीत आहे. खरे म्हणजे हे प्रश्न आपले सुध्दा आहेत. अर्जुनाने आपल्याच मनातील प्रश्न भगवंताला विचारले आहेत, असे म्हटले तर चुकीचे होणार नाही. उत्तरादाखल भगवंत म्हणाले की, अशी असाधारण कार्ये सिध्दीस नेण्यासाठी अधिकाराची आवश्यकता असते.

अर्जुनाच्या प्रश्नाची उत्तरे देतांना भगवंत म्हणाले, **ऐसे युक्तिचेनि हातें। जैं इंद्रियां ओपिजे भातें।। तैं संतोषासी वाढतें। मनचि करी।।**. अर्थात, देहधारी माणसाने हा देह जोपासण्यासाठी जे आवश्यक आहे तेवढे केलेच पाहिजे. अन्न सेवनासारखे कार्य करायलाच पाहिजे. नियमाप्रमाणे आवश्यक त्या सर्व क्रिया केल्या पाहिजेत. मोजके बोलणे, बेताच्या पावलांनी चालणे, योग्यवेळी झोपी जाणे या क्रिया कराव्या लागतील. नियमाच्या हाताने इंद्रियांना विषयाचे खादय दिले तर मन संतुष्ट राहते. या योगाभ्यासासाठी मन संतुष्ट असणे आवश्यक असते. दुराग्रहवृत्तीने, जिद्दीने तहान, भूक सोडण्याने किंवा हट्टाने झोप टाळल्याने, स्वत:ला देहदंड करुन घेण्याने ही योगसाधना तडीस जात नाही. विषयाचा अतिरिक्त उपभोग घेण्याचे सुध्दा सोडले पाहिजे. अर्थात, विषय व विषयवासनांचा त्याग न करता केवळ विहीत कर्मे केल्याने ही योग्यता प्राप्त होत नसते. नितीनियमाचे पालन करुन कर्मे करीत राहिले तर इंद्रियांना आपोआप योग्य ते वळण लागते. योगाचा अभ्यास न करताही सहजच योग प्राप्ती होऊ शकते. एकीकडे योगाभ्यासाची अवघड वाट भगवंतानी अर्जुनाला स्पष्ट करुन सांगीतली आणि दुसरीकडे अत्यंत सोपा मार्ग भगवंतानी सांगीतला. निती नियमाला अनुसरुन जर माणसाने वर्तन ठेवले तर शरीर, मनाला कुठलेही दंड देण्याची गरज नाही. आपल्या कर्तव्याची वाटच आपोआप योगाभ्यासाची वाट बनते. माणूस कर्तव्यातून आत्मसुख मिळवू शकतो. नितीनियमाची वाट चालण्यासाठी आपली इंद्रिये आपल्या ताब्यात आली पाहिजेत. इंद्रियांना ताब्यात आणणे कठीण असले तरीही ते अशक्य नाही, हे ही आपण लक्षात ठेवायला हवे. कुंडलिनी योगासाठी कठीण अभ्यास भगवंतानी अर्जुनाला सांगीतला. त्यानंतर एवढा कठीण अभ्यास मला शक्य होईल का? असे अर्जुनाने भगवंताला विचारले असता भगवंतानी आपले नैतिक कर्तव्ये, सदवर्तन सुध्दा या मार्गाच्या प्राप्ती पर्यन्त नेऊन सोडु शकते असे स्पष्ट केले आहे. यावरुन कर्तव्य किती महत्वाचे आहे याची जाण व्हावी. जय राम कृष्ण हरी।

- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड
मो. ९४२२२१६४४८

## सुप्रभात

### आजचा दिवस

वार : मंगळमवार,
दि. २३ जून २०२६
विक्रम संवत् २०८३ ।
शके -१९४८
संवत्सर - पराभव
मास - ज्येष्ठ शु. नवमी
ऋतु - ग्रीष्म ।
नक्षत्र- हस्त (११.५७)
योग - व्यतिपात (१०.३०)
करण - वरियान (१०.१२)
राहू काल : मंगळवार
दु. ०३.०० ते ०४.३०

दिनविशेष : ✻ आंतरराष्ट्रीय ऑलिम्पिक दिन.
✻ आंतरराष्ट्रीय विधवा दिन.
१७६१: नानासाहेब पेशवे (बाळाजी बाजीराव) मराठा साम्राज्याचे चौथे पेशवयांचे निधन.
१९३५: प्रसिद्ध मराठी लेखक राम कोलारकर यांचा जन्म.
१९४२: ख्यातनाम मराठी चित्रपट व नाट्य दिग्दर्शक डॉ. जब्बार पटेल यांचा जन्म.
१९८०: माजी पंतप्रधान इंदिरा गांधी यांचे सुपुत्र संजय गांधी यांचे निधन.



## श्री मल्लिकार्जुन हायस्कूल व रखमाबाई हत्तुरे महाविद्यालयात योग दिन साजरा

श्री मल्लिकार्जुन हायस्कूल व रखमाबाई हत्तुरे कनिष्ठ महाविद्यालय हत्तुरे नगर सोलापूर येथे आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा करण्यात आला. यावेळी प्रशालेचे प्र. मुख्याध्यापक रमेश दिंडोरे, मार्गदर्शक धरेप्पा हत्तुरे, विनायक हत्तुरे, रितेश हत्तुरे, बसवराज कोरे, भारत राऊत यांच्या उपस्थित हा कार्यक्रम घेण्यात आला. यावेळी योगशिक्षिका वैजयंती मेंथे, स्वाती शिंदे यांनी योगासनाचे प्रकार प्रात्यक्षिक करून घेतले. यावेळी प्र. मुख्याध्यापक रमेश दिंडोरे यांनी विद्यार्थ्यांनी नियमितपणे योगा करुन निरोगी राहण्याचा मूलमंत्र दिला. तसेच योगासनाचे फायदे, महत्त्व व गरज याविषयी याविषयी मार्गदर्शन केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी क्रीडा शिक्षक परमेश्वर चांदोडे,आकाश खराडे यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमास आनंद काकडे, विद्याधर हुलगेरी, दत्तात्रय अगरखेड, अनिता हौदे, गणेश कोरे, लक्ष्मीकांत पनशेट्टी, अनिलकुमार गावडे, संतोष हिरेमठ, महादेव चिवरे, अमरनाथ कदारे, प्रतीक्षा बिडवे, प्रिया पसारे, श्रीनिवास कोलपॅक, प्रशांत हारके, माजी क्रीडाशिक्षक गंगाराम घोडके उपस्थित होते. सूत्रसंचालन रमेश आगवणे यांनी केले तर आभार सुकेशनी गंगोंडा यांनी मानले.



## भाजपा मध्य पूर्व मंडल

योग ही भारताने जगाला दिलेली अमूल्य देणगी आहे. निरोगी जीवनासाठी योग अत्यंत आवश्यक असून प्रत्येक नागरिकाने दैनंदिन जीवनात योगाचा समावेश करावा. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या प्रयत्नांमुळे योगाला जागतिक स्तरावर मान्यता मिळाली, असे प्रतिपादन महापौर विनायक कोंड्याल यांनी केले. जागतिक योग दिनानिमित्त भारतीय जनता पार्टीच्या मध्य पूर्व मंडलच्या वतीने कर्णिक नगर येथील जिजामाता उद्यानात आयोजित केलेल्या योग साधना कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी नगरसेवक सिध्देश्वर कमटम, मेघनाथ येमूल, विजय चिप्पा, अक्षय अंजीखाने, बापू वाडेकर उपस्थित होते. यावेळी विविध योगासने, प्राणायाम आणि ध्यानधारणा यांचे प्रात्यक्षिक सादर करण्यात आले. ८८ वर्षीय योगाचार्य विठ्ठल जाधव यांनी योगाचे महत्त्व विशद करत नियमित योगाभ्यासामुळे शरीर निरोगी राहते, रोगप्रतिकारक शक्ती वाढते आणि जीवनशैली अधिक सुदृढ बनते, असे सांगितले.

## बँक ऑफ महाराष्ट्र

आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त बँक ऑफ महाराष्ट्र सोलापूर क्षेत्रीय कार्यालयाच्या वतीने बँकेच्या विविध योजनांची माहिती देण्यात आली. त्यात घरासाठी, वाहनासाठी, शिक्षणासाठी कर्ज तसेच परदेशी गुंतवणूक, परदेशी चलन त्याचबरोबर गोल्ड व्यावसायिक आणि नोकरदारांसाठी कर्ज उपलब्ध करून देण्यासाठी बँकेच्या ज्या काही योजना आहेत त्याची माहिती देऊन ग्राहकांना व नव्या ग्राहकांसमोर या योजनांची माहिती देण्यात आली. बँक ऑफ महाराष्ट्र व बी.बी.एन यांच्या संयुक्त विद्यमाने आदर्श कार्यालय येथे ग्राहकांचा मेळावा झाला. क्षेत्रीय कार्यालयाचे मुख्य प्रबंधक मेथिलेश पांडे, सीपीसीचे इन्चार्ज प्रणय शंभरकर, बीबीएनचे समन्वयक विश्वनाथ कुलकर्णी यांनी उपस्थित सर्व ग्राहक व खातेदार यांच्याशी बँकिंग विषयीची माहिती व त्याचा लाभ कशा प्रकारे घेता येईल याबद्दल मनोगत व्यक्त केले. सूत्रसंचालन बँक ऑफ महाराष्ट्रचे स्टाफ विभागाचे प्रमुख निलेश पाटील यांनी केले. अतुल कुलकर्णी यांनी आभार मानले.





## लायन्स क्लब

लायन्स इंन्टरनॅशनल अंतर्गत लायन्स क्लब ऑफ सोलापूर सिटी, पतंजली योग यांच्या संयुक्त विद्यमाने विनकर बाग येथे योगा दिन साजरा करण्यात आला. योगशिक्षिका सुधाताई अळ्ळीमोर व श्री. जाधव यांनी योगासनची प्रात्यक्षिके सादर केली. यावेळी नगरसेविका रोहिणी तडवळकर, नगरसेवक ज्ञानेश्वर मॅकल, नागेश्वर कन्ना, शंकर कंनकी आदी उपस्थित होते. विणकर बागेचे अध्यक्ष तथा लायन्स क्लब ऑफ सोलापूर सिटीचे अध्यक्ष लायन मोहन भुमकर यांनी आभार मानले.

## सरस्वती मंदिर शैक्षणिक संकुल

सरस्वती मंदिर संस्थेच्या शैक्षणिक संकुलात आंतरराष्ट्रीय योगदिन साजरा झाला. निमा संघटनेचे डॉक्टर्स, सखुबाई हिराचंद नेमचंद प्रशाला, लक्ष्मीबाई किर्लोस्कर प्राथमिक शाळा व चंडक बालक मंदिराचे विद्यार्थी व शिक्षक उपस्थित होते. यावेळी योग शिक्षक क्रांतीवीर महिंद्रकर व डॉ. रेणुका शिरगोड यांनी योगाचे प्रात्यक्षिक करून मार्गदर्शन केले. प्रमुख पाहुणे म्हणून निमा संघटनेचे माजी अध्यक्ष डॉ. विनायक टेंभुर्णीकर, अध्यक्ष डॉ. नागनाथ जिड्डीमनी, महिला मंचचे अध्यक्ष डॉ. श्रुती मराठे, सचिव डॉ. पल्लवी भांगे, कोषाध्यक्ष डॉ. आश्विनी देगावकर, डॉ. प्रवीण ननवरे, डॉ. राजश्री मठ, डॉ. रविराज गायकवाड, सरस्वती मंदिर संस्थेचे अध्यक्ष अ‍ॅड पांडुरंग देशमुख, माजी अध्यक्ष अ‍ॅड रघुनाथ दामले, सदस्य प्रशांत बडवे उपस्थित होते. मुख्याध्यापिका नीता येरमाळकर यांनी प्रास्ताविक केले. सहशिक्षिका गौरी मठपती यांनी पाहुण्यांची ओळख करून दिली. पर्यवेक्षक मुकुंद गिरी यांनी आभार मानले सहशिक्षिका विद्या माने यांनी सूत्रसंचालन केले.





## गांधी नाथा रंगजी विद्यालय

गांधी नाथा रंगजी विद्यालयात योग दिवस संस्थेचे अध्यक्ष संजय गांधी यांच्या मार्गदर्शनाखाली साजरा करण्यात आला. याचे उद्घाटन प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका सरोजना मुलिटी व माध्यमिक विभागाच्या स्मिता रणदिवे यांच्या हस्ते करण्यात आले यावेळी संगीता नरे यांनी योगासनाचे महत्त्व सांगितले. यावेळी बैठे व उभे योगासनाचे प्रकार मुख्याध्यापिका सरोजना मुलिटी, डॉक्टर वैशाली सरवदे, क्रीडा शिक्षक शिवानंद सुतार, गार्गी पोते, अनुष्का सुपाते यांनी प्रात्यक्षिक करून दाखवले व सर्व विद्यार्थ्यांनी योगासन केले. याप्रसंगी स्मिता रणदिवे, ज्योती दुर्गे, पालक वर्ग, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांच्या उपस्थित होते. सूत्रसंचालन विजया मल्लाडे यांनी केले. तर आभार शिल्पा हेडगिरे यांनी मानले

## एन. बी. नवले सिंहगड महाविद्यालय

सावित्रीबाई फुले शिक्षण प्रसारक मंडळ संचलित एन. बी. नवले सिंहगड अभियांत्रिकी महाविद्यालय, केगाव येथे आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या तीन दिवसीय हार्टफुलनेस ध्यान व योग सत्रास प्राध्यापक, कर्मचारी व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. १७ ते १९ जून या कालावधीत झालेल्या या उपक्रमातून सहभागींच्या मानसिक स्वास्थ्य, एकाग्रता आणि अंतर्मनातील शांततेचा अनुभव अधिक दृढ करण्याचा प्रयत्न करण्यात आला. कार्यक्रमामध्ये डॉ. चंद्रमोहन आर. इंदापुरे यांनी हार्टफुलनेस ध्यान पद्धतीचे मार्गदर्शन करत ध्यान, प्राणायाम आणि आत्म जागृतीचे महत्त्व स्पष्ट केले. ध्यानाद्वारे तणावमुक्त जीवन, सकारात्मक विचारसरणी आणि अंतर्मनाशी संवाद साधण्याचे विविध पैलू त्यांनी उलगडून सांगितले. सत्रादरम्यान दत्तात्रय गायकवाड यांनी



सहभागींच्या शंकांचे निरसन करून ध्यान प्रक्रियेविषयी मार्गदर्शन केले. तसेच गणेश कुडक्याल, सागर पाथरुट आणि सनी दौलताबादकर यांनी स्वयंसेवक म्हणून कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनात भूमिका बजावली. या उपक्रमासाठी संस्थेचे सहसचिव संजय नवले, प्राचार्य डॉ. एस. डी. नवले आणि सीआरटीडीचे संचालक प्रा. एस. एच. पवार यांचे विशेष मार्गदर्शन लाभले. कार्यक्रमाचे समन्वयन प्रा. हेमंत लगदिवे यांनी केले.



## राज मेमोरियल स्कूल

जुनी मिल कंपाऊंड मुरारार्जी पेठ येथील राज मेमोरियल इंग्लिश स्कूलमध्ये योग दिवस साजरा करण्यात आला. सर्वप्रथम प्रमुख पाहुण्या योग प्रशिक्षिका शांता संगा तसेच शाळेच्या मुख्याध्यापिका रोहिणी सुरा यांच्या हस्ते स्वर्गीय विष्णुपंत तात्यासाहेब कोठे, स्वर्गीय राजेश अण्णा कोठे, स्वर्गीय महेश कोठे, विद्येची देवता देवी सरस्वती यांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पहार अर्पण करून सदर योग दिनाची सुरवात करण्यात आली. प्रमुख पाहुण्या योग प्रशिक्षिका शांता संगा यांनी विविध आसानाचे प्रात्यक्षिक सादर करत सर्वांचे लक्ष वेधून घेतले. इयत्ता ५ वी तील विद्यार्थी कुमार यशराज कोरे यांनी संगीताच्या तालावर लयबद्ध असे आसने सादर केली. योग दिनासाठी संस्थाअध्यक्ष डॉ. सूर्यप्रकाश कोठे, उपाध्यक्ष माननीय आमदार देवेंद्र कोठे, सचिव प्रथमेश कोठे, डॉ. राधिका चिलका, मुख्याध्यापिका रोहिणी सुरा यांचे प्रमुख मार्गदर्शन लाभले. योग दिन यशस्वी करण्यासाठी शाळेतील क्रीडा शिक्षक अतुल सोनके, आशुतोष जाधव यांनी परिश्रम घेतले.



## श्री रामलिंगेश्वर शिक्षण संकुल

श्री रामलिंगेश्वर प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालयात जागतिक योग दिन शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थ्यांसमवेत साजरा करण्यात आला. योग ही भारतीयांची प्राचीनतम ओळख आहे. नियमितपणे योग केल्याने शरीर प्रफुल्लित आणि मन ताजेतवाने राहते होकारात्मक विचारांची प्रगल्भता वाढते, असे विचार प्रा.अमर पाटील, प्रा.नागराज पाटील यांनी मांडले.

## मेहता प्राथमिक शाळा

कै. वि. मो. मेहता प्राथमिक शाळा,जुळे सोलापूर येथे प्रमुख अतिथी माजी विद्यार्थीनी समृद्धी चक्रे व मुख्याध्यापिका सीमा कोरवलीकर यांच्या उपस्थितीत आंतरराष्ट्रीय योगदिन साजरा करण्यात आला.

सीमा कोरवलीकर यांनी प्रास्ताविक केले. याप्रसंगी श्रुती कुलकर्णी यांनी योगगीत सादर केले. यावेळी शाळा समिती अध्यक्ष अनिल बरवे, नियामक मंडळ सदस्य सुरेश मंकणी यांनी योग दिनानिमित्त शुभेच्छा दिल्या आहेत. शाळेतर्फे मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. प्रमुख अतिथी समृद्धी चक्रे यांनी योगासनाचे महत्त्व सांगितले. सूत्रसंचालन व प्रमुख अतिथींचा परिचय मयुरी दुरुगकर यांनी केले तर आभार स्वाती गडदे यांनी केले. ॐकार मंत्राने कार्यक्रमाचे सांगता करण्यात आली.



सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



# पंढरपुरात अतिक्रमण हटाव मोहीम

## पंढरपूर नगरपरिषद ॲक्शन मोडवर



### - आषाढीपूर्वी रस्ते, फुटपाथ व सार्वजनिक जागा अतिक्रमण मुक्तीसाठी प्रयत्न

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. २२ जून-**

आषाढी यात्रा कालावधीत वारकरी व नागरिकांना सुरक्षित व अडथळामुक्त मार्ग उपलब्ध व्हावा. तसेच वाहतूक व्यवस्था सुरळीत राहावी, यासाठी जिल्हा प्रशासन सोलापूर व पंढरपूर नगरपरिषदेमार्फत शहरातील सर्व प्रमुख रस्ते, फुटपाथ, चौक, सार्वजनिक जागा व यात्रा मार्ग अतिक्रमणमुक्त ठेवण्यासाठी विशेष मोहीम राबविण्यात येत आहे.

मुख्याधिकारी महेश रोकडे यांनी ही माहिती दिली. जिल्हास्तरीय अधिकारी, कर्मचाऱ्यांचा या विशेष मोहिमेत समावेश असणार आहे. मोहिमेच्या अनुषंगाने शहरातील सर्व फेरीवाले, हातगाडीधारक, टपरीधारक, तात्पुरते दुकानदार, व्यावसायिक तसेच नागरिकांना सार्वजनिक रस्ता, फुटपाथ, नाला, गटार, चौक, सार्वजनिक मोकळी जागा अथवा नगर परिषदेच्या मालकीच्या जागेवर कोणत्याही प्रकारचे अनधिकृत अतिक्रमण, मालसाठा, जाहिरात फलक, बांधकाम साहित्य, शेड, टपरी, शौचालय आदी ठेवू नये. मोहिमेसाठी नागरिकांनी सहकार्य करावे असे आवाहनही त्यांनी केले आहे.

#### तात्काळ अतिक्रमण काढून घ्या

ज्या व्यक्तींनी अतिक्रमण केले असेल त्यांनी ते तात्काळ स्वतःहून काढून घ्यावे. अन्यथा महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगर अधिनियमातील तरतुदींनुसार कोणतीही पुढील सूचना न देता अतिक्रमण हटविण्यात येईल.

- **महेश रोकडे,** मुख्याधिकारी, पंढरपूर नगरपरिषद.

#### अतिक्रमण हटविण्याचा खर्च अतिक्रमण करणाऱ्यांवर बसणार

कारवाई दरम्यान जप्त केलेल्या साहित्याची जबाबदारी संबंधित व्यक्तींची राहील. तसेच अतिक्रमण हटविण्यासाठी झालेला खर्च संबंधितांकडून वसूल होईल. हा खर्च संबंधितांच्या घरपट्टीत दंडासह नावे करण्यात येईल,असे सांगण्यात आले आहे.

## चोरीच्या घटनेनंतरही राजुरी ग्रामदैवत माता लक्ष्मीदेवीची पूजा उत्साहात

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि. २२ जून-**



सांगोला तालुक्यातील राजुरी गावचे ग्रामदैवत माता लक्ष्मीदेवी मंदिर येथील लक्ष्मीदेवीच्या दगडी मुर्तीवरील सोन्याच्या व चांदीच्या दागिन्यांची चोरी झाल्याची घटना शुक्रवार दि.१९ जून रोजी रात्री घडली होती. ही घटना घडल्यानंतर रविवार दि.२१ जून रोजी राजुरी येथील लक्ष्मीदेवी मंदिर येथे लक्ष्मीदेवीची अभिषेक, पूजा व आरती करण्यात आली. यावेळी दिलीप दबडे, दत्ता पाटील, लक्ष्मण पाटील, बाळासाहेब बिसले, नामदेव बंडगर व संजय कुलकर्णी यांच्या उपस्थितीत देवीचा गजर व नामस्मरण करण्यात आले. हा कार्यक्रम मोठ्या थाटामाटामध्ये पार पडला.

## महत्त्वाचे ...



### फॅबटेक डी.फार्मसीचा १०० टक्के निकाल

**सांगोला, दि. २२ जून-**

फॅबटेक कॉलेज ऑफ फार्मसी, सांगोला मधील डी.फार्मसी विभागाने परीक्षेत १०० टक्के निकालाची परंपरा कायम ठेवली आहे. डी.फार्मसीच्या प्रथम वर्षातील लक्ष्मी किट्टड, वैष्णवी येलपले, अथर्व नवले तसेच द्वितीय वर्षातील आफ्रिन मुलाणी, पुजा चोरमले, सुजाता उदगेरी यांनी अनुक्रमे प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक पटकाविले. या उत्कृष्ट निकालाबद्दल प्राचार्य डॉ.संजय बैस, विभाग प्रमुख प्रा.गोपिका डोंगरे, परीक्षा विभाग प्रमुख प्रा.शंतनु काळे, सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. विद्यार्थ्यांनी भविष्यातही फार्मसी क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करून महाविद्यालयाचे नाव उज्ज्वल करावे, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

### सांगोला आगारास १० जिजाऊ बस द्या; कामटे संघटनेची मागणी

**सांगोला, दि.२२ जून-**




सांगोल्यातील शहीद अशोक कामटे बहुउद्देशीय सामाजिक संघटनेतर्फे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक व महाव्यवस्थापक, एसटी महामंडळ मुंबई सेंट्रल यांच्याकडे सांगोला आगारास १० जिजाऊ बस देण्याची मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. सांगोला येथे लांब पल्ल्यासाठी १४-१५, मध्यम पल्ल्यासाठी १६-१७ बस तसेच ग्रामीण भागासाठी व शालेय विद्यार्थ्यांसाठी साधारण २५ बसची आवश्यकता आहे. परंतु सध्या सांगोला आगारात उपलब्ध ५८ बसपैकी अनेक बस जुन्या झाल्याने स्क्रॅपसाठी जात आहेत. यामुळे सांगोला आगारात प्रवाशांच्या मानाने बसची संख्या अत्यंत तोकडी आहे. या डेपोतील बसची संख्या, जुन्या झालेल्या बस नादुरुस्त होण्याचे वाढते प्रकार, ग्रामीण भागातून येणाऱ्या प्रवासी, विद्यार्थ्यांची गैरसोय लक्षात घेता सांगोला आगाराला तातडीने जिजाऊ १० नवीन बस देण्यात याव्यात अशी मागणी केली आहे.



## खासदार तेजस्वी सुर्या सपत्नीक विठ्ठल चरणी लीन

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर,दि.२१ जून -**

भाजयुमोचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा खासदार तेजस्वी सुर्या हे शनिवारी (दि.२०) पंढरपूर येथे कुटुंबासमवेत खासगी दौऱ्यावर आलेले होते. त्यांच्या संगीतविशारद पत्नी शिवश्री स्कंदप्रसाद यांची बऱ्याच दिवसांची श्री विठ्ठल चरणी गायन सेवा समर्पित करण्याची इच्छा पुर्ण करण्यासाठी ते आले होते.

शिवश्री स्कंदप्रसाद या तंजावर घराण्याच्या गायिका आहेत. त्यांनी गायलेले अनेक अभंग, भजने सोशल मीडियावर खूपच प्रसिध्द आहेत. येथील श्री पांडुरंगासमोर त्यांनी आपली गायन सेवा शनिवारी समर्पित केली. श्री विठ्ठल मंदिराच्या सभामंडपात देवापुढे त्यांची गायन सेवा सादर करताना त्यांनी पंडित जितेंद्र अभिषेकी यांनी गायन व संगीत दिलेल्या सुखाचे जे सुख या अभंगाने सुरुवात केली.

#### पत्नी शिवश्री यांच्या इच्छेनुसार श्रीविठ्ठल चरणी गायनसेवा समर्पित

अबीर गुलाल, नामदेव कीर्तन करी प्रेमभरी नाचे पांडुरंगा, हरी दर्शनावीण काळ घालवु नको रे आदी अभंगरचना आपल्या सुमधूर आवाजात सादर केल्या.

मूळ कर्नाटकी गायकी असणाऱ्या शिवश्री यांनी अतिशय स्पष्ट, उत्तम व लयबद्ध अभंग गात रसिक, भक्तांची मने जिंकली. खासदार तेजस्वीसुर्या यांचा हा केवळ कौटुंबिक दौरा होता. यावेळी भाजयुमो जिल्हाध्यक्ष महेश बिराजदार, भाजपा जिल्हा उपाध्यक्ष प्रणव परिचारक, येथील नगरसेवक सौरभ थिटे-पाटील, सरचिटणीस अनुप देवधर, भाजयुमोचे माजी जिल्हाध्यक्ष सुदर्शन यादव, धनंजय मनमाडकर, तुकाराम चिंचणीकर, मंगळवेढा सरचिटणीस सुशांत हजारे, अजित लेंडवे, केदार कुलकर्णी आदी उपस्थित होते.

#### विसावा मंदिरालाही दिली सपत्नीक भेट

इसबावी येथील विसावा मंदिरासही खासदार तेजस्वी सुर्या यांनी सपत्नीक भेट दिली. यावेळी या मंदिराचे विश्वस्त नगरसेवक सौरभ थिटे-पाटील यांनी त्यांचे स्वागत केले. यावेळी रेशमी शेला, हार आणि श्रीफळ देवून तेजस्वी सुर्या यांचा सत्कार केला. त्यानंतर नगरसेवक थिटे-पाटील यांनी विसावा मंदिराबद्दलचा इतिहास सांगून सविस्तर माहितीही दिली.

# करु रोज योगसाधना; जगू निरोगी दीर्घायुष्य




**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. २२ जून-**

**जागतिक योग दिनानिमित्त रविवार दि. २१ जून रोजी जिल्ह्यात ठिकठिकाणरी मोठ्या उत्साहात कार्यक्रम करण्यात आले. विविध योगासनांचा, प्राणायामांचा अभ्यास करण्यात आला. तसेच दररोज योगसाधना करुन निरोगी आयुष्य जगण्याचा संकल्प करण्यात आला.**



### जिव्हाळा विद्यालय, कुर्डूवाडी

आंतरराष्ट्रीय योग दिन जिव्हाळा सुसंस्कार विद्यामंदिर कुर्डूवाडी येथे दि. २१ जून रोजी मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. विद्यालयातील सहशिक्षक जयकुमार उपाध्ये यांनी योगासनाचे विविध प्रकार प्रात्यक्षिकांसह करून घेतले. मुख्याध्यापिका सारिका गोटे यांनी दररोज सकाळी योगा करण्याचे आवाहन केले. संस्थापक अध्यक्ष शिवराज वायचळ यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रमाचे नियोजन करण्यात आले.यावेळी सचिव अजित वायचळ, मुख्याध्यापिका सारिका गोटे उपस्थित होते.



### वखारिया विद्यालय, बार्शी

बार्शी तालुक्यातील उपळे-दुमाला येथील वखारिया विद्यालयात आंतरराष्ट्रीय योगदिन साजरा करण्यात आला.मुख्याध्यापक दयानंद रेवडकर यांनी योगगुरु सिद्धेश्वर शिंदे, शाळा व्यवस्थापन समितीचे उपाध्यक्ष अनिल तांबारे, जिजामाता शिशु संस्कार केंद्रचे मुख्याध्यापक महेश बुरगुटे, महादेव खपले, यशवंत चव्हाण यांचे स्वागत केले. विद्यालयातील क्रीडा विभाग प्रमुख नवनाथ महाले व योगगुरु सिद्धेश्वर शिंदे यांनी योगासनांची प्रात्यक्षिके सादर केली. प्रारंभी विद्यालयाचे क्रीडा विभाग प्रमुख नवनाथ महाले व योगगुरु सिद्धेश्वर शिंदे यांनी योगासनांचे महत्त्व पटवून दिले. याप्रसंगी विद्यालयातील सहशिक्षक रमेश लंकेश्वर, दत्तात्रय राऊत, प्रशांत काशीद, अनिल वैद्य, अतुल राठोड, मकरंद जगदाळे, रेवणसिद्ध दुलंगे, दादासाहेब धनके, यश पवार, रुखसान बागवान, सेवक सुरवसे आदी हजर होते.

### सुयश विद्यालय, बार्शी

सुयश विद्यालय, बार्शी येथे आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा करण्यात आला. प्रारंभी योगाचे महत्त्व विषद करण्यात आले. मुख्याध्यापिका अलका जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रमास सुरुवात झाली. क्रीडाशिक्षक अतुल जाधव, उपमुख्याध्यापक येवले यांनी विद्यार्थ्यांकडून विविध प्रकारचे वॉर्म-अप व्यायाम करुन घेतले. साखरे यांनी विविध योगासने प्रत्यक्ष करुन दाखवत ती विद्यार्थ्यांकडून करुनही घेतली. योगाचे फायदे ऐकून विद्यार्थ्यांनी योगाला दैनंदिन जीवनाचा अविभाज्य भाग बनवण्याचा संकल्पही केला.कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनाबद्दल उपस्थितांनी समाधान व्यक्त केले.





### श्री जयसिंह मोहिते-पाटील विद्यालय, संग्रामनगर

श्री जयसिंह मोहिते-पाटील विद्यालय, संग्रामनगर येथे जागतिक योग दिन वातावरणात साजरा करण्यात आला. विद्यार्थ्यांच्या शारीरिक व मानसिक आरोग्य संवर्धनासाठी योगाचे महत्त्व पटवून देण्याच्या उद्देशाने विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले.मुख्याध्यापक मल्हारी घुले, प्राथमिक विभागाचे मुख्याध्यापक गणेश करडे यावेळी उपस्थित होते. क्रीडा शिक्षक सुभाष चव्हाण यांनी मुक्त हालचाली, विविध योगासने, सूर्यनमस्कार, प्राणायाम व ध्यान यांची प्रात्यक्षिके सादर केली. विद्यार्थ्यांनीही उत्स्फूर्तपणे योगाभ्यास केला. सहशिक्षक महेश शिंदे आणि संगीत विभागातील विद्यार्थ्यांनी प्रेरणादायी गीत सादर केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सहशिक्षक विश्वनाथ हलकुडे यांनी केले. मुख्याध्यापक मल्हारी घुले यांनी विद्यार्थ्यांनी नियमित योगाभ्यास करण्याचे आवाहन केले. अकलूज परिसरात सर्व शाळांवर आज योग दिन साजरा करण्यात आला. शंकरनगर येथील महर्षी प्रशाला सदाशिवराव माने विद्यालय अकलूज शिवरत्न शिक्षण संस्था शंकरनगर याचबरोबर सहकारमहर्षी शंकरराव मोहिते-पाटील सहकारी साखर कारखान्याच्या कामगार कल्याण मंडळातर्फेही योग शिबिर घेण्यात आले

### कर्मयोगी इन्स्टिट्यूट, पंढरपूर

कर्मयोगी इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी आणि कर्मयोगी इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी पंढरपूर येथे आंतरराष्ट्रीय योग दिन मोठ्या उत्साहात साजरा झाला. कार्यक्रमाची सुरुवात दीप प्रज्वलन व वृक्षारोपणाने करण्यात आली.

कार्यक्रमासाठी हार्दिक योग साधना पंढरपूरच्या योग प्रशिक्षिका प्रिया विभुते या प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित होत्या. त्यांनी विविध योगासने, प्राणायाम, ध्यानधारणा आणि श्वसनक्रियांचे प्रात्यक्षिक करून त्यांचे वैज्ञानिक महत्त्व विद्यार्थी, प्राध्यापक आणि कर्मचाऱ्यांना समजावून सांगितले. कार्यक्रमाचे उद्घाटन कर्मयोगी इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीचे प्राचार्य डॉ.एस.पी.पाटील तसेच कर्मयोगी इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसीचे प्राचार्य डॉ. स्वप्निल मोरे यांच्या हस्ते करण्यात आले. त्यांनी विद्यार्थ्यांनी दैनंदिन जीवनात योगाचा अंगीकार करण्याचे आवाहन केले. श्री पांडुरंग प्रतिष्ठानचे विश्वस्त रोहन परिचारक यांनी आंतरराष्ट्रीय योग दिनाच्या सर्वांना शुभेच्छा दिल्या. यावेळी कर्मयोगी पॉलिटेक्निकचे प्राचार्य डॉ. ए. बी. कणसे, रजिस्ट्रार गणेश वाळके तसेच कर्मयोगी शैक्षणिक संकुलमधील सर्व महाविद्यालयाचे प्राचार्य, अधिष्ठाता, विद्यार्थी व प्राध्यापक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमासाठी राष्ट्रीय सेवा योजना व क्रीडा विभागाचे प्रमुख गणेश बागल, षण्मुखानंद माशाळ यांनी परिश्रम घेतले. सूत्रसंचालन प्रा. विकास वाघमारे यांनी तर आभार प्रा. नवनाथ कारंडे यांनी मानले.



### सह्याद्री फार्मसी

सह्याद्री फार्मसी कॉलेज, मेथवडे (ता. सांगोला) येथे आंतरराष्ट्रीय योग दिन आयोजित करण्यात आला होता. प्राचार्य डॉ.मनोजकुमार पाटील तसेच उपस्थित विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी योगांची विविध आसने करून योग दिन साजरा केला. यावेळी योगासनाने मनासोबतच शारिरीक आरोग्य सुधारते. आयुर्वेदातही योगाचे महत्व सांगण्यात आले आहे.



### एकता महिला मंच, पांगरी

येथील एकता महिला मंचतर्फे २१ जून रोजी आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा करण्यात आला. महिलांनी एकत्र येत विविध योगासने, प्राणायाम आणि ध्यानधारणा केली. महिलांनी स्वतःच्या आरोग्यासाठी दररोज थोडा वेळ योगासने करण्यासाठी काढला पाहिजे, असा सूर यावेळी उमटला. मंचच्या पदाधिकारी लक्ष्मी पवार, सारिका काळे, पल्लवी राऊत, सोनाली बगाडे, सुवर्णा वासकर, कीर्ती वासकर, अश्विनी गाढवे, प्रीती वासकर आणि प्रतिभा वासकर यांच्यासह इतर सदस्या मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

CMYK

# आपला जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## व्यायाम करणाऱ्या शिक्षिकेचे मिनी गंठण चोरुन नेले

तभा वृत्तसेवा
मंगळवेढा दिनांक २१ जून-

मंगळवेढा शहराजीक असलेल्या बायपास रोडवर एक ५० वर्षीय शिक्षिका व्यायाम करीत असताना चोरट्याने तिच्या गळ्यातील ८० हजार रुपयांचे सोन्याचे मिनी गंठण चोरुन नेले. या प्रकरणी चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.

शिक्षिका सुषमा सुतार (रा. रामकृष्णनगर, मंगळवेढा) ह्या मोरेवाडी येथील प्राथमिक शाळेत शिक्षिका आहेत. दि.२१ जून रोजी नेहमीप्रमाणे सकाळी ५.३० वाजता त्यापायी चालत फिरायला निघाल्या होत्या. सकाळी ६.०० च्या दरम्यान बायपास रोडवरील श्रीरामनगर शॉपिंगशेजारी बंद वॉशिंग सेंटरसमोरील कोब्यावर त्या रस्त्याकडे पाठ करून उभे राहून व्यायाम करीत होत्या. त्यावेळी पाठीमागे असलेल्या इसमाने त्यांच्या गळ्यातील मिनीगंठण हिसकावून घेवून मोटर सायकलवर बसून कारखान्याच्या दिशेने पळून गेला. फिर्यादीने आरडा ओरडा करत चोरट्याचा पाठलाग केला, मात्र तो सापडला नाही. चोरट्याचे वर्णन-अंदाजे वय २५ ते ३० वर्षे, अंगात काळ्या रंगाचा हाफ टि शर्ट, काळ्या रंगाची नाईट पँट, उंची ५.७ फुट, वर्ण सावळा, अंगाने जाड, कोरीव दाढी व मिशा, मध्यम लांबीचे काळे केस असे असल्याचे फिर्यादीत म्हटले आहे.



## महत्त्वाचे ...



### शिवाजी महाविद्यालयात योग दिन साजरा

बार्शी, दि. २२ जून-

श्री शिवाजी महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना व शारीरिक शिक्षण विभागाच्या संयुक्त विद्यमाने योगदिन साजरा झाला. उद्घाटन डॉ. दिलीप मोहिते यांच्या हस्ते झाले. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. अब्दुल शेख होते. योगगुरु प्रा. गणपत फरतडे, कला शाखा समन्वयक डॉ. बिरा पारसे, विज्ञान शाखा समन्वयक डॉ. रामेश्वर कोठावळे, प्रा. विजया जगताप, रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ. दामाजी भिसे, डॉ. विजयानंद निंबाळकर, डॉ. रामहरी नागटिळक, डॉ. हरिदास बारसकर, डॉ. मनोज चिकराम, प्रा. समाधान लोंढे उपस्थित होते. संस्थेचे सदस्य डॉ. डी. एम. मोहिते यांनी संबोधित केले. प्रा. विजया जगताप व आंतरविद्यापीठ स्तरावर निवड झालेल्या दिशा परदेशी व श्लेषा परदेशी यांनी योगासने व प्राणायामांची प्रात्यक्षिके सादर केली. प्रस्ताविक डॉ. विजयानंद निंबाळकर यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. दामाजी भिसे यांनी तर आभार डॉ. रामहरी नागटिळक यांनी मानले



### सोजर फार्मसीत आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहात साजरा

बार्शी, दि. २२ जून -

सोजर कॉलेज ऑफ फार्मसी, खांडवी (बार्शी) येथील राष्ट्रीय सेवा योजना विभागामार्फत योग दिन साजरा झाला. विद्यार्थी, शिक्षक व कर्मचाऱ्यांनी सहभाग घेतला. समन्वयक एस. व्ही. मोकाशे यांच्या मार्गदर्शनाखाली योग सत्र झाले. योग प्रशिक्षक डॉ. एस. एम. पाटील, ए.एस.साळवी व एन. आर. टिकटे यांनी विविध योगासने, प्राणायाम व ध्यानधारणा यांचे प्रात्यक्षिक करून करवून घेतली. राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या या उपक्रमाचे प्राचार्य डॉ. सुजित करपे यांनी कौतुक केले. कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील प्राध्यापक, कर्मचारी व राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवकांनी विशेष परिश्रम घेतले. संस्थाध्यक्ष अरुण बारबोले व सचिवा कल्पना बारबोले यांनी अभिनंदन केले.



### वरिष्ठ पत्रकार संजय मस्कर यांचे उत्तरप्रदेश उपमुख्यमंत्र्याकडून अभिनंदन

करमाळा, दि. २२ जून -

राज्य ब्युरो चीफ संजय मस्कर यांची राष्ट्रीय पत्रकार संरक्षण परिषद, महाराष्ट्र राज्य सचिव पदी नियुक्ती झाल्याबद्दल उत्तरप्रदेशचे उपमुख्यमंत्री ब्रिजेश पाठक व जेल्मंत्री सुरेश राही यांनी अभिनंदन केले.राष्ट्रीय पत्रकार संरक्षण परिषद लखनऊ व नवी दिल्लीच्या स्थापना दिन, राष्ट्रीय अधिवेशन आणि पत्रकार सन्मान समारंभ विश्वेश्वरय्या सभागृह, राजभवन गेट, लखनौ येथे पार पडला. यावेळी राष्ट्रीय अधीक्षक देवेंद्र कुमार मिश्रा हेही उपस्थित होते. संजय मस्कर हे साडे (ता. करमाळा) येथील रहिवाशी आहेत, त्यांनी जर्नालिझम अँड मास कम्युनेकेशन डिप्लोमा नंतर सलग १७ वर्ष पत्रकारिता केली. राष्ट्रीय अध्यक्ष देवेंद्र कुमार मिश्रा यांच्या नेतृत्वाखालील आयोजित या ऐतिहासिक कार्यक्रमात देशातील विविध राज्यातील हजारो पत्रकार सहभागी होते. समारोपप्रसंगी विविध राज्यातील पत्रकारांचा देवेंद्रकुमार मिश्रा व प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला.

### शंकरगाव येथे शेतकऱ्याची आत्महत्या

सोलापूर, दि.२२ जून

कर्जास कंटाळून एका ४० वर्षीय शेतकऱ्याने शेतामध्ये कीटकनाशक पिऊन आत्महत्या केली. पंढरपूर तालुक्यातील शंकरगाव येथे आज सोमवारी सकाळी नऊ वाजता ही घटना उघडकीस आली. अनिल म्हमाणे (वय ४०) असे आत्महत्या केलेल्या शेतकऱ्याचे नाव आहे. सोमवारी सकाळी नऊ वाजेच्या सुमारास त्यांनी शेतातील घरात असताना कीटकनाशक पिले होते. त्यात ते बेशुद्ध होऊन पडले होते. त्यांना उपचारासाठी येथील शासकीय रुग्णालयात भाऊ अमोल यांनी सकाळी साडेदहा वाजता दाखल केले असता डॉक्टरांनी मृत घोषित केले.

# मध्यरात्रीचा थरार: वाशिंबे येथील मंदिरात धाडसी दरोडा

## देवाचे दागिने, दानपेटी फोडून लाखो रुपये लंपास, ग्रामस्थांमध्ये संतापाची लाट

तभा वृत्तसेवा,
करमाळा, दि. २२ जून -

करमाळा तालुक्यातील वाशिंबे येथील जागृत देवस्थान असलेल्या मंदिरात चोरट्यांनी सोमवारी दि. २२ जून रोजी मध्यरात्री अत्यंत धाडसी आणि फिल्मी स्टाईलने दरोडा टाकला. देवाच्या अंगावरील सोन्या-चांदीच्या दागिन्यांसह दानपेटीतील लाखो रुपयांची रोख रक्कम लंपास केली.

मिळालेल्या माहितीनुसार, हा चोरीचा प्रकार अत्यंत नियोजनबद्ध पद्धतीने केला आहे. रविवारी दि. २१ जून रोजी रात्री नऊच्या सुमारास मंदिराचे पुजारी मंदिराचे दरवाजे कुलूपबंद करून घरी गेले होते. संपूर्ण गाव गाढ झोपेत असताना, मध्यरात्री सुमारे २ ते २:३० च्या दरम्यान पांढऱ्या कारमधून आलेल्या ३ ते ४ बुरखाधारी चोरट्यांनी मंदिरात प्रवेश केला. चोरट्यांनी येतानाच पूर्वतयारी केली होती. मंदिराचे मुख्य महाद्वार आणि गाभाऱ्याचे भक्कम कुलूप त्यांनी आधुनिक लोखंडी कटरने लगेच कापून काढले. अत्यंत शांततेत गाभाऱ्यात प्रवेश करून चोरट्यांनी थेट मूर्तीवर हात टाकला. देवाच्या गळ्यातील सोन्याची चैन, चांदीचे मुकुट आणि प्रभावळ असा लाखो रुपयांचा ऐवज त्यांनी पोत्यात भरला. दागिने चोरल्यानंतर मंदिरातील जड लोखंडी दानपेटी बाजूला ओढत आणून ती एका मोठ्या पहारीने फोडली. त्यातील सर्व रोख रक्कम घेऊन चोरटे पसार झाले.



### सकाळी प्रकार उघडकीस; गावात एकच गर्दी

पहाटे पाचच्या सुमारास जेव्हा मंदिरात पहिली काकड आरती करण्यासाठी पुजारी आणि काही ज्येष्ठ नागरिक आले, तेव्हा त्यांना मुख्य दरवाजा उघडा दिसला. संशय आल्याने त्यांनी आत डोकावले असता, समोरचे दृश्य पाहून त्यांच्या पायाखालची जमीनच सरकली. देवाचा गाभारा अस्ताव्यस्त पडला होता, मूर्तीवरील दागिने गायब होते आणि बाजूलाच रस्त्याचे काही थेंब (चोरट्याला कुलूप तोडताना लागल्याचा संशय) आणि फुटलेली दानपेटी पडली होती. पुजाऱ्यांनी आरडाओरड करताच, काही मिनिटांतच संपूर्ण गाव मंदिर परिसरात गोळा झाले. लाडक्या दैवताच्या मंदिरात झालेली विटंबना पाहून अनेकांच्या डोळ्यात पाणी आले, तर तरुणांनी संताप व्यक्त केला.

### चोरटे सीसीटीव्हीत कैद; पांढरी कार पोलिसांच्या रडारवर

घटनेची गांभीर्य ओळखून करमाळा पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक आपल्या ताफ्यासह तात्काळ घटनास्थळी दाखल झाले. सोलापूरहून श्वानपथक आणि फिंगरप्रिंट तज्ज्ञांना पाचारण केले. पोलिसांनी घटनास्थळावरून काही महत्त्वाचे धागेदोरे हाती येतेल असून, करमाळा पोलिसांची तीन पथके आरोपींच्या शोधासाठी वेगवेगळ्या मार्गांवर रवाना झाली आहेत. घटनेचा तपास पोलीस उपनिरीक्षक करत आहेत.

### चोरांना तात्काळ अटक करा, ग्रामस्थांचा संताप

या घटनेमुळे वाशिंबे आणि परिसरातील गावांमध्ये प्रचंड संतापाची लाट आहे. २४ तासांत या चोरट्यांचा छडा लावा, ग्रामीण भागातील मंदिरांच्या सुरक्षेसाठी पोलिसांनी रात्रीची गस्त वाढवावी, अशी मागणी ग्रामस्थांनी पोलिसांकडे केली आहे.

### सीसीटीव्ही फुटेजचा मोठा पुरावा:

मंदिराच्या ट्रस्टने आणि चौकटीवर लावलेल्या सीसीटीव्ही कॅमेऱ्यात चोरट्यांचा हा सर्व थरार कैद झाला आहे. डोक्याला रुमाल बांधलेले तीन तरुण हातात टॉर्च आणि कटर घेऊन वावरताना दिसत आहेत. चोरी केल्यानंतर ते गावाबाहेर उभ्या असलेल्या एका पांढऱ्या रंगाच्या कारमध्ये बसून जेजुरी-करमाळा महामार्गाच्या दिशेने वेगाने पसार झाल्याचे फुटेजमध्ये दिसत आहे.

# बादोले बु. ग्रामपंचायत निवडणुक तिरंगी होणार

## पारंपरिक दोन पॅनेलमध्ये रासप तालुकाध्यक्षांची तिसरा दावा

तभा वृत्तसेवा,
अक्कलकोट दि. २२ जून -



अक्कलकोट तालुक्यातील बादोले बुद्रुक ग्रामपंचायतीच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी जोरदार हालचाली सुरु झाल्या आहेत. सरपंचपदनागरिकांचा मागास प्रवर्ग ओबीसीसाठी आरक्षित झाले आहे. गावात धनगर समाजाची मोठी लोकसंख्या असल्याने त्या समाजातील तीन युवकांनी सरपंचपदासाठी कंबर कसली आहे.

प्रामुख्याने रासपचे अक्कलकोट तालुकाध्यक्ष दत्तात्रय माडकर हे नशिब आजमावत आहेत. ते गावामध्ये अनेक समाजोपयोगी उपक्रम राबवीत असतात. रक्तदान शिबीर, विद्यार्थ्यांना गणवेश वाटप, संगणक वाटप, टि शर्ट वाटप, रक्तदान शिबीरात भेटवस्तू तसेच गावकऱ्यांच्या सेवेसाठी पोलिस स्टेशन, पंचायत समिती, तहसीलदार कार्यालय, कृषी विभाग आदी शासकीय कार्यालयात जनतेच्या कामासाठी नेहमीच तत्पर असतात. माडकर हे सुशिक्षित आणि सर्व समाजाला सोबत घेऊन जाणार आणि गेल्या १५ वर्षांपासून राजकीय आणि सामाजिक कार्याचा अनुभव असल्याने गावातील तरुण व महिलांचा पाठिंबा वाढत असल्याचे दिसून येत आहे. दुसरीकडे विद्यमान ग्रामपंचायत सदस्य विठ्ठल खरात यांनीही सरपंच पदासाठी दंड थोपटले आहेत. त्यांना माजी सरपंच बाजीराव खरात, सोसायटी चेअरमन धनराज बिराजदार, माजी उपसरपंच सिध्दाराम बगले, सिध्दाराम बिराजदार, शिवशंकर कत्ते यांचे समर्थन आहे. खरात हे दुग्धव्यवसाय करीत असल्याने त्यांचा थेट संपर्क जनतेशी आहे. सामाजिक कार्यात नेहमीच पुढाकार घेत असतात. मितभाषी असून सर्व जातीधर्मांच्या लोकांना सोबत घेऊन जातात. गावातील पारंपारिक बाजीराव खरात व शिवशंकर कत्ते पॅनल विरुद्ध फालू बिराजदार व मलकू कत्ते या पॅनलमध्ये ही निवडणूक प्रतिष्ठेची केली जात आहे.

तिसरीकडे जय भवानी क्लॉथ सेंटरचे मालक बसवंत धायगोडे यांनीही सरपंच पदाच्या शर्यतीत भाग घेतला आहे. त्यांना माजी सरपंच फालू बिराजदार, प्रभारी सरपंच माणिक धायगोडे, माजी सोसायटी चेअरमन मल्लिकार्जुन कत्ते, विठ्ठल कत्ते, अप्पुशा पाटील, मशिद शेख यांचा पाठिंबा आहे. धायगोडे यांचाही थेट संपर्क गावातील जनतेशी आहे. त्यांचा गणेश मंडळ, नवरात्र महोत्सव मंडळ, खंडोबा यात्रा आदींमध्ये हिरिरीने सहभाग असतो. सामाजिक कार्यातही सहभाग असतो. सरपंचपदाच्या शर्यतीतील तिन्ही उमेदवारांना विजयासाठी मुस्लिम, लिंगायत, दलित समाज यांच्यावर अवलंबून रहावे लागणार आहे. त्यासाठी जनतेला सोशल मिडियाच्या माध्यमातून आपल्याकडे खेचून घेण्याचे प्रयत्न होत आहेत. पारंपरिक दोन्ही पॅनेलच्या विरोधात रासपचे तालुकाध्यक्ष दत्तात्रय माडकर यांनी दंड थोपटल्याने गावातील राजकारण ढवळून निघाले आहे. दोघांच्या भांडणात तिसऱ्याचा लाभ होण्याची शक्यता व्यक्त होत आहे.

## महाराष्ट्र विद्यालय, बार्शी येथे आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा

बार्शी, दि. २२ जून -

महाराष्ट्र विद्यालय, बार्शी येथे दि. २१ जून रोजी आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा करण्यात आला. विद्यालयाच्या प्रांगणात आयोजित या कार्यक्रमात विद्यार्थी, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, खेळाडू तसेच स्काऊट-गाईड विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. कार्यक्रमास विद्यालयाच्या प्राचार्या के.डी.धावणे, उपमुख्याध्यापक आर.बी. सपताळे, पर्यवेक्षिका एन.बी.साठे व पर्यवेक्षक के.जी.मदने यांचे मार्गदर्शन लाभले. कार्यक्रमाचे योगप्रमुख अक्षय अनिल वेदपाठक यांनी विद्यार्थ्यांकडून विविध योगासने करून घेतली. योग खेळाडू स्वराली ठाकरे हिने योगासनांचे उत्कृष्ट प्रात्यक्षिक सादर करून उपस्थितांची दाद मिळवली. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी क्रीडाशिक्षक पी. डी. पाटील, योगेश उपळकर व विकास पाटील यांनी परिश्रम घेतले.

# जिल्हा पोलिस अधिक्षकांना फरार आरोपीचा अहवाल सादर

## मंगळवेढा उपकारागृहातून केले होते पलायन

### पोलिस अधीक्षकांच्या कारवाईकडे लक्ष

तभा वृत्तसेवा,
मंगळवेढा, दि. २२ जून -



मंगळवेढा उपकारागृहातून न्यायालयीन कोठडीत असलेला आरोपी महेश बंडगर ने ९ जून रोजी भर दुपारी चार पोलिस कर्मचारी गार्डवर असताना पलायन केले होते. याचा अहवाल नुकताच जिल्हा पोलिस अधिक्षक अतुल कुलकर्णी यांना पाठविण्यात आल्याचे सुत्रांकडून सांगण्यात आले. दरम्यान,त्या चौघा कर्मचाऱ्यांवर काय कारवाई होणार याकडे मंगळवेढा शहरवासीयांचे लक्ष लागले आहे.आरोपी महेश बंडगर हा कर्नाटकमधील असून तो एका गुन्ह्यात मंगळवेढा सब जेलमध्ये न्यायालयीन कोठडीत होता.

९ जून रोजी एक गार्ड व तीन पोलिस कर्मचारी असे चौघेजण बंदोबस्ताला असताना भर दुपारी १२.३५ वा. तो पळून गेला. रात्री हजेरी घेताना एक कैदी कमी असल्याचे संबंधितांना निदर्शनास आल्यानंतर पोलिस प्रशासनात मोठी खळबळ उडाली. सदर सब जेलवर कैद्यांच्या बंदोबस्तासाठी चार कर्मचारी असताना चौघांच्या डोळ्यात आरोपीने धुळफेक कशी काय केली? हा एक संशोधनाचा विषय बनला आहे. याम ध्ये पोलिसांनी आपल्या कर्तव्यात कसूर केल्याचे बोलले जात आहे. आरोपीला खाजगी लोक बाहेरील जेवणाचे डबे पुरवतात. याप्रसंगी तो याच संधीचा फायदा घेत तो त्यांच्या मिसळून पळाल्याची खमंग चर्चा कारागृह परिसरात रंगू लागली आहे. सदर कैद्यांना शासनाकडून जेवणाचे डबे ठेकेदाराकडून पुरवले जात असताना घरगुती डबे व अन्य पेय द्रव्य कैद्यांना कसे काय दिले जातात हा गंभीर प्रश्न चर्चेच्या माध्यमातून पुढे येत आहे.

पोलिस अधिक्षक अतुल कुलकर्णी यांनी या घटनेमागील कारणे शोधून सदर कर्तव्यात निष्काळजीपणा करणाऱ्या कर्मचाऱ्यावर निलंबनासारखी कारवाई करून कर्मचाऱ्यांना आपल्या तत्पर सेवेची जाणीव करून द्यावी, अशी आग्रहाची मागणी मंगळवेढा शहरवासीयांमधून होत आहे.

### जुन्या कारागृहात पुन्हा कैदी का नेले?

नवीन तहसील कार्यालयात लाखो रुपये खर्च करून सुरक्षित सब जेल बांधले आहे. तेथे कैदी नेल्यापासून एकदाही पळून गेले नाहीत. जुन्या जेलमधून वारंवार कैदी पळून गेल्याच्या घटना घडल्या होत्या. तसेच येथे सुरक्षिततेचा अभाव असताना पुन्हा नवीन सब जेलमधून जुन्या सब जेलमध्ये कैदी आणून ठेवण्याचा कोणाचा आटापिटा होता, हा एक संशोधनाचा विषय झाला आहे.

# गणवेशाच्या दर्जाची होणार जिल्हाभर पडताळणी

## निकृष्ट गणवेश वाटपाच्या तक्रारींनंतर शासनाची कारवाई

## शिक्षणाधिकारी, गटशिक्षणाधिकारी आणि केंद्रप्रमुख जाणार शाळेत

तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि.२२ जून


विद्यार्थ्यांना वितरित केलेल्या शालेय गणवेशाच्या गुणवत्तेबाबत तक्रारी वाढल्यानंतर शासनाने आता जिल्हाभर विशेष तपासणी मोहीम हाती घेतली आहे. गणवेशाचा दर्जा, कापडाची गुणवत्ता आणि शासनाने मंजूर केलेल्या निधीचा योग्य वापर झाला आहे की नाही, याची पडताळणी करण्यात येणार आहे. शिक्षण विभाग सक्रिय झाला असून शिक्षणाधिकारी, गटशिक्षणाधिकारी आणि केंद्रप्रमुख यांना तपासणीचे आदेश दिले आहेत.

राज्यातील विद्यार्थ्यांना शैक्षणिक वर्षाच्या सुरुवातीलाच गणवेश उपलब्ध करून दिला आहे. मात्र काही ठिकाणी वितरित गणवेशे निकृष्ट दर्जाचा असल्याच्या तक्रारी शासनाकडे प्राप्त झाल्या. तसेच शासनाकडून प्रति विद्यार्थी २८० रुपये निधी मंजूर असताना प्रत्यक्षात कमी किमतीच्या गणवेशाचे वाटप झाल्याचे आरोपही झाले. या पार्श्वभूमीवर शासनाने संपूर्ण प्रक्रियेची चौकशी करण्याचा निर्णय घेतला आहे. सोलापूर जिल्ह्यात प्राथमिक शिक्षण विभागामार्फत व्यापक तपासणी मोहीम राबविण्यात येणार आहे.

जिल्हा शिक्षणाधिकारी स्वतः प्रत्येक तालुक्यातील दहा शाळा अशा एकूण ११० शाळांमध्ये जाऊन गणवेशाची पाहणी करणार आहेत. त्याचबरोबर गटशिक्षणाधिकारी आपल्या तालुक्यातील ३० टक्के शाळांची तपासणी करतील, तर केंद्रप्रमुख त्यांच्या कार्यक्षेत्रातील सर्व शाळांमधील गणवेशाची गुणवत्ता तपासणार आहेत.

तपासणीदरम्यान गणवेशाचे कापड, शिवणकाम, टिकाऊपणा तसेच शासनाच्या निकषांचे पालन झाले की नाही, याची पडताळणी केली जाणार आहे. तपासणी पूर्ण झाल्यानंतर सविस्तर अहवाल शासनाकडे सादर करणार आहे. दोषी आढळणाऱ्यांवर कारवाईची शक्यता व्यक्त होत आहे.

### जिल्हा शिक्षणाधिकारी करणार ११० शाळांत थेट तपासणी



### पारदर्शकता वाढण्यास मदत

निकृष्ट गणवेशाच्या तक्रारींची दखल घेत शासनाने सुरू केलेली ही तपासणी मोहीम विद्यार्थ्यांच्या हितासाठी महत्त्वाची ठरणार आहे. शालेय साहित्य खरेदी प्रक्रियेत पारदर्शकता वाढण्यास मदत होणार असल्याचे शिक्षण क्षेत्रातून सांगितले जात आहे.

### गणवेशांचा दर्जा शासनाकडे पाठवणार

शासनाच्या सूचनेनुसार सर्व संबंधित अधिकाऱ्यांना तपासणीचे आदेश दिले आहेत. जिल्ह्यातील शाळांमध्ये वितरित गणवेशाचा दर्जा तपासून त्याचा अहवाल शासनाकडे पाठवणार आहे.
- कादर शेख, जिल्हा प्राथमिक शिक्षणाधिकारी.

### तपासणीची जबाबदारी अशी

- **शिक्षणाधिकारी** : जिल्ह्यातील ११० शाळांची प्रत्यक्ष तपासणी
- **गटशिक्षणाधिकारी** : तालुक्यातील ३० टक्के शाळांची तपासणी
- **केंद्रप्रमुख** : त्यांच्या केंद्रातील सर्व शाळांची पाहणी
- **अहवाल** : शासनाला सादर करणार